Prof. Vikrant Krushnarao Meshram

Assistance Professor

Marathi Head Of Department

Email Id:- vikrantmeshram1976@gmail.com

Mob No. :- 8788711484



## RESEARACH PUBLICATIONS

| Sr. No. | Titles of Research Paper | Year Publication | National International | Page No. |
|---|---|---|---|---|
| 1 | आंबेडकरी कविता आणि सामाजिकला | 2017-18 | National | 1-4 |
| 2 | आंबेडकरी कवितेतील स्त्री जाणिव ( यवतमाळ जिल्हातील निवडक कवयित्री ) | 2018-19 | International | 5-9 |
| 3 | ग्रामीण भागात बॅकींग क्षेत्रात रोकड विरहीत व्यवहार प्रणाली | 2019-20 | International | 10-12 |
| 4 | आंबेडकरी कविता : जागतिकीकरण | 2019-20 | International | 13-15 |
| 5 | आंबेडकरी साहित्य आणि सामाजीक परीवर्तन | 2019-20 | International | 16-17 |
| 6 | आंबेडकरी सहित्य आणि जागतिकीकरण | 2019-20 | International | 18-22 |
| 7 | ग्रामगीता : राष्ट्राच्या विकासाचा जाहिरनामा | 2019-20 | International | 23-24 |
| 8 | मराठी साहित्य आणि आंबेडकरी साहित्य सामाजिक सांस्कृतीक चळवळ Role | 2019-20 | International | 25-26 |
| 9 | Role of ICT Higher Education | 2019-20 | International | 27-32 |
| 10 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारा संदर्भातील योगदान | 2020-21 | International | 33-34 |
| 11 | डेमोफुन कवी:केतेन पिंपळापुरे | 2020-21 | National | 35-37 |
| 12 | संत चोखामेळा व सामाजिक समता | 2020-21 | International | 38-41 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | जागतिकीकरणात अभिव्यक्त झालेली आंबेडकरी कविता | 2020-21 | International | 42-46 |
| 14 | महात्मा जोतीबा फुले कृतीशील समाजचिंतक | 2020-21 | International | 47-49 |
| | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार चळवीविषयी मातृत्व | 2020-21 | International | 50-54 |
| 15 | आंबेडकरी चळवळीतील आंतरिक घुसमट व सवर्ण पाटलांनी केलल्या शोषणावर भाष्य करणारी 'तणकट' कादंबरी मराठी संशोधन पत्रिका | 2021-2022 | मराठी संशोधन पत्रिका UGC Cara Listed | 56-58 |
| 16 | 'वादळवारा'वामनदादा कर्डक | 2021-22 | UGC Cara Listed | 65-67 |
| 17 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीचे सजग भाष्यकार | 2021-22 | CHAPTER | 68-71 |
| 18 | दंभ आणि भ्रामकतेपासुन कवितेला दुर ठेवणारा कवी रोहन नागदिवे | 2022-23 | International | 74-78 |
| 19 | यशवंतराव चव्हाण यांचा राजकीय प्रवास | 2022-23 | International | 79-84 |
| 20 | वर्तमान स्थितीत आंबेडकरी चळवळीवर सजग व साक्षेप भूमिका घेणारा कविता संग्रह : 'अजुनही वेळ गेली नाही' कवयित्री :पुष्पा बोरकर | 2022-23 | International | 85-88 |
| 21 | मराठी समकालीन साहित्य विचारातील नवे प्रवाह | 2022-23 | International | 89-94 |
| 22 | प्रश्नांची मातृभाषा: मानवाच्या जीवनसंघर्षाचा सजग होकायंत्रच | 2022-23 | International | 95-102 |
| 23 | छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरण विषयक सजगदृष्टी | 2022-23 | International | 103-108 |

# आंबेडकरी कविता आणि सामाजिकता
## (यवतमाळ जिल्ह्यातील काही निवडक कवी)

प्रा.विक्रांत कृष्णराव मेश्राम
(मराठी विभाग प्रमुख)
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय – पुसद यवतमाळ

साधारणतः १९६० च्या शतकात दलित साहित्याचा प्रारंभ झाला. १९६० च्या दशकापूर्वी शोषित, पिडीत, अस्पृश्यांनी कथा कविता, कादंबरी, अभंगाच्या माध्यमातून साहित्य निर्मिती केली. त्या साहित्याच्या माध्यमातून सामाजिक जाणिवा, अन्याय–अत्याचाराच्या संदर्भात आवाज उजागर झाला पण पाहिजे तसा संघर्ष आस्तित्वासाठी झाला नाही. सामाजिक अन्याय–अत्याचार व शोषणाच्या विरोधात बंड झालेत. पण माणसाला माणुसपण बहाल करण्याकरिता संघर्ष झाला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानव मुक्तीच्या लढ्यासाठी संघर्ष केला व मानव मुक्त केला. शोषित–पिडीतांना मनूष्यत्व प्राप्त करुन दिले.

आंबेडकरी साहित्याने आत्मा–परमात्मा पूनर्जन्म, इतकेच नव्हे तर धर्म आणि परमेश्वर नाकारला ; आंबेडकरी साहित्याने माणसाला केंद्रबिंदु केले. परमेश्वरा त्यांचा माणसावर अधिक विश्वास होता. या देशातील पिडीत शोषित जे असह्य जीवन जगलेत, भोगलेत या विषम व्यवस्थेने त्याचे मूल्यमापन कुठेच केले नाही.

आंबेडकरी साहित्यिकांनी व चळवळीत राबणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपल्या व्यथा, वेदना, अन्याय, अत्याचारा विरुध्द विद्रोह केला व या देशातील विषमतावादी समाज व्यवस्थेला नकार दिला व याचे पर्यवसान आंबेडकरी साहित्यात झाले व त्यातल्या त्यात कवितेमध्ये अधिक प्रमाणात झालेले दिसून येते. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत यवतमाळ जिल्ह्याचे योगदान मात्र भरपूर आहे.

भारतीय समाजव्यवस्था विषमतेवर आधारित आहे. आर्यांची जसजशी सामाजिक कामे वाढत गेली तसतशी ती सामाजिक कामे पूर्ण करण्यासाठी चातुर्वर्ण्याची निर्मिती केली. गुणकर्मावर आधारित असलेली वर्णव्यवस्था ती जन्मावर आधारित केली. तेव्हापासून खऱ्या अर्थाने हिंदू धर्माचा ऱ्हास सुरु व्हायला लागला. बौध्द, जैन, पारसी, महानुभव, वैष्णव, शैव, शिखधर्म, असे अनेक धर्मांची, पंथाची व संप्रदायांची निर्मिती झाली.प्रत्येक माणसाला जातीच्या व धर्माच्या नावाखाली विभागण्यात आले. एवढेच नव्हे तर या देशातील शोषित, पिडीत, उपेक्षित बांधवाचे माणूस म्हणून सन्मानाने जीवन जगता यावे या करीता महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मानव मुक्तीच्या लढ्यासाठी चळवळ उभी केली व त्या चळवळीच्या माध्यमातून संघर्ष उभा केला. त्या चळवळीचे, संघर्षाचे पडसाद संपूर्ण विश्वात पसरले व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने साहित्याची निर्मिती केली. चळवळ आणि साहित्य ह्यांचे अतुट नाते आहे. शोषित समाजाने आपल्या समाजावर होणाऱ्या अन्याय, अत्याचारा विरुध्द विद्रोह केला, तो 'विद्रोह' म्हणजेच आंबेडकरी साहित्य होय. माणुस म्हणून सन्मानाने जीवन जगण्यासाठी शोषित, पिडीत समाजाने जो विद्रोह केला तो विद्रोह इतर कलाकृतीपेक्षा कवितांमध्ये अधिक प्रकर्षाने जाणवतो किंवा दिसून येतो.

''बाबासाहेब आपण ओंजळभर पाणी
उचलेत नि शतकाचे इतिहास कलथले
तेव्हाच या धरतीवर माणूस म्हणून माझे
शिक्कामोर्तब झाले''
(कवी : सागर जाधव – उमेड)

Scanned with CamScanner

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याच्या संघर्षाच्या माध्यमातून शोषित, पिडीत समुहांना माणुसपणाची जाणीव करुन दिली. या संघर्षाचे पडसाद साहित्यात जसे भारतात व भारताबाहेर पसरलेत तेच पडसाद अधिक तीव्रतेने यवतमाळ जिल्ह्यातील कवी सागर जाधव व इतर कवींच्या कवितांमधून प्रकर्षाने दिसून येते. सागर जाधवांनी या संघर्षाचे जे निरिक्षण केले ते अप्रतिम असे आहे. चवदार तळ्याच्या संघर्षाची सामाजिक विषमता सागर जाधवांनी आपल्या कवितेत केवळ शब्दबध्द केले नाही तर चळवळीत उभे राहून त्यांचे निरिक्षण केले. चवदार तळ्याच्या पाण्याच्या संघर्षातून शोषित-पिडीत वंचित मानवाचे मनुष्यत्व सिध्द केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षाने व चळवळीने या देशातील अभावग्रस्त माणसाला स्वतःचा चेहरा बहाल केला. स्वत्वाची जाणिव करुन दिली. तेव्हापासून या शोषित माणसाने आपल्या अन्याय-अत्याचाराविरुध्द आपल्या व्यथा-वेदना नकार कवितेच्या माध्यमातून मांडून चळवळ व साहित्याची निर्मिती केली.

"मुक्यांना वाचा फुटली
जाणिवा जागल्या
डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ऊर्जेनं
बिरसा मुंडाच्या उलगुलनानं
वारे क्रांतीचे वाहु लागले
वाकलेल्या मनाचे निखारे पेटु लागले"
(कवी : पी.डी.आत्राम पाडवी हुंकार)

कवी पी.डी. आत्राम हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीने इतके झपाटून गेले की, त्यांनी जातीपातीची संपूर्ण व्यवस्थाच नाकारली. आपलं कुटुंब फुले-शाहु-आंबेडकरी चळवळीत उभे करुन आयुष्यभर समाज उभारण्याची भाषा त्यांची कविता करताना दिसते. आंबेडकरी चळवळीकडे पाहण्याचा दृष्टीकोन, चळवळीच्या माध्यमातून साहित्याची निर्मिती व सामाजिक शोषणाविरुध्द पेटून उठण्याची जाणिव यवतमाळ जिल्ह्यातील कवींच्या कवितेत इतर जिल्ह्याच्या तुलनेत विशेषत्वाने जाणवते. कवी आत्राम व त्यांची कविता चळवळीतून निर्माण झाल्या आहेत. चळवळ-कार्यकर्ता-साहित्य यांचे अन्योन्य संबंध आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील कवी लक्ष्मिकांत घुमे यांनी 'भाकरीच्या शोधात' या दीर्घ कविता संग्रहातून भूक आणि भाकर माणसाला काय करायला लावते... भूक किती विदारक असते... ती सामाजिक जाणिव यवतमाळ जिल्ह्यात तीव्रतेने जाणवते.

तर,
तमाम मानवतावादी माणसातल्या माणसांनो
माझी आई सांगत होती
मी तिच्या पोटात होतो
तेव्हा पासून माझ्या घरी
भाकरीसाठी तमाशे होत होते
आणि घरातले सारेच जण
भाकरीचे तुकडे मोजून खात होते
(कवी – लक्ष्मिकांत घुमे – भाकरीच्या शोधात)
मी पार्लमेंटच्या छतावर भाकरीचे चित्र
लावल्याशिवाय सोडणार नाही.

(कवी – लक्ष्मिकांत तुमे – भाकरीच्या शोधात)

डॉ.बाबा
आपल्याकडेच आलोय बाबा,
इथं फार अवघड होत चाललय दिवसेंदिवस
वर्ग संघर्ष / वर्ण संघर्ष ही

(प्रभु राजगडकर येथून पुढे)

सारेच धर्मग्रंथ म्हणतात मला अस्पृश्य
मला देवालयातही प्रवेश नाही
माझा धर्मही मला माहित नाही

(वैशाली तेलंग – जागृती)

समारोप,

आंबेडकरी साहित्याने आत्मा–परमात्मा–पूनर्जन्म इतकेच नव्हेतर धर्म व परमेश्वर नाकारला आहे. आंबेडकरी साहित्याचा केंद्रबिंदु माणुस आहे. आंबेडकरी साहित्यिकांनी आपल्या व्यथा, वेदना, अन्याय, अत्याचाराविरुध्द विद्रोह केला व त्यांचे पर्यावसण आंबेडकरी साहित्यात झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे संघर्ष केले माणसाला माणुस म्हणून सिध्द करण्यासाठी मनुस्मृती दहन, चवदार तळ्याच्या संघर्ष असो, मंदिर प्रवेश या सर्व संघर्षाचे प्रतिबिंब आंबेडकरी साहित्यात उमटले तर चौदा ऑक्टोबर एकोणविससे छप्पनला तर बौध्द धम्माची दीक्षा घेवून बंदिस्त मानवाला मुक्त करुन मनुष्यत्व बहाल केले. धम्म दिला या देशातल्या तमाम शोषितांना डॉ.आंबेडकरांनी. सामाजिक, धार्मिक, मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले. माणसाला माणूस म्हणून सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार बहाल केला.

निष्कर्ष–

इतर जिल्ह्याच्या तुलनेत यवतमाळ जिल्ह्यात आंबेडकरी साहित्याची निर्मिती भरपुर झाली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे मुल्यांतर यवतमाळ जिल्ह्यातील कविच्या कवितेत अधिक प्रकर्षाने जाणवते. आंबेडकरांच्या चळवळीमुळेच या देशातील शोषित मानवमुक्त झाला. त्यांच्या चळवळीतून संघर्ष उभा राहीला. चळवळ कार्यकर्ता व साहित्य निर्मिती यांचा अन्योन्य संबंध आहे. आंबेडकरांच्या चळवळीने या देशातील शोषित समाजाला मनुष्यत्व व समाजत्व बहाल केले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळेच सामाजिक जाणिव इतर कलाकृतीच्या तुलनेत कवितेत अधिक तिव्रतेने जाणवते.

संदर्भ–


१) प्रा.सतोर मोरे – प्रस्तावना–निळंवंत कविता संग्रह, प्रकाशक–अध्य. आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन मंच, अमरावती
२) ज्ञान कांबळे– आंबेडकरी साहित्य– प्रकाशक–अध्य. आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन मंच अमरावती–बडनेरा
३) डॉ.यशवंत शेन्डे – अध्यक्षिय भाषण–आंबेडकरी साहित्य मेळावा–अकोला २६ एप्रिल २००१
प्रकाशक–ना.मु.कांबळे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, अकोला.
४) प्रभु राजगड – येथून पुढे– जागरुक प्रकाशन, चंद्रपूर
५) पी.डी.अत्राम – पहाडी डुंगर–देवयानी प्रकाशक, नवी मुंबई
६) लक्ष्मिकांत तुमे – भाकरीच्या शोधात–प्रकाशक–गीत ग्रीव–अंधेरी
प्रकाशक–ए.आय.वाय.एफ कार्यालय गोधीबार चौक वणी, जि.यवतमाळ


Scanned with CamScanner

७) [illegible] – [illegible]
[illegible] एक कार्यालय [illegible] चौक [illegible], जिल्हा–यवतमाळ

८) [illegible] – [illegible]

Assistant Professor
Smt. Vatsalabai Naik Mahila
[illegible] Pusad Dist. Yavatmal

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - 1 - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १. आंबेडकरी कवितेतील स्त्री जाणिव : यवतमाळ जिल्ह्यातील निवडक कवयित्री

05

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद, जि. यवतमाळ.

## प्रस्तावना/भूमिका

स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेमध्ये आंबेडकरी कविच्या कवितांचे योगदान महत्वपूर्ण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीकारी विचारांचा प्रभाव दलित स्त्री–पुरुषांवर पडून हा समाज परंपरेकडून परिवर्तनाकडे वळला. आंबेडकरी झंझावाताने, आंदोलनाने, लढयाने दलितांना आमुलाग्र बदलवून सोडले आणि त्याचे पडसाद साहित्यातूनही उठले. 1956 च्या धर्मांतराच्या चळवळीनंतर निर्माण झालेले दलितांचे साहित्य हा आंबेडकरी विचारांचा परिपाक होय. परंपरागत विचारसरणीला फाटा देऊन नव्या मार्गाने, नव्या मानसिकतेने वाटचाल आरंभिली या वाटचाली मधूनच आंबेडकरी कवितेची एक संपन्न परंपरा मराठी कवितेमध्ये पुढे आली.

महात्मा जोतीबा फुले आणि डॉ. बाबासाहेब यांनी या समाजाला दिलेला परिवर्तनाचा विचार जनसामान्यामध्ये प्रक्षेपित करून प्रामुख्याने समता, स्वातंत्र्य, बंधूता, सामाजिक न्याय आणि वैज्ञानिकता या पंचसूत्राचा प्रचार, प्रसार आणि प्रबोधन करणे या हेतूने या कवींनी कवितांची निर्मिती केली. जाती–धर्म –वर्ण आणि समाज–शिक्षण–राजकारण, अंधश्रध्दा, विषमता, निरक्षरता, दारिद्रयता, लाचारी, उपासमार अशा विविध प्रथा, परंपरेमधून होणारे शोषण आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीने मानवी मनामध्ये उभा केलेला स्वाभिमान आणि स्वसन्मान अशा वैविध्यपूर्ण विषयांचा समृध्द आशय यवतमाळ जिल्हयातील कविच्या कवितामधून प्रस्फूटीत होतांना दिसून येतो.

आंबेडकरी चळवळ–कार्यकर्ता–साहित्याच्या संदर्भात यवतमाळ जिल्हयातील आंबेडकरी कवितेतील स्त्री जाणीवांच्या संदर्भात काही निवडक कवयित्रींच्या कवितांमधून निर्माण झालेली स्त्री जाणिव इतर जिल्हयाच्या संदर्भात यवतमाळ जिल्हा महत्वपूर्ण आहे असे प्रकर्षाने जाणवते. यामध्ये वैशाली तेलंग, सुनंदा गायकवाड, वनमाला भालेराव, मनिषा कांबळे, पुष्पा ठमके, संघमित्री टेंभूर्णे, धम्ममित्रा, प्रतिभा मेश्राम, सुमनताई मनवर, प्रा. अनिता कांबळे, रत्नमाला बनसोड, पौर्णिमा भगत.

आंबेडकरी महिलेची कविता ही 'स्व' कडून समाजाकडे निघालेली आहे. हे माझ्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. कारण आई म्हटल्यावर तिच्या वाटयाला येणाऱ्या यातना, हाल–अपेष्टा यामध्ये अनेक वर्ष ही कविता अडकलेली होती. ती तेथून बाहेर पडलेली आहे. ती रस्त्यावर आली आहे. चळवळीपर्यंत पोहचलेली आहे. आणि सगळयात महत्वाचे म्हणजे ती आंबेडकरवादी झालेली आहे. आता आंबेडकरी कवयित्री विषमतावादी समाजव्यवस्थेतील ठेकेदारांना निक्षून सांगत आहे.

युवकांनो,
सांभाळून पुढे चला

06

उजेड फार झाला आहे
अंधाराच्या कुशी मध्ये
प्रकाश जन्माला आला आहे.

(जगणं – वैशाली तेलंग)

"तुम्ही बोलत का नाही?
ही अशी कोणी लावली
तुमच्या तोंडाला टाळे
संपत्तीचा आणि जमिनीचा शोध लावणाऱ्या तुम्ही
कोणी हिरवला तुमचा मालकी हक्क"

(वैशाली तेलंग)

म्हणजेच एकीकडे समाजातील अन्याय–अत्याचार करणाऱ्यांना 'घुबडांनो' असे संबोधून निर्वाणीचा इशारा देतांना दिसतात तर दुसरीकडे आपल्या समाजबांधवांनी आता बोलले पाहिजे असा आशावाद देखिल व्यक्त करतांना दिसतात.

आंबेडकरी कविच्या कवितांमध्ये ग्रामीण नागरी, समाजालाच नव्हे तर नागरी समाजालाही प्रभावित करण्याचे सामर्थ्य असून मानवी जगण्याला आणि जीवनाला सम्यक आकार देण्याच्या, धडपडीतून या रचना साकार झाल्या आहेत. या आंबेडकरी रचनांमधून बदलत्या समाजवास्तवाचे भान करुन देणारे, त्यांचा परिणाम व प्रभावाचे संवेदन टिपणारे, त्यावर प्रतिक्रीया देणारे हे कवी खऱ्या अर्थाने जनजीवनातील लोक प्रबोधनकार आहेत असे दिसून येते. काव्यातून लोकसंवाद, लोकसंवादातून लोकप्रबोधन आणि लोकप्रबोधनातून लोकपरिवर्तन अशा तऱ्हेने समाज मनाला उद्युक्त करणाऱ्या या कवयित्रीच्या काव्यकर्तृत्व निश्चित लक्षवेधी आहे.

ज्या देशामध्ये धर्म व धर्मांभिमानी पंडित स्त्रीयांचे स्त्रीत्व धर्माच्या नावाखाली नाकारतात. 21 व्या शतकात देखिल स्त्रीयाना मंदिर प्रवेश नाकारला जातो ही अत्यंत अमानविय घटना आहे. जो धर्म स्त्रीयांचे स्त्रीपण नाकारतो आता स्त्रीयांनी अशा धर्माला व धर्मग्रंथानाच नाकारले पाहिजे.

"अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी
आपणच आता आले पाहिजे पुढे
अन्याय, अत्याचाराच्या विरोधात
उभारले पाहिजे क्रांतीकारी लढे

(जगणं)

जो धर्म स्त्रीयाची अस्मिता नाकारतो आता अशा धर्मा विरुध्द, धर्ममार्तंडा विरुध्द क्रांतीकारी लढे उभारले पाहिजे असा आशावाद व्यक्त होतांना दिसतो. तर कवयित्री वनमाला भालेराव म्हणतात.

काळोखाच्या गर्भात
जे खिजलेत–झिजलेत
त्यांच्यासाठी प्रकाश पेरु

विषमतेची रात्र संपविण्या
चला क्रांतीची मशाल धरू

( निळ्या पहाटेतील पक्षी – वनमाला मालेराव)

माणसाचे माणूसपण जपणारी तर्कनिष्ठा, आणि समाजात माणसाची प्रतिष्ठा स्थापन करण्यासाठी धडपडणारी कवितेतील भावनिष्ठा सद्यकाळ परिसरातल्या मानवी मनामध्ये रुजली आहे. परिवर्तनाच्या प्रेरणेतल्या या कवयित्रींच्या कवितेचा वारसा बाबासाहेबांच्या विचारांना प्रमाण मानून या परिसरातल्या [illegible] आंबेडकरी कवींनी पुढे नेला आहे.

हजारो वर्ष ही माणसं
गुलामीच्या पिंजऱ्यात सडत होती
अन्याय–अत्याचारात भाजून
रात्र–दिवस रडत होती
त्यांच्या जीवनात आंबेडकर
नावाचा प्रज्ञावंत महासूर्याने
उजेडाची दालने उघडली
आणि ती पिंजऱ्यातील माणसं
आता त्या प्रज्ञासूर्याच्या प्रेरणेने
फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून
उड्डाण घेत आकाशाला
गवसणी घालत आहे.

(उड्डाण – मनिषा कांबळे)

पाण्यासाठी टाहो आमचा
समाज फिरती दारोदार
व्यवस्थेला सुरुंग लावून
पेटविले महाडचे तळे चवदार

(क्रांतिगान – पुष्पा तगले)

1956 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्विकार केल्यानंतर दलित मुक्ती चळवळीला नवे सांस्कृतिक भान आले. त्याचा परिणाम साहित्य, कला, शिक्षा व तत्वज्ञान या क्षेत्रांबरोबरच अत्यंत तळातल्या जनमानसाची निर्मिती असलेल्या या कवयित्रींच्या कवितांमध्येही त्याचा परिणाम आणि प्रभाव दिसून येऊ लागला. आंबेडकरी कवींची कविता ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित मानवमुक्ती लढ्यातील आंबेडकरी विचार सामर्थ्यावर भाष्य करीत असून व त्याची समुचितता आणि काल–सापेक्षता दर्शविणारी आहे. जाती अजून सबुत आहेत जाती–जाती, धर्मा–धर्मा मुळे माणूस आज एकमेकांचा द्वेष करीत आहेत.

डॉ दादाराव पाटील, डॉ यशाभाई



Scanned with CamScanner

08

ती गावकीण माणकी, ती पुरुषवीण धनगरीण
जाती शत्रुत आहेत तोवर
गावात आडनावाची गरज नाही

(कविता – जात, प्रा. अनिता कांबळे)

तु एक जन्म घेवूनी मानवाचा उध्दार केला
रंगारंगी झालेल्या समाजाचा तु मसीहा झाला

(तुज नमन हे भिमराया – पौर्णिमा भगत)

आंबेडकरी कवी हे संघर्षातून जन्मतात. ते जनमानसातून सहजतेने तयार होत नाहीत. कारण त्यांना मिळालेली लेखणीची उर्जा ही केवळ निसर्गदत्त असत नाही. शोषण समाजवास्तव बदलविणारी क्रांतीकारी प्रेरणा आंबेडकरी कवी धारण करीत असतो.

समाजाच्या ठेकेदारांनो, आता तरी
दारोदारी सत्तेची भिक मागणे बंद करा

(मरण स्वस्त होते – सुनंदा गायकवाड)

कुठलीही निर्मिती ही निर्हेतुक नसते. तिचे प्रयोजन निश्चित असते. नियोजित हेतू, सिध्दासाठी उपलब्ध असणाऱ्या तमाम माध्यमांचा उपयोग माणूस करीत असतो. त्याला स्वतःला व्यक्त व्हावेसे वाटले तेव्हा तो इतर माध्यमांप्रमाणे कवितेचेही माध्यम स्वीकारले परंतु माध्यमाच्या स्वीकारापुरताच हा प्रश्न नसतो, तर माध्यमाने देखिल आपल्याला स्विकारणे गरजेचे असते. असे क्वचित घडते. कवी हा केवळ नसतो. तो समाजात असतो; तेव्हा एक निखळ माणूस असतो आणि चिंतनात असतो तेव्हा तो कवी तर असतोच पण एक तत्वज्ञही असतो. सर्जकाची एक बाजू ही तत्वज्ञाचे आहे. म्हणूनच तत्वज्ञकवी अशी संज्ञा काही कवींच्या संदर्भात मराठीमध्ये वापरली जाते.

आंबेडकरी कवितांमधून बुध्दकालीन सामाजिकता, आंबेडकरपूर्व दलित जीवन व बुध्द धम्म स्वीकारामागचे तत्वज्ञान आणि मानसिकता यांवर भाष्य केले ते मराठी समाजाला परिवर्तनसमुखता व सामाजिकता प्रदान करणारे आहे. या अनुषंगाने यवतमाळ जिल्ह्यातील आंबेडकरी कवींच्या कवितांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

आंबेडकरी कवितेचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यामुळे दलित माणसात आला. त्याच्या ठिकाणी आत्मसन्मान, आत्मविश्वास, आत्मावलंबन बाबासाहेबांमुळेच निर्माण झाले. मुक्तिलढ्याचा आणि दलित कवितेचा अतिशय जवळचा संबंध आहे.

साहित्य आहे म्हणूनच संस्कार आहेत. आणि संस्कार आहेत म्हणूनच संस्कृती आहे. संस्कार आणि संस्कृती यांच्या संवर्धनाची जबाबदारी साहित्याला स्विकारी लागते. आंबेडकरी साहित्यानेच ही जबाबदारी पार पाडली आहे/पाडत आहे. साहित्य हे केवळ संस्कार आणि संस्कृतीचे संवर्धनच करते असे नाही, तर संस्कार आणि संस्कृतीला नवे रुप, नवी संरचना आणि नवे मन साहित्यच बहाल करते. साहित्यच माणसाला माणूसपण आणि समाजाला समाजपण देते. यातून समाजाला आणि त्या समाजाचे घटक असणाऱ्या माणसाला त्याच्या स्वत्वाची ओळख देते.' साहित्य आनाळातून पडत नाही हे आपण समजेच जाणतो. ते याच समाजाचे सृजन आहे. ज्यावेळी माणसाला



Scanned with CamScanner

स्वतःला व्यक्त व्हावेसे वाटले, तेव्हा पासून ही लोकपरंपरा आज आधुनिकतेचे नवे रूप पुढे घेऊन आली आहे. हा प्रवास निरंतर आहे समाजाच्या गतिशीलतेशी याचे नाते आहे. 09

निष्कर्ष

- स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेमध्ये आंबेडकरी कविंचा कवितांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.
- १९५६ च्या धर्मांतराच्या चळवळीनंतर निर्माण झालेले दलितांचे साहित्य हा आंबेडकरी विचाराचा परिपाक होय.
- आंबेडकरी महिलांची कविता ही 'स्व' कडून समाजाकडे निघालेली आहे.
- स्त्रियांनी धर्म व धर्मग्रंथ नाकारले पाहिजे.
- आंबेडकरी कवी हे संघर्षातून जन्मतात.

संदर्भ ग्रंथ


- दलित साहित्य –वेदना व विद्रोह – भालचंद्र फडके.
- आंबेडकरी साहित्य – उत्तम कांबळे
- तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन
- अध्यक्षीय भाषण – प्रा. सतेश्वर मोरे
- नीलपंख कविता संग्रह प्रस्तावना – प्रा. सतेश्वर मोरे
- अंतः स्तोम–कवितासंग्रह प्रस्तावना – प्रा. केशव मेश्राम
- परिवर्तन काव्यसंग्रह – नाना बनसोड
- कविता संग्रह –निळ्या घरट्यातील पक्षी – वनमाला मालेराव
- कविता संग्रह – मरण मानवतेचे – सुनंदा गायकवाड
- कविता संग्रह – सम्यक काव्ययात्रा – पुष्पा हगके
- सूर्याचा सूर्य – मनिषा कांबळे
- तगणं – वैशाली तेलंग


Assistant Professor
Smt. Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, Pusad Dist Yavatmal

ISSN : 2348-7143
September-2019

# ग्रामीण भागात बँकींग क्षेत्रात रोकड विरहीत व्यवहार प्रणालीचा वापर 10

डॉ. व्ही. एस. इंगळे
वाणिज्य विभागप्रमुख
गो. सी. गावंडे महाविद्यालय, उमरखेड

प्रा. व्ही. के. भैसारे
मराठी विभागप्रमुख
वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद

**प्रस्तावना –**

रोकड विरहीत अर्थव्यवस्थेची संकल्पना माहिती तंत्रज्ञानामुळे आपले जीवनमान व कार्यपध्दती पूर्णपणे बदललेली आहे. इंटरनेटच्या माध्यमातून आपण मोठ्या प्रमाणावर व्यवहार पार पाडत आहोत. चलन बदलानंतर देश कॅशलेश होण्याकडे वाटचाल करत आहे. मात्र त्याचबरोबर या प्रक्रियेत गोंधळाचे वातावरण दिसत आहे. समाजामध्ये रोकडविरहीत व्यवहाराची संख्या वाढत आहे. तसेच त्यामुळे सामान्य जनतेच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. लोकांनी आणखीन जास्त व्यवहार कॅशलेश करावेत यासाठी सरकारकडून काही सवलती देण्यात आलेल्या आहेत. हा महत्वाचा निर्णय आहे. कॅशलेश आर्थिक व्यवहार डिजीटल इंडिया ही संकल्पना जेव्हा जाहीर करण्यात आली तेव्हाच आपली अर्थव्यवस्था ही रोकड विरहीत असावी हे ध्येय शासनाने डोळ्यासमोर ठेवले होते. आतापर्यंतचे निर्णय या संकल्पनेला अनुसरूनच घेण्यात आलेले आहेत. नोटबंदी नंतर बदललेला आर्थिक व्यवहार सुरळीत होण्यासाठी आपल्याला कॅशलेश व्यवहार करण्याची आणि त्यामध्ये वाढ करण्याची गरज दिसत आहे.

८ नोव्हेंबर २०१६ नोटबंदीच्या निर्णयाच्या विचार करता लोकांनी कॅशलेश व्यवहाराकडे लवकरात लवकर वळावे हा त्या मागचा हेतू असावा असा अंदाज तज्ञांनी व्यक्त केला. क्रेडीट कार्ड, डिबीट, इंटरनेट बँकींगचा वापर चांगल्या पध्दतीने व्हावा यासाठी जनजागृती कार्यक्रम आखलेले आहेत.माहिती तंत्रज्ञानामुळे इंटरनेट वरून खरेदी, ई लिलाव, बि.टु.बी. बि.टु. सी. सी.टु.सी, जी.टु.सी., या सर्वांचा उपयोग होण्याकरिता करण्यात येत आहे. वर्षातील ३६५ दिवस २४ तास ग्राहकांना आपले व्यवहार देशाच्या किंवा जगाच्या कानाकोपऱ्यात करता येतात. त्यासाठी कार्यलय उघडण्याची वेळ पहावी लागत नाही. तसेच इलेक्ट्रीक बिल, रिचार्ज हे सर्व कामे करण्यासाठी किंवा व्यवहार करण्यासाठी घरच्या बाहेर जावे लागत नाही त्यामुळे वेळाची, श्रमाची , खर्चाची बचत होते. कॅशलेश व्यवहारामध्ये खालील सेवा उपलब्ध केल्या जातात.

१. खात्यातील शिल्लक तसेच खात्याचे विवरण लगेच ग्राहकांना मिळते.
२. बिलाच्या रकमेच्या ऑनलाईन शोधन करून रकमेचे स्थानांतरण करणे.
३. ग्राहकांना विशेष सवलत प्राप्त होते.

**संशोधन पध्दती –**

संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नविन तत्वे अथवा तथ्य शोधण्यासाठी आणि जुने तथ्ये व तत्वे परिक्षणासाठी केलेल्या चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास होय. संशोधन किंवा अनुसंशाधने ही एक भौतीक प्रक्रिया आहे. यामुळे जुन्या ज्ञानातील उणिवा कमी करून ज्ञानात नवी भर घातली जाते. संशोधकाला

संशोधन करतांना संशोधना विषय,क्षेत्र, व व्याप्ती निश्चत करावी लागते. त्यादृष्टीने प्रस्तुत संशोधनासाठी, ' ग्रामीण भागात बँकीग क्षेत्रात रोकड विरहीत व्यवहार प्रणालीचा वापर ह्य ' विषय निवडला आहे.

संशोधनाचे उद्देश –

१. रोकड विरहीत अर्थ व्यवस्थेचे बँकीग क्षेत्रावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.
२. रोकड विरहीत अर्थ व्यवस्थेचा वापरातील नविन तंत्रज्ञानाचा आढावा घेणे.
३. रोकड विरहीत वापरा विषयी माहिती समजून घेणे.

विषयाची मांडणी –

कॅशलेश अर्थव्यवस्थेची व्याख्या –

"रोजच्या व्यवहारामध्ये रोख रकमेचा वापर न करता धनादेश, क्रेडीट कार्ड, डिबीट कार्ड, इंटरनेट बँकीग, ई पेमेन्ट बँक, मोबाईल व्हालेट, इत्यादी डिजीटल माध्यमाचा वापर करणे म्हणजेच कॅशलेश अर्थव्यवस्था होय."

'इलेक्ट्रॉनिक साधनाच्या सहाय्याने आर्थिक व्यवहार करण्यात येतात यालाच कॅशलेश व्यवहार असे म्हणतात.'

संकल्पना –

केंद्र सरकारने ८ नोव्हेंबर २०१६ रोजी विमुद्रीकरण धोरणाची घोषणा केली. त्याप्रमाणे यामागील अर्थ व्यवस्थेतील काळा पैसा बाहेर काढणे, नकली नोटाचा प्रसार रोकने, दहशतवाद्यांना आळा घालणे, ह्य हेतू असल्याचे सरकारने स्पष्ट केले. या नंतर रोकड विरहीत अर्थव्यवस्था निर्माण करणे हे नविन उद्दिष्ट या धोरणाशी जोडले गेले. रोकड विरहीत व्यवहारामध्ये रोख रकमेचा वापर न करता धनादेश, क्रेडीट कार्ड, डिबीट कार्ड, इंटरनेट बँकींग, पेमेन्ट बँक, मोबाईल व्हालेट,ई – तंत्रज्ञानाचा आदी डिजीटल माध्यमाचा वापर करणे अभिप्रेत आहे. इंटरनेट किंवा इतर कुठल्याही डिजीटल प्रणालीचा बहुतांश भारतीयांच्या जीवनाचा भाग बनलेली नाही. संगणक साक्षरतेचा अभाव, अपुरी माहिती तंत्रज्ञान, आधारभुत सरंचना व सर्वात महत्वाची पण दुर्लक्षीत बाब म्हणजेच सायबर सुरक्षा यामुळे भारतीयाचे सर्व ई व्यवहार न करण्याकडे कल असतो. अशा पध्दतीचा रोकड विरहीत अर्थव्यवस्थेत असणारे फायदे पुढील प्रमाणे दिसून येतात.

बँकींग क्षेत्रातील फायदे

१. भ्रष्टाचाराला आळा – भारतासारख्या अफाट लोकसंख्या असलेल्या देशातील भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवणे कठीण आहे. भारतामध्ये मोठ्य प्रमाणात भ्रष्टाचार रोख स्वरूपात होतो. कॅशलेश अर्थव्यवस्थमुळे अशा भ्रष्टाचाराला आळा बसतो.
२. वेळेची बचत – ग्राहक बँकीग कार्यालयामध्ये जावून व्यवहार करण्यासाठी खुप वेळ लागतो. परंतु कॅशलेश मुळे ग्राहक घर बसल्या आपले व्यवहार पूर्ण करतात.
३. सोयीस्कर – बँकीग क्षेत्रामध्ये ऑन लाईन सर्वर कधीही बंद होत नाही.
४. कार्यक्षमता – ग्राहक एकाच ठिकाणी बसून आपली बँक विषयक कार्य कार्यक्षमतेचें आणि जलद गतीने करू शकतात.
५. जलद व्यवहार क्रिया – कॅशलेश व्यवहारामध्ये ग्राहक आपली बँकीग कार्य अगदी सहज व जलद गतीने आपले व्यवहार करू शकतात. एका माउस क्लिक वर कुठलाही वेळ न गमावता आपल्या बँकेशी व्यवहार करतात येतात.



200

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 197(B) : Emerging Innovative Trends in Higher Education
ISSN : 2348-7143
September-2019

12

बँकींग क्षेत्रातील तोटे –

१. नागरीकांच्या मनाती भिती – कॅशलेश व्यवहारामध्ये ऑन लाईन बँकींग उपयोगाबाबत लोकांच्या मनात एक प्रकारची भिती निर्माण झालेली आहे. आपल्या ऑन लाईन बँकींग कार्य करता येतील किंवा नाही अशी भिती निर्माण झालेली आहे.
२. समजण्यास कठीण अशी पध्दती – ग्रामीण भागातील बँकेच्या शाखेत जावून व्यवहार करण्या इतपत ही पध्दती साधी व सोपी नाही. ऑन लाईन कॅशलेश व्यवहार करण्याच्या पध्दती समजून घेणे आवश्यक आहे.
३. बँकींगच्या सॉफ्टवेअर मध्ये वेळोवेळी बदल – सुरक्षितेच्या दृष्टीने बँकींग क्षेत्रात हा बदल नेहमीच होत असतो तो समजून घेणे सुरक्षीतेच्या दृष्टिकोनातून काळजी गरज असते.
४. सायबर गुन्हयाची शक्यता – सर्व सामान्य जनतेमध्ये याविषयी असणारे अज्ञान हीच गुन्हे ताकद दिसून येते.
५. डिजीटल साक्षरतेचा अभाव – कॅशलेश अर्थव्यवस्थे बनविण्यासाठी लोकांमध्ये डिजीटल साक्षरता असणे महत्वाचे आहे.

निष्कर्ष –

कॅशलेश अर्थव्यवस्था बनविण्यासाठी साक्षरता असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर डिजीटल साक्षरता असणे महत्वाचे आहे. देशातील सायबर सुरक्षीतेत प्रकरणे हाताळण्यासाठी स्वतंत्र व्यापक स्वरूपाचे कायदेशिर अभिकरण असणे आवश्यक ठरते. आर.बी.आय.,सेबी, व इतर महत्वपूर्ण संस्थेमध्ये सायबर सुरक्षा कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. भारत सरकारने सायबर सुरक्षेची जपणूक करण्याचा प्रयत्नाचा भाग म्हणून सरकारने जुलै २०१३ मध्ये राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण जाहिर केलेले. कॅशलेश व्यवहारामुळे संपूर्ण देशाची अर्थ व्यवस्था ही भरभराटी दिसून येते. सर्व व्यवहार अतिशय पारदर्शक झालेले दिसून येतात. त्यामुळे आपल्या देशाच्या हिताचे होत असल्याचे या संशोधना अंती दिसून येते.

शिफारशी –

१. ग्रामीण भागातील जनतेला कॅशलेश व्यवहाराचे फायदे समजून सांगणे
२. ग्रामीण भागातील जनतेला डिजीटील पेमेटला प्रोत्साहन देण्यासाठी क्रेडीट कार्ड, डिबीट कार्ड, वापरावरील व्याज दर कमी करण्याचे पाऊल उचलावे
३. डिजीटील सुरक्षतेचे ज्ञान देण्यात यावे.
४. कॅशलेश व्यवहाराव्दारे शासकीय योजनाचे नियोजन करण्यात यावे.

संदर्भ ग्रंथ सूची –

१. ई कॉमर्स ची मूलतत्वे, एस.एम. कोलते, पिंपळापूरे ॲण्ड कंपनी प्रकाशन नागपूर आवृत्ती, जुन २००९
२. योजना अंक फेब्रुवारी २०१७
३. मुद्रा अधिकोषण आणि सार्वजनिक वित्त ए.आर. रायखेलकर, डॉ. बि.एच. दामजी , विद्या बुक प्रकाशन , औरंगाबाद
४. www.economy.com.
५. www.google.com
६. दैनिक लोकमत, २०१७

Assistant Professor
Smt. Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, Pusad Dist Yavatmal.



Scanned with CamScanner

# आंबेडकरी कविता : जागतिकीकरण

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम

13

## प्रस्तावना

भारतीय समाजव्यवस्थेचा आपण जेव्हा अभ्यास करतो तेव्हा एक गोष्ट प्रकर्षाने [illegible] ती ही की, भारतीय समाजव्यवस्था ही चातुर्वर्ण्यावर आधारित होती. हजारो वर्षांपासून [illegible]तावादी समाजव्यवस्थेतील सवर्णांनी ह्या देशातील शुद्रातिशुद्रांचे मानव म्हणून [illegible] जीवन जगणे नाकारले. त्यांचे मुलभुत नैसर्गिक गरजाही नाकारल्या होत्या आणि [illegible] समाज उपेक्षित, पिढीत राहिला त्याचा सर्वांग पद्धतीने शोषणच होत राहिले.

[illegible] उपेक्षित, शोषित, पिढीत माणसाला माणूस म्हणून सन्मानाने जीवन जगण्याचा अ[illegible] [illegible]गत सिद्धार्थ गौतम बुद्धांनी आपल्या आचरणातून व प्रबोधनातून दिला. सवर्ण [illegible] नाकारलेल्या माणसाला तथागतांनी आपल्या संघात प्रवेश दिला व उपेक्षित मानवाला [illegible] म्हणून स्वतंत्र ओळख करुन दिली. परंतु इ.स. 186 वर्षी वैदिक धर्माभिमानी, [illegible]डित पुष्यमित्र शुंगानी षडयंत्र रचून बृहद्रथ याचा वध केला. तेव्हापासून वैदिक [illegible] [illegible]पंडितानी या भारत भूमित आपले पाय घट्ट रोवले. बृहद्रथ हा या देशातला शेवटचा [illegible] ज्याने बौद्धधम्माला राजश्रय दिला होता.

[illegible]गत गौत्तम बुद्धाच्या कालखंडापासून क्रांती–प्रतिक्रांती तिव्र पद्धतीने उदयास [illegible] तथागत गौत्तम बुद्ध, चार्वाक यानंतर या देशात 12 व्या शतकाच्या उत्तरार्धात व 13 [illegible]काच्या पूर्वार्धात अनेक पंथ, संप्रदाय, धर्म उदयास आले. वारकरी संप्रदाय, महानुभाव [illegible] इतर या पंथ – संप्रदायांनी या देशातून विषमतावादी जातीव्यवस्था नष्ट व्हावी [illegible] फारसे काही केलेले नाही. पंढरपुरच्या वारी टाळ, मृदंगामध्ये शुद्रातिशुद्र सहभागी [illegible] तेथून आपल्या गावात – घरी परतल्यानंतर ते आपआपल्या जातीच्या, वर्णाच्या [illegible] [illegible]डायला त्यांची मानसिकता नाही ते आजपर्यंत. महानुभावपंथाना विषमतावादी [illegible]व्यवस्था नष्ट व्हावी यासाठी काहीही केलेले नाही. 16 व्या शतकात संत तुकारामांनी [illegible] अभंगाच्या माध्यमातून विषमतावादी समाजव्यवस्थेविरुध्द विद्रोह पेटविला. 16 ते 19 [illegible]काचा आपण जेव्हा विचार करतो तेव्हा छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतीबा फुले, [illegible]बाई फुले, संत कबीर, कर्मयोगी गाडगेबाबा ते महामानव डॉ. बाबासाहेबांपर्यंत ही मोठी [illegible] आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षित, पिढीत व अभावग्रस्त, शोषणात व गुलामगिरीत [illegible] असलेल्या मानवाला आपल्या लढ्यातून व संघर्षातून चेहरा, अस्मिता बहाल केली. इ. [illegible] ला अस्पृश्य बांधवांना बौध्द धम्माची दीक्षा देऊन उपेक्षित मानवाला स्वतंत्र ओळख, [illegible] स्वतंत्र अस्मिता बहाल केली आणि तेव्हा पासून या अस्पृश्य बांधवांवर [illegible] अत्याचारात, शोषणात अधिक भर या देशातील सवर्णांनी दिला, गावातून [illegible]



Scanned with CamScanner

बहिष्कृत करणे, सार्वजनीक पाणवठ्यातून हद्दपार करणे, मारणे-झोडपणे, नग्नधिंड काढ हया सर्व प्रकाराने उच्चांक गाठला होता. धम्मांतरित बौद्ध गावात आल्यावर त्याने पंचशी ध्वज लावणे, जयंती, मिरवणूक काढणे सुरु केले. तेव्हापासून त्यांच्या अत्याचारात अधिक भ पडत गेली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षामुळे व आंदोलनामुळे कार्यकर्ता घडत गेला आपल्यावर व आपल्या समाजावर होणाऱ्या अन्याय – अत्याचारा विरुद्ध बंड करण्यास स होऊ लागला व आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार, शोषणाविरुध्द साहित्याच्या म यमातून विद्रोह पेटवू लागला व सन्मानाने जीवन जगण्यासाठी धडपडू लागला. साधारण 1960 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणा स्विकारुन दलित साहित्याची निर्मिती झाल 1990 च्या दशकात-दलित साहित्य या संकल्पने ऐवजी आंबेडकरी साहित्य अशी जा स्वीकारली आणि याच दशकात जागतिकीकरणाची प्रक्रिया भारतात सर्व साधारणपणे सु झाली. या जागतिकीकरणाचा सर्वाधिक जास्त वाईट परिणाम सर्वहारांच्या जीवनमाना पडला व त्याचे पडसाद साहित्यातून प्रकरणे, कवितेत अधिक प्रमाणात प्रकटले.

खुल्या अर्थव्यवस्थेमुळे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, घडामोडी मोठ्या प्रमाणात प्रभाव पडला व समाज मानवतेपासून दूर जाऊ लागला. जगतिकीक पहिल्यांदा आंबेडकरवाद्यांचे झालेलं आहे. वस्तूत जागतिकीकरण नंतर झालं, आंबेडकरवाद्या जागतिकीकरण झालं ते बुध्दाच्या काळापासून पहिल्यांदा इथल्या धम्माचा संदेश घेऊन इथल भंते सर्व जगभर पसरले. आणि 'बुद्धम् सरणं गच्छामी' हे बुद्ध तत्वज्ञानाचे जागतिकीक होते. जागतिकीकरण आपण कधिच घाबरत नाही. कारण आपण जागतिकीकरण घडव आपण इथल्या बोधीवृक्षाची फांदी नेऊन श्रीलंकेमध्ये लावली, आणि श्रीलंकेतील बोधीवृक्षा फांदी नागपूरच्या दीक्षा भूमिवर लावली. आपल्याएवढे जागतिकीकरण कुणी केलेलं नाही. त्य निग्रोधीनात सांगण्यापासून, धम्माच्या प्रसारापासून, बोधी वृक्षापर्यंत आपण जागतिकीक केलेलं आहे. या सगळ्या गोष्टींना महत्व आहे. म्हणून उद्याच्या काळातील साहित्यिका जबाबदारी वाढली आहे असं मला वाटतं. साहित्यिकांचे महत्व का वाढले? जेव्हा व्यवस्थ कुजवायला लागते. माणूस घाण व्हायला लागते. तेव्हा कवी जन्माला येतात. व्यवस्थ बदलविण्यासाठीच ते जन्माला येतात. व्यवस्था बिघडले तेव्हा, अधिक जबाबदारने वागण्या अधिक लिहिण्याची गरज असते. नुसतेच दुःखाचे जलसे भरविण्याची नाही तर दुःखावर म करण्याची गरज असते. नेमकं जागतिकीकरणात जो काही परिणाम झाला त्याचे पडसाद आंबेडकरी कवितेतून दिसून पडतात.

आंबेडकरी साहित्याला भाषेच्या, प्रांताच्या आणि देशवाशीच्या देखिल मर्यादा नाही किंबहूना या देशामध्येच नव्हेतर जगातल्या कोणत्याही देशात आंबेडकरी प्रेरणेनं लिहिणा लेखक हा आमचा नातेवाईक आहे. शोषणाचा / गुलामीचा संदर्भ ज्या साहित्याला असेल आणि त्यातून मुक्तिची जाणिव आंबेडकरी प्रेरणेने त्याला झाली असेल असे जगातल

कोणतेही साहित्य हे आंबेडकरी साहित्य आहे. यावर आमचा ठाम विश्वास आहे. आपल्या साहित्याला आपण आंबेडकरी साहित्य म्हटल्याने आपण आपल्याला सीमित करीत नाही तर त्याने आपल्याला अधिक स्पष्ट, निखळ आणि स्वच्छ करुन जगाच्या समोर उभे करीत आहोत. जगाला आपली नवी ओळख देत आहोत. आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य ते आंबेडकरी साहित्य ही आपली स्पष्ट भूमिका असली पाहिजे.

अविरत संघर्ष करणारी विचारधारा हे आंबेडकरी साहित्याचे तत्वज्ञान होय. अन्याया विरोधात शांत बसणे म्हणजे स्वतःला गुन्हेगाराच्या रांगेत उभे करणे असाच त्याचा अर्थ आहे. जागतिकीकरणात माणूस माणसांपासून दूर जात आहे, संवादहीन होत आहे. सामाजिक मूल्य नष्ट होत असतानाच आंबेडकरी साहित्यिक पेटून उठतो व जागतिकीकरणाचे दुष्परिणाम आपल्या कवितांच्या माध्यमातून व्यक्त करतो व एका नव्या संघर्षाची गरज आहे असे अभिव्यक्त करतो.

निष्कर्ष : भारतीय समाजव्यवस्था चातुर्वर्ण्यावर आधारित आहे.

1. उपेक्षित मानवाला सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार तथागतांनी करुन दिला.
2. आपल्या संघर्षातून अस्पृश्य मानवाला अस्मिता डॉ. आंबेडकरांनी मिळवून दिली.
3. 1990 च्या नंतर आंबेडकरी संकल्पना स्विकारण्यात आली.
4. जागतिकीकरणाचा समाजातील मध्यम लोकांना अधिक फटका बसला.
5. जागतिकीकरणाचे होणारे वाईट परिणाम आंबेडकरी कवितेतून व्यक्त झाले आहे.

## संदर्भ


1. उत्तम कांबळे – जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न उर्जा श्रमिक मुखपत्र स्मरणिका. 2007.
2. उत्तम कांबळे – आंबेडकरी साहित्य – आंबेडकरी 3 जाने. 2008. साहित्य व संस्कृती संवर्धन मंच बडनेरा, अमरावती.
3. सतेश्वर मोरे – अध्यक्षीय भाषण – तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन, वर्धा दि. 2 जाने 2011.
4. वळी खैरे– अध्यक्षीय भाषण – दुसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन, 1 फेब्रुवारी 2009, पुलगाव जिल्हा वर्धा.
5. महेंद्र भवरे – चौदावे अ.भा.आंबेडकरी साहित्य संमेलन, यवतमाळ दि.23/24/25 नोव्हेंबर 2019.
6. सतिश वहांदे / के.वी. वराडे – दलित कवितेतील नवे प्रवाह, शोधनिबंध पुस्तिका 22 फेब्रु. 2013.
7. राजा ढाले – साहित्य विषयक भाषेचे अध्यक्षीय 29 एप्रिल 2012. नांदेड. 11 जानेवारी 2013 भंडारा.



प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख, वसंतराव नाईक महिला महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ





Scanned with CamScanner

Research Journal of India / Vol. 7 / Issue 7 / Jan. 2020 / Special Issue / p-ISSN 2349-9370
e-ISSN 2582-4848 / Peer Reviewed National Indexed Journal with Impact Factor 5.455 / 89

# आंबेडकरी साहित्य आणि सामाजिक परिवर्तन

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
(मराठी विभाग प्रमुख)
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद
vikrantmeshram1976@gmail.com मोबाईल: ८७८८७९१४६४

16

## प्रस्तावना

भारतीय सामाजिकता ही विषमतेवर आधारीत होती. एका ठराविक वर्गालाच लिहिण्याचा, वाचण्याचा अधिकार होता. संस्कृती ही देवभाषा आहे असे जाणिवपूर्वक पसरविण्यात आले होते. त्यामुळे संस्कृत भाषेत जी काही धर्मग्रंथ निर्मिले होते ते सर्व परमेश्वरानेच निर्मिली आहेत असा समज समाजात जाणिवपूर्वक लादण्यात आले होते. त्यामुळे येथिल शुद्रातिशुद्राचे सामाजिक, धार्मिक, राजकीय हक्केच नव्हे तर माणूसपणच ह्या विषमतावादी व्यवस्थेने नाकारले होते. विषमतावादी व्यवस्था केवळ माणसाचे माणूसपणच नव्हे तर माणसाचे सामाजिक असणे ही नाकारत होती. ह्या व्यवस्थेने येथिल माणसाचे माणूसपण नाकारले होते.

माणसाला माणूसपण मिळावेत, सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक समानता मिळावी ह्यासाठी या देशात मोठी परंपरा आहे हे आपण लक्षात घेणे अपरिहार्य आहे. तथागत सिध्दार्थ गौतम बुद्धापासून तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत ही परंपरा आहे. तथागत सिध्दार्थ गौतम बुध्दाच्या काळात थेरी गाथेच्या माध्यमातून समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा मौलीक मूल्यत्व आहे.

साहित्याचा समाजावर होणारा परिणाम ह्या संदर्भात आपण जेव्हा इतिहासाची पाने उलटवून पाहतो, तेव्हा एक गोष्ट लक्षात येते की, महात्मा जोतीबा फूले, सावित्रीबाई फूले यांनी निर्माण केलेल्या साहित्याच्या माध्यमातून समाजात जागृती होऊन अमुलाग्र बदल घडून आले. खर तर साहित्याच्या माध्यमातूनच समाजपरिवर्तन घडून येते. पण त्याहीपेक्षा आपण आंबेडकरी साहित्याच्या संदर्भात जेव्हा विचार करतो तेव्हा साहित्याचा समाजावर परिणाम झाला. त्याही पेक्षा आंबेडकरी साहित्य हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केले जन आंदोलनातून निर्माण झाले. इतर कलाकृतीपेक्षा आंबेडकरी कवितेच्या माध्यमातून समाजावर परिणाम झाला. कार्यकर्ता – आंदोलन, संघर्ष – साहित्य आणि सामाजिक परिवर्तन अशी मोठी परंपरा आंबेडकरी साहित्याची आहे.

साहित्यच माणसाला माणुसपण आणि समाजाला समाजपण देते या संदर्भात आंबेडकरी तत्वचिंतक, समिक्षक प्रा.सतेश्वर मोरे म्हणतात की, ''साहित्य आहे म्हणूनच संस्कार आहे, आणि संस्कार आहेत म्हणूनच संस्कृती आहे. संस्कार आणि संस्कृती याच्या संवर्धनाची जबाबदारी साहित्याला स्वीकारावी लागते. आंबेडकरी साहित्यानेच ही जबाबदारी पार पाडली आहे/पाडत आहे. साहित्य हे केवळ संस्कार आणि संस्कृतिचे संवर्धन करते असे नाही, तर संस्कार आणि संस्कृतिला नवे रुप, नवी संरचना आणि नवे मन साहित्यच बहाल करते. साहित्यच माणसाला माणुसपण आणि समाजाला समाजपण बहाल करते. यातून समाजाला आणि त्या समाजाचे घटक असणाऱ्या माणसाला त्याच्या स्वत्वाची ओळख होते'' माणसाला त्याच्या स्वत्वाची ओळख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनातून झाली आहे. मराठी साहित्याने येथिल अस्पृश्यांच्या जगण्याकडे, त्यांच्या व्यथा–वेदना–अन्याय–अत्याचाराकडे जाणिवपूर्वक दूर्लक्ष केले होते. मात्र आंबेडकरी साहित्याने माणसाचे माणुसपण बहाल केले.

साहित्याचा समाजावर होणारा परिणाम आणि त्यातून माणसाला आपल्या गुलामिची जाणिव आणि त्या गुलामीच्या जाणिवातून पेटून उठणारा दूर्लक्षीत माणूस ह्या संदर्भात आंबेडकरी साहित्यिक उत्तम कांबळे म्हणतात, 'मी जेव्हा निग्रोच्या लढाया वाचल्या, नेल्सन मंडेला याची लढाई वाचली तेथील क्रांतीकारी कवी वाचले आणि थक्क झालो. तेथील कवीनी दक्षिण आफ्रिकेतील प्रत्येक माणसाच्या मनामध्ये एक क्रांतीकारी विचार पेरला होता. कविता ओठावर घेऊन काळे लोक गोऱ्या विरुध्द लढत होते. कविता आपल्या टी – शर्टवर गोंदवत होते, पाठीवर गोंदवत होते, छातीवर गोंदवत होते, डोंगरावर, रस्त्यांवर, समुद्रांच्या लाटांवर सुध्दा कविता गोंदवत होते. हा कवी किती भयानक होऊ शकतो हे जेव्हा तिथल्या गोऱ्या सरकारला कळले तेव्हा त्यांनी एक–एका कविला फासावर चढवायला सुरुवात केली.

Assistant Professor

Research Journal of India / Vol. 7 / Issue 7 / Jan. 2020 / Special issue / p-ISSN 2349-9370
e-ISSN 2582-4848 / Peer Reviewed National Indexed Journal with Impact Factor 5.455 / 90

साहित्यात किती ताकद असते हे दक्षिण आफ्रिकेतल्या कविता वाचल्यावर कळते. आंबेडकरी कवितांनी रॅडिकल फार मोठे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक बदल घडवून आणले आहे. आंबेडकरी चळवळी विषयी, संस्कृती आणि साहित्याविषयी लिहिताना प्रख्यात आंबेडकरी विचारवंत प्रा.डॉ. महेंद्र भवरे म्हणतात, "शेतकऱ्यांच्या दुःखाचा पहिला उद्गार महात्मा फुलेंनीच अधोरेखित केला होता. फुले–आंबेडकरी साहित्य शेतकऱ्यांच्या दुःखा विषयी संवेदनशील आहे. आधुनिक समाजनिर्मितीमध्ये आंबेडकरी चळवळींचा फार मोठा वाटा आहे. प्रामुख्याने भारतीय राज्यघटनेतील समता, स्वातंत्र्य, बंधुभाव आणि सामाजिक न्याय ही मूल्ये समाजात प्रसारित करण्याचा पाया आंबेडकरी चळवळीने केला. गेल्या अर्धशतकातील आरक्षणाची आंदोलने असोत, मंडल आयोग असो किंवा उपेक्षित जाती जमातीत झालेली जागृती असो अथवा स्त्रियांची आंदोलने असोत स्त्रियांच्या आंदोलनाविषयी, आरक्षणासंबंधी चर्चा असो हे सर्व आंबेडकरी चळवळीचे फलीत आहे, हे नाकारता येणार नाही. मागील पाच–सहा दशकात सांस्कृतिक क्षेत्रात ब्राम्हणवादी मक्तेदारीला दलित साहित्याने, दलित नाटक, कविता आणि दलित कलांनी जबरदस्त आव्हान दिले आहे. आंबेडकरी साहित्याने कथा, कविता, नाटक, कादंबरी आणि आत्मकथन या आकृतीबंधातून दलितांना नायकत्व दिले. आंबेडकरवादाचा केंद्रबिंदू हा माणस आहे. समाजवादी समाजरचनेची निर्मिती हे बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे आणि त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. माणसाच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात बदल घडवून आणणारी व्यवस्था त्यांना अभिप्रेत होती.

एकंदरीत आंबेडकरांच्या आंदोलनातूनच साहित्याची निर्मिती झाली व त्याचा परिणाम समाजपरिवर्तनात झाला. आंबेडकरी साहित्याने धर्म, परमेश्वर, आत्मा, परमात्मा, पूनर्जन्म, नशिब नाकारले असून माणसाने माणूसत्व स्विकारले. आंबेडकर साहित्याचा व धम्माचा केंद्रबिंदू माणूस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या देशातील सर्वहारा, उपेक्षित मानवाला चेहरा बहाल केला, एक ओळख दिली, त्याचे माणूसपण सिध्द केले. धम्मांतरानंतर आंबेडकरी माणसात नवचैतन्य निर्माण झाले व आपल्यावर होणाऱ्या अन्याय–अत्याचार साहित्याच्या माध्यमातून मांडून समाजपरिवर्तन घडवून आणले ते आजही सुरुच आहे.

निष्कर्ष :

१. आंबेडकरी साहित्याने समाजपरिवर्तन घडवून आणले.
२. आंबेडकरी साहित्य परमेश्वर, आत्मा, परमात्मा नाकारतो.
३. सामाजिक आणि आर्थिक जीवनात बदल घडवून आणणारी व्यवस्था त्यांना अभिप्रेत होती.
४. सामाजिक परिवर्तन ही मोठी परंपरा आंबेडकरी साहित्याने स्वीकारली आहे.
५. साहित्यच माणसाला माणूसपण व समाजपण देते.
६. संस्कार आणि संस्कृती याच्या संवर्धनाची जबाबदारी साहित्याला स्विकारावी लागते.

संदर्भ ग्रंथ

मोरे सर्वेश्वर, (२ जानेवारी २०११). अध्यक्षीय भाषण – तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन, वर्धा.
कांबळे उत्तम, आंबेडकरी साहित्य.
ढाले राजा, साहित्यविषयक भाषणे.
भवरे महेंद्र, (२३, २४ नोव्हेंबर २०१९). अध्यक्षीय भाषण – चौदावे अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य संमेलन, यवतमाळ
फडके भालचंद्र, दलित साहित्य वेदना व विद्रोह

❖❖❖

Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - 1 - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २३. आंबेडकरी साहित्य : जागतिकीकरण

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ.

प्रस्तावना

जागतिकीकरणाचा जसा प्रभाव देशातील घटनावर झाला तसाच साहित्याच्या प्रांतात सुद्धा झाला. जागतिकीकरणाचे चांगले वाईट परिणाम समाजातील सर्वच स्तरात घडून आले आहे. जागतिकीकरणाचा देशातील जो काही अतिवाईट प्रभाव देशाच्या विविध घटकांवर पडला त्या घटनांचे प्रभाव आंबेडकरी साहित्यिकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून अभिव्यक्त केले आणि आशयाच्या पातळीवरून समाज माध्यमापर्यंत पोहचवून एक सशक्त भारताच्या उभारणी संदर्भात कविता या परिप्रेक्ष्यातून उजागर केलेत.

आंबेडकरी साहित्यातील सर्वात महत्वाचा प्रकार या परिप्रेक्ष्यातून इतर कलाकृतींपेक्षा कवितेकडे अधिक पाहिले जाते. आंबेडकरी कविता १९६० दशकात पुढे आली. १९६० च्या पूर्वी अथवा १९६० च्या समकालात किसन फागोजी बनसोड, अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागुल, शंकर खरात, वामनदादा कर्डक, नागोराव पाटणकर या आंबेडकरी कवींनी व गायकांनी आपल्या कवितेच्या / गायनाच्या माध्यमातून दलित, उपेक्षित, पिडित, अभावग्रस्तांच्या वेदना, विद्रोह, नकार उजागर केला.

१९६० च्या दशकात बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, दया पवार इत्यादी कवि कवितांच्या माध्यमातून आपल्या समूहांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचार, सामाजिक विषमता शब्द बद्ध केलेत १९७० च्या दशकात त्र्यंबक सपकाळे, अर्जुन डांगळे, राजा ढाले, ज.वि. पवार, प्रल्हाद चेंदवणकर, इत्यादी कवी पुढे आलेत. सोबतच सुरेखा भगत, मल्लिका अमर शेख, ज्योती लांजेवार, हिरा बनसोड, प्रज्ञा पवार, संध्या रंगारी, प्रतिभा अहिरे, तर २० व्या शतकात अरूण काळे, भुजंग मेश्राम, लोकनाथ यशवंत, ज्ञानेश्वर मोरे, महेंद्र भवरे, सागर जाधव, मंगेश बनसोड, अशोक बुरबुरे, विलास भवरे, आनंद गायकवाड, प्रकाश खरात, महेंद्र गायकवाड, अनिल कावळे, प्रभू राजगडकर, पि.डी. आवाम, लक्ष्मीकांत पुन, सुदाम सोनुले, अशोक पळवेकर, इत्यादी यांनी देखिल आपल्या कवितांच्या माध्यमातून जागतिकीकरणाचे आंबेडकरी एकूणच वाट्यातील अभावग्रस्तांच्या वाट्याला आलेले दुःख, दारिद्र्य अभिव्यक्त केलेत. तर नवोदित आंबेडकरी कवींमध्ये रोहण नागदिवे, मैत्राताई वासनिक, नंदा तायवाडे, अशोक इंगळे, संजय डोंगरे, भास्कर पाटील, अजय खडसे, भूषण रामटेके, संजय डोंगरे, गजानन बनसोड, विनोद बुरबुरे, रसिका नाईक प्रशांत वंजारी, सुरेश धनके, रवि चापके, इत्यादींना आपल्या कवितांच्या माध्यमातून जागतिकीकरणामुळे शोषित, पिडीत समुदायावर होणाऱ्या दुष्परिणामांचे आलेख ओढले आहेत.

कविता आभाळातून पडत नाही. ती सुमच्या आतल्या जेवन जगण्यातून येते. कविता जशी आभाळातून पडत नाही तशी ती माणसाशिवाय जन्माला येवू शकत नाही शोषणापासून मिळ तेवढे करणे म्हणजे कवितेचे सर्जनात्मक प्रकाशित करणे होय.।

आंबेडकरी साहित्यिक यशवंत मनोहर यांच्या कवितेत जागतिकीकरणाशी त्यांचा मुक्त संवाद आहे. माणसाच्या स्थित्यंतराच्या अवस्था, त्यांच्या लढ्याचा सारा इतिहास, बादले पचवून पचवून पुन्हा उभा राहणारा माणूस, स्वतःचे जग सुंदर बनविण्यासाठी चाललेली धडपड आणि एकूणच कुरूपता व सुरूपता यांच्यातील संघर्ष जागतिकीकरणात सागतून सांगते. त्याला माणसाच्या बाजूने उभे राहण्याचा सल्ला देते.

जागतिकीकरणात एका बाजूला संगणक, आणि माणूस यांची लढाई होईल अशी भीती उत्तम कांबळे यांना वाटते. जागतिकीकरणात दलितांचे प्रश्न या ग्रंथाच्या माध्यमातून ती व्यक्त केली. माणसाला पर्याय ठरो व माणसापेक्षा महाशक्तीशाही ठरावे अशी संगणकाची रचना करण्यात येत आहे.

आंबेडकरी कवी जागतिकीकरणाकडे एक व्यापक, सजग, लढाऊ आणि क्रांतिकारी भूमिका घेऊन पाहतांना दिसतात. या जगाच्या पाठीवर असलेल्या सर्व उपेक्षितांच्या, दलितांच्या नजरेतून ते या नव्या जागतिक प्रक्रियेकडे पाहतात.

उद्याच्या संगणक आणि माणसाच्या लढाईत काय होईल याचा विचार आंबेडकरी कवींने करणे गरजेचे आहे. माणसाचे आणखी किती अवमुल्यन होईल.

कवी अरूण काळे "माहिती तंत्रज्ञानाची क्रांती झाल्यावर संगणकाचे म्हणजे यंत्राचे मूल्य वाढेल आणि माणसाचे अवमुल्यन होईल. जागतिकीकरणात माणसाच्या अस्तित्वाचे प्रश्न काळे मांडतात". केवळ जागतिकीकरणातले चित्र मांडून थांबत नाहीत तर अजुनही सावध राहण्याचा इशारा देतात.

रोहण नागदिवे- "फेकलेल्यांनो' प्रतिकुल परिस्थिती संघर्ष थांबवू नका संघर्ष थांबला की फक्त मरणच उरणार आहे. संघर्ष सुद्धा संघटीतच करा अशा इशारा कवितेच्या माध्यमातून देतांना दिसतात.

यशवंत मनोहर : जगातल्या समुहाला एकत्रितपणे, एकसंघपणे लढण्याला प्रवृत्त करतो आहे. आंबेडकरी परंपरेचे हेच तर वैशिष्ट्ये आहे. या परंपरेचे नाते जगभराशी असेल. महात्मा जोतीबा फुले यांनी आपला एक ग्रंथ अमेरिकेतील निग्रोंना अर्पण केला होता. हे या ठिकाणी लक्षात घ्यावे. जागतिकीकरणाचे आव्हान परतवायचे असेल तर किंवा त्याला आपल्या इच्छेनुसार झुकवायचे असेल तरीही वैचारिक परंपरा आवश्यक आहे. लढणाऱ्या माणसाविषयी एक प्रचंड आत्मविश्वास कवी व्यक्त करतो.

**जागतिकीरणाच्या संदर्भात काही महत्त्वपूर्ण कविता –**

व्यवस्था परिवर्तनाच्या कार्यासाठी
एकत्र आलेले कार्यकर्ते
नेतृत्वाच्या मुद्यावर समरी सुमरीवर आले,
लाथा बुक्क्यावर आल
अन चळवळीचा पिंडू पडला – कवी – प्रशांत बंजारी – सरसंधान



Scanned with CamScanner

2D

बारुद पेरली अन नवी पहाट झाली
मी वाट पाहतो की होतो कधी उजेड
-सिद्धार्थ भगत - आणि पुन्हा एकदा बुद्ध हसावा म्हणून
तुमच्या पायाखाली दगड आमचाच आहे
आम्ही तो केव्हाही हलवू शकतो - लोकनाथ यशवंत
तितर, बटेर, कावळा, मोर
अनेक पाखरं... शांत जंगल
संत, महंत, पंत, पंत
सगळीच माणसं... गावात दंगल - संजय घरडे - निलपंख
माझ्या आर्त ओठी । उजेडाची गाणी
कोरतो मी लेणी । उत्क्रांतीची - विनोद बुरबुरे - उत्क्रांतलेणी
तुम्ही या भ्रमात राहूच नका ।
की, परिवर्तन होणार नाही ?
आता सामान्य माणूस सजग होताहे
हे विसरू नका. - अशोक इंगळे - युद्धपक्षी
तमाम मानवतावादी माणसातल्या माणसांनो
माझी आई सांगत होती
मी तिच्या पोटात होतो
तेव्हापासून माझ्या घरी
भाकरी साठी तमाशे होत होते
आणि घरातले सारेजण
भाकरीचे तुकडे मोजून खात होते..
मी लहानपणी आईला
भूक लागली म्हणताच
आई धापड पेऊन माझ्यावर
चालुन यायची
आता कीती बदललो ?
मी घरी आल्यावर
म्हातार्‍या आईने
घरातल्या ज्वारीसाठी पैसे मागताच

21

मीच तिच्यावर तुटून पडतो.
माणसाला माणसे खाता आली असती तर
माणसांनी पाहिले असते
आपल्याच घरातल्या रक्तांचे खून
आणि भूक लागलेल्या कुटुंबाला
ते दर हे असते एक सिलेक्शन
इथल्या काळ्या मातीच्या भाकरी करता
आल्या असत्या तर,
ह्या देशातल्या लोकांनी
घराच्या भिंतीच फोडून फोडून ?
उदध्वस्त केल्या असत्या
अन कुंभारांनी मडक्या ऐवजी
भाकरी घडविल्या असत्या विकण्यासाठी
मला भाकरीचा एक फोटो घेऊन
सुरुंग पेटवायचा आहे
कुणी उपाशी राहून गेलेल्यांचा
खरा आकडा देता का ?

लक्ष्मिकांत धुमे – भाकरीच्या शोधात
आनंद गायकवाड 'इस्तो' या कविता संग्रहातून व्यक्त होताना-
कावरा बावरा होऊन
मोचविरून पात पायचो परे
घामेजलेला चेहरा, विस्कटलेले केस
धापणारी छाती, लालबुंद डोळे
मायला विचारायचो
मी कसा दिसतो
माय म्हणायची
चुलीतला इस्तो
महेंद्र भवरे – आपल्या कवितेतून व्यक्त होताना-
२१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर
झाकाळलेल्या कातरवेळी

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

22

माणसाची बंदिस्त चौकट उभारते आहे
एकविसावे शतकच माणसाला पोखरते आहे

**समारोप**

एकंदरीत जागतिकीकरणाचा बरा वाईट प्रभाव सर्वच क्षेत्रात दिसून येतो. जागतिकीकरणात अन्नधान्याचा हा विकासाचा जाणार आहे. गरीब-श्रीमंत यांच्यात अंतर पडत आहे. नवीन विकासाची व्यवस्था उत्पन्न येत आहे /झाली आहे शेतकरी, कामगार, शेतमजूर, हमाल विस्थापित अवस्थेत गेले आहेत. सूत गिरण्या ओस पडल्या आणि यंत्रमागधारकांच्या गिरण्या उदयास आल्या त्यात कामगारांचे शोषण, स्वाभिमान मारला गेला.जागतिकीकरणात गरिबांचे अधिक शोषण करणारी व्यवस्था निर्माण झाली आहे. त्याचे बरेवाईट परिणाम आंबेडकरी कवींना आपल्या कवितेच्या माध्यमातून अभिव्यक्त केले आहे.

**संदर्भग्रंथ**


- कांबळे उत्तम – जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न
- कांबळे उत्तम – आंबेडकरी साहित्य
- कांबळे उत्तम – १३ वे कामगार साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण – अमरावती
- मोरे संतोष – तिसरे आंबेडकरी साहित्य संमेलन वर्धा - अध्यक्षीय भाषण
- गायकवाड आनंद – इस्तो, हिंदाण, आखरीचं तुकडा सडान चिकवीन – काव्यसंग्रह
- बंजारे प्रशांत – सरसंधान
- भगत सिद्धार्थ - आणि पुन्हा एकदा बुद्ध व्हावा म्हणून
- धुमे लक्ष्मीकांत – भाकरीच्या शोधात
- यशवंत मनोहर – उत्थानगुंफा
- यशवंत लोकनाथ – आता होऊन जाऊ द्या.
- पवार महेंद्र – चिंतक्रांत गुतुखाने वदन /महासत्तेचे पिर्डांदान
- इंगळे अशोक – युद्ध पक्षी
- घरडे संजय – निलपंख
- वुरकुरे विनोद – उत्क्रांतलेणी




Assistant Professor
Smt. Vatsalabai Naik Mahila
Pusad Dist Yavatmal

VOLUME - IX, ISSUE - 1 - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १३. ग्रामगीता : राष्ट्राच्या विकासाचा जाहिरनामा

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ.

23

## प्रस्तावना

राष्ट्रसंत तुकडोजी यांनी ग्रामगीता ह्या ग्रंथाच्या माध्यमातून ग्रामीण भाग, ग्रामीण जीवन व ग्रामीण भागातील माणुस ह्यांना केंद्रबिंदू ठरवून ग्रामीण भागाचा, ग्रामीण माणसाच्या विकासाचा आराखडा ग्रामगीतेच्या माध्यमातून स्पष्टपणे मांडलेला आहे. ग्रामीण खेडे गावांचा विकास म्हणजे एकार्थाने तो राष्ट्राचाच विकास होय असे भाष्य त्यांनी ग्रामगीता ग्रंथाच्या माध्यमातून मांडलेला आहे. खऱ्या अर्थाने ग्रामगीता म्हणजे भारत देशाच्या विकासाचा जाहिरनामाच होय, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

राष्ट्रसंत पूर्वी जेव्हा आपण भारत देशाचा विकासाच्या संदर्भात लक्षकेंद्रीत केले तर असे लक्षात येते की, भारतीय सामाजिक व्यवस्था ही विषमतावादी होत आहे. आर्यांनी आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी चातुर्वर्ण्य व्यवस्थेची निर्मिती केली. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशी विषमतावादी व्यवस्था निर्माण केली आणि ह्या विषमतावादी व्यवस्थेने शुद्रातिशुद्राचे माणूस म्हणून संपुर्णतः जीवन जगणे नाकारले. मुलभूत अधिकार, नैसर्गिक अधिकार नाकारताच गावकुसाबाहेरचे जनावरापेक्षा निकृष्ट जगणे त्यांच्यावर [illegible] लादले. शुद्रातिशुद्रांना माणूस म्हणून सन्मान प्राप्त व्हावा, मुलभुत अधिकार मिळावेत, याकरीता अनेक लढाया, झाल्या, संघर्ष झालेत. इ.स. पूर्व 21 व्या शतकापर्यंत कालखंडाचा अभ्यास केला तर लक्षात येते की तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध, चार्वाक, महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहु महाराज, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज ते डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या चळवळीचा व संघर्षाचा अभ्यास केल्यावर लक्षात येते की, [illegible] माणसाचे माणूसपण ज्यांनी नाकारण्यात आले, ह्या सर्व महापुरुषांनी उपेक्षित, शोषित, पिडीतांना माणूस म्हणून सन्मान मिळावा व सोबतच राष्ट्राचा विकासात यांना सहभागी करुन घ्यावा. मात्र भारत देश स्वतंत्र होऊन [illegible] असला तरी राष्ट्राचा विकास पाहिजे तसा झाला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत [illegible] या देशातल्या सर्वात शेवटच्या माणसांचा विकास होणार नाही तो पर्यंत देशाचा विकास होणार नाही आणि तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून स्पष्टच सांगितले की, जो पर्यंत ग्रामीण खेड्यांचा विकास होणार नाही तो पर्यंत राष्ट्राचा विकास होणार नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीता अध्याय 11 ते 15 या अध्यायाचा अभ्यास केला, तर आपल्या लक्षात येईल की, राष्ट्राचा विकासाची भुमिका त्यांनी किती स्पष्टपणे मांडलेली आहे.

अध्याय 11 मध्ये त्यांनी 'ग्रामरक्षण' या अध्यायात सांगितले आहे की गावाची सेवा म्हणजेच परमेश्वराची सेवा आणि ईश्वरसेवा सर्व गावकऱ्यांच्या आनंदाचा व सुखाचा ठेवा [illegible] चांगल्या विचारांची माणसे असतात त्याच प्रमाणे वाईट प्रवृत्तीची देखिल माणसे असतात. ह्या वाईट प्रवृत्तीच्या माणसामुळेच गावाच्या विकासात

[illegible] निर्माण होतो. आजही परिस्थिती काही बदलली नाही. या वाईट विचाराच्या माणसांमुळेच राष्ट्राच्या विकासात [illegible] निर्माण झाला आहे. गावाचा विकास म्हणजे गावातल्या माणसांचा विकास ही संकल्पना राष्ट्रसंत तुकडोजी [illegible]नी ग्रामगीता ग्रंथात मांडली आहे. गावाच्या विकासासाठी संघटन निर्माण करावे त्यामध्ये त्यांनी चारित्र्यवान व [illegible] माणसांचा समावेश असावा. अध्याय 12 "ग्रामशुध्दी" मध्ये खेड्यांच्या दुरावस्था त्याची कारणे व उपाय मांडले [illegible] अध्याय 13 "ग्रामनिर्माण कार्या"मध्ये गावातल्या पैंगराईची कारण व लोकांचे अज्ञान विशद केले आहे. अध्याय [illegible] 'गोवंश सुधार' यामध्ये त्यांनी शेतीच्या उपयोगासाठी गोवंश आवश्यक आहे. जो पर्यंत गोवंश सुखी होता तो [illegible] दारिद्रयता गावात शिरलीच नव्हती. जमीन, आणि जनावरे हीच त्यावेळची उत्पत्तीचे साधने होती.

आज जेव्हा आपण ग्रामीण भागाचा, माणसाचा, विकासाचा विचार करतो तेव्हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी [illegible] व राष्ट्राच्या विकासाच्या संदर्भात ग्रामगीता ग्रंथाच्या माध्यमातून जे मार्गदर्शन केले. त्या मार्गदर्शनाचा [illegible] विसर पडला आहे. अगदी बारिक–सारिक गोष्टींवर त्यांनी मार्गदर्शन केले. पण त्यापैकी एक ही विचार [illegible] भागात दिसत नाही, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीताच्या माध्यमातून गावाचा, राष्ट्राचा एकंदरीत [illegible] विकासाचा जाहिरनामा मांडला. पण या जाहिरनाम्याचा लोकांना का विसर पडला याचा शोध घेणे [illegible] गरज आहे, असे मला वाटते. एकंदरीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता ग्रंथाच्या माध्यमातून [illegible] विकासाचा आराखडा मांडला.

[illegible]

[illegible] : राष्ट्राच्या विकासाचा जाहिरनामा.

[illegible] 11 ते 15 मध्ये विकासाचा मूलमंत्र.

३. ग्रामगीता ग्रंथाचा लोकांना विसर पडला आहे.

४. ग्रामीण भागाचा अभ्यास करुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या सर्वांगीण कार्याचा लोकांना का विसर पडला याचा शोध घेणे गरजेचे आहे.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जो पर्यंत देशातल्या सर्वात शेवटच्या माणसाचा विकास होणार नाही तो पर्यंत देशाचा विकास एक खोटी संकल्पना आहे.

६. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : गावातील माणसांचा विकास जोपर्यंत होणार नाही तो पर्यंत राष्ट्राचा विकास अशक्य.


संदर्भ ग्रंथ:

१. ग्रामगीता – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : शुद्र पूर्वी कोण होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : वखरी भाग 1

– राष्ट्रसंताचा खरा देव कोणता : सुदामे सावरकर.

– राष्ट्रसंताचा खरा देव कोणता : प्राचार्य डॉ. एम. बी. पाटील, प्रा. डॉ. शिरिष बी. पाटील.

२. ग्रामगीता – अध्याय 11 ते 15, प्राचार्य डॉ. एम. बी. पाटील, प्रा. डॉ. शिरिष बी. पाटील.


Assistant Professor
Smt. Vatsalabai Naik Mahila Mahavidyalaya, Pusad Dist Yavatmal

Scanned with CamScanner

# मराठी साहित्य आणि आंबेडकरी सहित्य सामाजिक, सांस्कृतिक चळवळ

**प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम,**
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय,
पुसद जि. यवतमाळ (महाराष्ट्र)

25

## प्रस्तावना

सामाजिक – सांस्कृतीक – राजकीय संदर्भात विचार मांडत असतांना या संदर्भात काही विचारवंताचे मत देखील मांडणार आहे.

सामाजिक आणि सांस्कृतीक क्रांतीशिवाय राजकीय क्रांती अशक्य आहे. ह्या विषयाला हात घालण्यापूर्वी ह्या विषयाची किंवा ह्या संदर्भात चिंतन करण्याची आवश्यकता आज का भासत आहे. याचाही विचार आजच्या प्रसंगी होणे आवश्यक आहे. राजकीय क्रांती करण्यास आपण असमर्थ ठरलो हे सांगण्याची आवश्यकता नाही किंवा हे सांगण्यासाठी कोणत्याही पुराव्याची गरज नाही.

चेहऱ्यावरुन चारित्र्याची, कपड्यावरुन प्रतिष्ठेची, शिलावरुन भाताची, लाथ मारुन पाणी काढण्याचे सर्वच संदर्भ हळूहळू काळाबरोबर कालबाह्य झाले आहे. हे ज्या पद्धतीने कालबाह्य झाले त्याच पद्धतीने आंबेडकरी राजकीय क्रांती कालबाह्य होणार की काय याची भीती आज वाटायला लागत आहे.

सामाजिक आणि सांस्कृतीक क्रांतीच्या संदर्भात आपण जेव्हा विचार करतो तेव्हा तथागतांनी निर्माण केलेली समतावादी सामाजिक व सांस्कृतीक लोकशाहीचा विचार होणे ही गरजेचे आहे. कारण सामाजिक आणि सांस्कृतिक क्रांतीचे बीज तेव्हाच पेरण्यात आले होते.

वैदिक धर्माने चातुर्वर्ण्य विषमतावादी समाजरचनेची निर्मिती निर्माण केली. स्वतःच्या सामाजिक–सांस्कृतीक – धर्मासाठी माणसा माणसाचे, समाजा, समाजाचे, जाती–पातीचे तुकडे केले होते. शोषित, उपेक्षित वर्गाला सामाजिक–सांस्कृतिक, धार्मिक–शारीरिक व मानसिक गुलाम केले होते. ह्या सर्व उपेक्षित समुदायाला ह्या सर्व गुलामितून मुक्त करुन नविन सामाजिक–सांस्कृतीक, धम्मविषयक चेहरा बदल केला. हा झालेला बदल इथल्या सनातनी धर्माभिमान्यांनी व विषमतावादी समाजरचना निर्माण करणाऱ्या वैदिक धर्ममार्तंडांना सहन झाला नाही व तथागतांनी निर्माण केलेली सत्तेवर आधारित सत्ता व्यवस्था उध्वस्त होईल याचे षडयंत्र रचण्यास सुरवात केली व त्यात त्यांना अधिक प्रमाणात महायुद्धे झालीत. याच दरम्यान परकीय आक्रमणे झालीत सामाजिक–सांस्कृतिक उर्जास्त्रोत निर्माण करणारे तक्षशिला, नालंदा विद्यापीठ उध्वस्त करण्यात आले. बौद्ध भिखूंची हत्या करण्यात आली आणि ह्या सामाजिक–सांस्कृतीक–धम्मविषयक क्रांती करणारे सम्राट अशोकाचे सर्वात शेवटचे वारस बृहद्रथ ह्यांचे वैदिक धर्माभिमानी निच पुष्यमित्रसुंगाने त्यांची हत्या केली (इ.स. पूर्व १८६) व तथागतांनी निर्माण केलेल्या सामाजिक–सांस्कृतिक क्रांतीचा अंत झाला व विषमतावादी समाजावर विजय झाला. तेव्हापासून तर आजपर्यंत त्यांनी आपली आंदोलने दडपण्याचा सहानतपणे प्रयत्न केला.

१२ व्या शतकाच्या उत्तरार्धात व १३ व्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात संतांची द्वैत–अद्वैतवादी तत्वावर आधारित समाजरचनेची, वर्णव्यवस्थेची, मंत्राची रचना केली व सामाजिक व सांस्कृतिक क्रांती बहूजन समाजासाठी निर्माण करण्या एवेजी त्यांनी विषमतावादी धर्माची, चातुर्वर्ण्यव्यवस्थेची पाळेमुळे अधिक खोलवर रुजवून अध्यात्मिक समाज रचनेची निर्मिती केली. पुन्हा या समाजातल्या माणसाला जोडण्याऐवजी तोडण्याचे काम त्यांनी टाळ–मृदूंगाच्या गजरात पूर्णत्वास नेऊन परमेश्वराला केंद्रबिंदू मानून माणसाचे माणसपण नाकारुन सामाजिक–सांस्कृतिक धर्मात अध्यात्मिकात व सामाजिक व्यवहारात चातुर्वर्ण्य व्यवस्था काटेकोरपणे पाळले.

26

याच दरम्यान अनेक, धर्म, पंथ, संप्रदाय उदयाला आले. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधरांनी चातुर्वर्ण्य व्यवस्था अमान्य केली पण चातुर्वर्ण्य व्यवस्था समूळात नष्ट करण्यासाठी काही केले नाही. चोखामेळा ज्याला आपण आपला मानतो त्यानेही विठ्ठलाची गुलामगीरी स्वीकारण्या पलीकडे काही केले नाही. या चातुर्वर्ण्य व्यवस्थेला नाकारुन क्रांतीबा महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले – छत्रपती शाहू महाराज यांनी पुढा घ्याने या देशातील उपेक्षीत व शोषितांसाठी सामाजिक–सांस्कृतिक–शैक्षणिक क्रांती घडवून आणली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिराचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन, अमरावती येथिल अंबादेवी मंदिराचा सत्याग्रह, संविधान – बौध्द धर्माची दिशा देऊन एक सामाजिक व सांस्कृतिक क्रांती घडवून आणली, वैदिक संस्कृतीने नाकारलेल्या उपेक्षित वर्गाला या आंदोलनाच्या माध्यमातून एक नवा चेहरा बहाल केला. आपण ही माणस आहोत व आपल्याला ही इतर माणसांन प्रमाणे जगण्याचा अधिकार आहे व तो अधिकार आंदोलन–संघर्ष करुनच मिळणार असा विचार उपेक्षित वर्गाला बहाल केला. याच दरम्यान सामाजिक क्रांती करुन एक नवा चेहरा – विचार तत्त्वज्ञान त्यांनी या मातीत रुजविला.

राजकीय क्रांतीच्या संदर्भात स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना, शेड्युल्ड्कास्ट फेडरेशनची स्थापना करण्यापूर्वी या पक्षाचा जाहिरनामा तयार केला. परंतु या पक्षाची स्थापना त्यांच्या हयातीत नव्हे तर महापरिनिर्वाणानंतर करण्यात आली. हळूहळू आपल्या लहानशा पोटापोटी आंबेडकरी राजकीय क्रांतीने प्रेरीत झालेली माणसे स्वत:ला विकण्याच्या पलीकडे काहीच करु शकले नाही व आपल्या बरोबर आंबेडकरी समाजाला विकण्याचे षडयंत्र त्यांनी रचले तेही अशा लोकांचे हाल काय झाले ते आपण जाणतोच आहे.

१९६० च्या दशकात आंबेडकरी प्रेरणेने प्रेरीत होऊन दलित साहित्याची निर्मिती झाली. विविध वाङ्मयीन कलाकृतीच्या माध्यमातून अन्याय, अत्याचार, शोषण करणाऱ्या विषमतावादी समाज रचनेला, धर्म रचने व सांस्कृतिक रचनेत नावावर करण्यात येऊन व माणसाला केंद्रबिंदू मानुन साहित्याची निर्मिती करण्यात आली. याच आंबेडकरी साहित्यातून सामाजिक सांस्कृतिक क्रांती करण्यात आली. सामाजिक आणि सांस्कृतिक क्रांती काही एकएक, क्षणा–क्षणात, निर्माण होत नाही. त्यासाठी कितकेनी शतके उलटून जातात तेव्हा सामाजिक व सांस्कृतिक घडून येते मात्र ती आपण कीतपत सांभाळून ठेवतो ते आपल्यावर अवलंबून आहे.

१९७२ ला दलित पॅंथर या सामाजिक – सांस्कृतिक – वैचारिक चळवळीचा उदय झाला. कालांतराने ती कोलमडून पडली हा सर्व इतिहास आपल्याला माहित आहे. नव्याने सांगायची आज मला आवश्यकता वाटत नाही. नुकताच कोलंबिया विद्यापीठाने सर्वेक्षण केलेल्या जगातील १०० विद्वानांची त्यांनी यादी तयार केली व त्यात डॉ. आंबेडकरांचे नाव प्रथम क्रमांकावर आहे. त्यांचा पुतळा ओबामा यांच्या हस्ते अनावर करण्यात आला.

संदर्भ ग्रंथ

१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शुध्द पुर्वी कोण होते.
२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बुध्द आणि त्यांचा धम्म.
३ डॉ. आ. ह. साळुंखे, चार्वाक
४ उत्तम कांबळे – जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न ऊर्जा श्रमिक मुखपत्र स्मरणिका, २००७.
५ उत्तम कांबळे – आंबेडकरी साहित्य – आंबेडकरी ३ जाने. २००८, साहित्य व संस्कृती संवर्धन मंच,
बडनेरा, अमरावती.
६ सतेश्वर मोरे – अध्यक्षीय भाषण – तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन, वर्धा दि. २ जाने २०११.
७ सतेश्वर मोरे – सरसंधान कवितासंग्रह, प्रस्तावना.
८ वली सौ.– अध्यक्षीय भाषण – दुसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन, १ फेब्रुवारी २००९, पुलगाव जिल्हा वर्धा.



Scanned with CamScanner

९ महेंद्र भवरे – चौदावे अ.भा.आंबेडकरी साहित्य संमेलन, यवतमाळ. दि.२३/२४/२५ नोव्हेंबर २०१९.
१० सतिष चहांदे/के.व्ही. बरासे – दलित कवितेतील नवे प्रवाह, शोधनिबंध पुस्तिका २२ फेब्रु. २०१३.
११ सतिष चहांदे/के.व्ही. निलसंग्रह काव्य
१२ राजा ढाले – साहित्य विषयक अध्यक्षीय भाषण २९ एप्रिल २०१२, नांदेड, ११ जानेवारी २०१३ भंडारा.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

Assistant Professor
Smt. Vatsalabai Naik Mahila
... Pusad Dist Yavatmal

Scanned with CamScanner

ISSN: 2394-3114
Vol-40 Issue-[illegible] March 2020

# ROLE OF ICT IN HIGHER EDUCATION

Prof. Vikrant Krushnarao Meshram
Asstt.Prof.& H.O.D., Dept. of Marathi,
Smt. Vatsalabai Naik Mahila Mahavidyalaya,
Pusad. Dist.Yeotmal( 445204)

Prof. Prafulla Mote
Asstt.Prof. Dept. of Commerce
Smt.Vatsalabai Naik Mahila Mahavidyalaya,
Pusad. Dist.Yeotmal( 445204)

27

**Abstract**

*Education has been the key factor in overall development of a nation. Today, the students of higher education are exploiting variety of sources of knowledge and information. Their sources of information today include, social media, multimedia, web applications, internet and so on. Information and Communication Technology (ICT) has been the base of many modern tools of teaching-learning.ICT has been playing very vital role in framing student towards information oriented. It has remarkably transformed the existing education sphere as the learning process has becoming more and more interesting and creative for students. ICT plays crucial role in education especially higher education as the implementation of ICT in higher education has been student and teacher centric. It has almost become an integral part of teaching- learning process. The effective use of ICT can motivate student and rejuvenate teacher enthusiasm. Not only does ICT in higher education improve classroom teaching-learning process, but it also provides facility of e-learning. The use of ICT is also instrumental in research along with teaching and learning, the adoption of it in higher education will definitely enhance learning environment as well as develop student competitiveness for open world. The present paper highlights the role, advantages and impact of ICT on higher education. The paper also points out some of the important challenges in implementation of ICT.*

Key words: Higher Education, ICT, role, advantage, impact, challenges etc.

## Introduction

Since last six decades the Higher education systems India have developed enormously. The demand of quality in higher education gained impetus and this demand further witnessed swift advancements in Information and Communication Technology (ICT). The National Policy on Education (2012) emphasized the employment of educational technology to improve the quality of education. The recent years have therefore seen the inclusion of developments in ICTs in education system. The rapid development of ICT has been the most fascinating phenomena that appropriately characterize the Information Age.



Assistant Professor
Smt. Vatsalabai Naik Mahila
[illegible] Mahavidyalaya,Pusad Dist Yavatmal

Scanned with CamScanner

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-31-March-2020


Information technology can simply be defined and explained as the communication, synergy or interaction between human and machine. The interaction between human and a device results in gathering data and dissemination of information. The function of such a system is to deliver and provide data. The data provided further evaluated, analyzed and processed to produce meaningful and useful information.

The objective of many a country today is to ensure access to information and information technology and one of the bases of learning is transfer of knowledge. The concept of conventional classroom of desks, blackboards, notebooks etc transformed into internet, LAN, software etc. The use of ICTs in higher education system provides alternatives to barriers encountered in the conventional education system. ICTs enables education and knowledge to wider reach, even if there are limited resources and adds value to teaching and learning. It enhances the effectiveness of teaching and learning and adds a better dimension to learning. Alongside, teaching- learning it also aids in assessment and evaluation, improves the effectiveness of education, facilitates research and scholarly communication.

In view of ICT education can be classified in three main categories; E-Learning, Blended Learning and Distance Learning. E-Learning i. e. electronic learning refers to computer enhanced learning, also known as online learning. The barriers of time, place, and attendance etc can be overcome and group collaboration made possible. It provides speedy circulation of information, reinforces international aspects of educational services. It is the distance education system that supplied the base for development of e-learning. "The emancipatory and transformative potentials of the ICT in higher education in India has helped increase the country's requirement of higher education through part- time and distance learning schemes. It can be used as a tool to overcome the issues of cost, less number of teachers and poor quality of education as well as overcome time and distance barriers."(MC Gorry, 2002)

## The Role of ICT in Higher Education

ICTs in higher education are used for administrative tasks such as admissions, personnel, staff development, policy making, designing curriculum, storage and analysis of data, maintaining record, online courses, online examination, online payment, publishing of results and so on. In the process of teaching-learning ICT has significant role to play. It plays the role of motivating students and learners that in turn makes the teaching- learning process more influential. It also helps to evaluate the progress of learners and revitalizes the learner's enthusiasm as it builds the competence of self-learning. The learning experience is made more effective as the learner can interact with teachers, fellow students and experts on various issues outside institute premises. It provides unlimited access to course material that is available online whenever requires and thereby the sole reliance on printed books is positively replaced. Today,

scenario of higher education in India witnesses large classes at many HEIs which affect under – prepared students, in such context ICTs provide useful opportunities.

In research function of higher education ICTs are inconvertible. The communication links across the world helps the researchers access the unlimited storehouse of knowledge rather to remain confine within single institution. The research possibilities are greatly enhanced through digital/ e-libraries, online databases.

**Benefits/ advantages of ICT in Higher Education**

ICT is important HEIs as it assists in executing activities such as such as record keeping, research work, presentations, financial analysis, examination results management, communication, teaching-learning activities, and overall institute management. ICT is handy in gathering information, categorizing and consolidating data, summerising and combining, examining, assessing and also speculating as well as forecasting. ICTs in higher education enable the student to learn at suitable time. It provides educational activities in larger geographical area and empowers effective education. The youth of the day are generally attracted by technology. ICT proves to be motivating factor for students of higher education and the educators must capitalize this interest and enthusiasm for internet as the internet provides students to have additional learning not readily available in the classroom. The learner centric approach allows student to learn effectively. Moreover, the remarkable improvement in the quality of higher education necessarily leads to innovative way of collaboration.

The student can join collaborative projects that involve the students belonging to different state, countries and continent. Therefore the speedy communication feature of ICT promotes to overcome geographical barriers. It thus facilitates co-operative learning and encourages dialogue. For teacher, it serves as modern learning modules and helps to focus on eminence research through utilizing appropriate research procedure. Apart from communication, it is research that takes many people to internet. Internet offers more resources than the one found in the library. ICTs have the potential to innovate, accelerate, enrich and deepen skills; motivate and engage students; relate school experience to work practices; create economic viability for tomorrow's workers; and strengthen teaching. (Lemke and Coughlin 1998)

**The Impact of ICT**

Before this Information Age the courses were just written around textbook. The teaching had to be done through lectures and presentations intermingled with tutorials. The learning activities meant just to consolidate and rehearse the content. The present day curricula are more competency and performance-based. The current curricula tend to require access to variety of information, its sources, forms and types. It tends to be student-centric, learning environment



Scanned with CamScanner

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-31-March-2020

30

centric based on information access and inquiry. The conventional teachers are now coaches and mentors rather than content experts. More and more students by now are using ICT for learning purposes as they use computer s as information sources and cognitive tools.
ICT are impacting the content of education as it is dominating other aspects of contemporary life. There emerges a need of HEIs to ascertain that the graduates are able to exhibit good levels of information literacy, "the capacity to identify and issue and then to identify, locate and evaluate relevant information in order to engage with it or to solve a problem arising from it" (McCausland, Wache & Berk, 2)

There has been growing awareness about higher education and the emergence of ICTs as learning tools has coincided. Contemporary theory of learning based on the principle that learning is an active process of constructing knowledge as against past assumptions of acquiring knowledge. In the past instruction method of learning construction of knowledge is supported rather transmitted. The use of ICTs in learning setting reinforces diverse forms of knowledge construction.

The ICTs provide various options and choices. The concept of flexibility in the transmission place of educational programmes is not altogether new one. In this regard many HEIs are offering educational programmes at a distance. The use of technology has extended research activities. The traditional classroom learning has given a way to work-based setting as the students become able to access programmes from their workplace. A large number of students today enroll in courses offered by external institutions. Learners are free to participate in learning activities in their own convenience for time and from their own place.

## Challenges of ICTs

The use of ICTs in higher education has obvious benefits. ICT also brings challenges too in its implementation the existing higher education system in India. The first and primary challenge is expensive cost of acquiring, installing, operating, maintaining and replacing ICTs. The effective use of ICT necessitates availability of hardware and software and the equity of access to resources by teachers, students an administrative staff. These costs of ICT tools are substantially high and cannot be provided by the stake holders.

Along with, cost related and insufficiency of funds challenge there are some intrinsic infrastructure-related shortcomings such as size of classrooms, irregular electricity, non-availability of technicians for maintenance etc. The Lack of training of the professionals of higher education about the use of ICT poses a challenge in its implementation.

For smooth and successful functioning of ICTs teachers as facilitators of higher education needs to rethink their role. Many a times apathy on the part of teacher obstacles in the way of

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-31-March-2020

successful implementation of ICTs because just setting up and running a computer not enough for teachers to be able to initiate, motivate and prepare students for the future.
The technology related barriers such as equipment break-down or software mal-functioning, hardware issues etc and inappropriate combination of ICT resources result into reduced dissemination of technology as well as poor ICT understanding.

English is the language dominant language of internet, large proportion of educational software, online content and web-based resources. The English language proficiency in many of the developing countries is not so high. Besides, the nation like India has regional as well as linguistic diversities. In this regard the content development in regional as well as in English language is desirable.

**Recommendations**

There is huge gap between demand and supply and this gap is detrimental in why the government and institutions need to formulate policies for more beneficial use of ICT. ICT should be compulsory in all HEIs. The teachers should be prepared for using technologies and sharing knowledge in real life authentic contexts. The government and Institutes needs to create awareness on ICT education. The adequate facilities, proper infrastructure and other resources should be provided to HEIs. The teachers should be given environment so that they develop their ICT-based competencies in order to practice the ICTs in teaching-learning process. The high quality internet service, alternate source of electric supply, trained technical assistance etc should be made available in all higher educational institutions so as to provide access to ICT to both teachers and learners. The urban- rural divide terms of access, equity, and resources should be removed. Training on the use of ICT should be compulsorily provided to the professionals of higher education.

**Conclusion**

The Higher Education system of 21st century demands a new role of teacher, pupils and education system. The immense use of information and communication technologies (ICTs) has conveyed deviation in education today. The traditional teaching-learning methods are being rapidly transformed into online and virtual environment. The increasing use of ICTs in HEIs has lead to quality education demonstrating thereby immense possibilities of integration of ICTs. The integration of ICT in both formal and informal higher education ultimately makes student workable and socially fruitful part of society at large. ICT can play a role of efficient agent of change among many educational aspects. Many a workable, practical and quality improvements are possible after judicious and cognizant employment of ICT in higher education.

**Reference**



Scanned with CamScanner

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-31-March-2020

32

Agrawal, Dr. Ankur Kumar and Dr. Girish Kumar Mittal " The Role of ICT in Higher Education for the 21st Century: ICT as A Change Agent for Education." https://pdfs.semanticscholar.org/477b/d

Budhedeo, Dr. Shradha H. "Issues And Challenges in Bringing ICT Enabled Education To Rural India" *IJSRE.* Volume 4 Issue 1 January 2016. DOI: http://dx.doi.org/10.18535/ijsre/v4i01.01

Lemke, C, and E C Coughlin. "Technology in American Schools: Seven Dimensions for Gauging Progress". *A Policymaker's Guide.* Santa Monica, CA: Milken Exchange on Education Technology, 1998.

Mc Gorry, S. Y . "Online but on target? Internet based MBA courses: A Case Study". *The Internet and Higher Education*, 5 (2) pp 167-175.

McCausland, H.,Wache, D. & Berk, M. *Computer literacy; its implications and outcomes. A case study from the Flexible Learning Centre.* University of South Australia. 1999.

Oliver, Ron. "The Role of ICT in Higher Education for the 21st Century: ICT as a Change Agent for Education" r.oliver@ecu.edu.au

Saikia, Ruksana. " Role of ICT in Higher Education" *International Journal of Academic Research and Development* Volume 2; Issue 2; March 2017; Page No. 69-73, www.academicsjournal.com

SR, Girish & Dr.C. Sureshkumar. "ICT in Teaching Learning Process for Higher Education: Challenges and Opportunities". *IOSR.* Volume 19, Issue 4, Ver. III (Jul.-Aug. 2017), PP 24-28 www.iosrjournals.org DOI: 10.9790/0661-1904032428 www.iosrjournals.org

Suresh Babu, Dr.G.& Dr. K Sridevi. " Role of information and Communication Technology (ICT) in higher education: A study" *International Journal of Multidisciplinary Education and Research.* Volume 3; Issue 3; May 2018; Page No. 103-109 www.educationjournal.in

Assistant Professor
Smt. Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, Pusad Dist Yavatmal



Scanned with CamScanner

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगारांसंदर्भातील योगदान

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद, जिल्हा यवतमाळ

४३

**प्रस्तावना :**

भारतीय सामाजिक समाजव्यवस्थेच्या संदर्भात आपण जेव्हा विश्लेषणात्मक दृष्टीकोनातून विचार करतो, तेव्हा प्रकर्षाने जाणवते की, भारतीय समाजव्यवस्था ही विषमतावादी होती. स्वतःच्या स्वार्थासाठी ह्या व्यवस्थेची निर्मिती आर्यांनी व आजच्या तथाकथित ब्राम्हण व्यवस्थेने आपल्या हाताशी मराठा जातीच्या लोकांना पकडून निर्माण केली होती. ह्या विषमतावादी समाजव्यवस्थेचे पडसाद समाजात घट्ट होते. समाज व्यवस्थेने समाजातील शुद्रातिशुद्र, अस्पृश्य, पिडीत, उपेक्षित लोकांचे, समुदायाचे माणूस म्हणून जीवन जगणे नाकारले होते. सम्यक समबुध्दांने ह्या विषमवादी समाजव्यवस्थेवर आपल्या विचारातून, कृतीतून संघर्ष केला. माणूस म्हणून जन्माला आलेल्या माणसाला समाजात सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार आहे. आर्य, ब्राम्हण व मराठ्यांनी नाकारलेल्या अनेक उपेक्षित मानवांना आपल्या संघात प्रवेश दिला व मानवमुक्तीची बिगुल वाजविली, बौध्द धम्माला राजाश्रय प्राप्त झाले होते.

इ.स. पूर्व १८६ ला बौध्द धम्म भारतातून लयास गेला. आर्य, वैदिक धर्माभिमानी पुष्यमित्र शुंगाने बृहद्रथ याला षडयंत्र रचुन जीवंत मारले. तेव्हापासूनच वैदिक धर्म भारतात अधिक प्रमाणात वाढलेला दिसून येतो. आपण जेव्हा ह्या संदर्भात विचार करतो, तेव्हा तेव्हा एक गोष्ट लक्षात येते, बौध्द धम्मात, संघात, माणसाला माणूस म्हणून सनमानाने जीवन जगता येत होते. भारतीय विषमतावादी समाजव्यवस्थेवर विचारपूर्वक हल्ला चढवून सामाजिक क्रांती बुध्दाने घडवून आणली ही घटना सर्वश्रुत आहे.

बुध्दानंतर जेव्हा आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार करतो तेव्हा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्दाचा मार्ग अनुसरुन अनेक सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आंदोलने केलीत. चेहरा नसलेल्या माणसाला शुध्द चेहरा मिळवून दिला. हीच गोष्ट ह्या देशातील ब्राह्मणशाही व त्यांशी निगडीत इतर शाही यांना न पटणारी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कामगाराविषयी जे चिंतन केलेत व त्या चिंतनातून, कामगार वर्गाच्या हक्कासाठी व अधिकारासाठी अतिशय महत्त्वपूर्ण संघर्ष, आंदोलने, सभा, संमेलनाच्या माध्यमातून आवाज अधिक रुद्ध केला. कामगारांच्या हक्कासाठी, अधिकारासाठी एकमेव संघर्ष करणारा व्यक्ती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत.

एका अस्पृश्य माणसाचे नेतृत्व स्विकारणे हे इथल्या ब्राह्मणांना, मराठ्यांना कमीपणाचे वाटत होते. मात्र जेव्हा ह्या देशातील मराठे असो, मुसलमान असो, सिंधी असो जेव्हा यांचा नागरिकत्वाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा संविधान आठवितो ही मानसिकता ह्या देशाची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारांविषयीचे योगदान जेव्हा आपण लक्षात घेतो तेव्हा त्यांनी कामगाराविषयी केलेले भाष्य फार महत्वपूर्ण आहेत आणि या भाष्याकडे दूर्लक्ष केल्यामुळे इथल्या कामगार चळवळी संपूष्टात आल्यात. तथाकथित राजकारण्यांनी, कामगारांना विस्थापीत केलेत. गिरण्या, कारखाने केवळ उध्वस्त केले नाहीत तर त्यांच्याशी संबंधित अनेक कुटूंबे, त्यांचे जीवन



Assistant Professor
Smt. Vatsalabai Naik Mahila
301

जगण्याविषयीचे स्वप्नच उध्वस्त केलेत कारण कामगार संघटीत नसल्यामुळे कामगार उध्दवस्त झालेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी जो पर्यंत कामगार संघटीत आहेत तो पर्यंत त्याच्यावर विजय मिळविता कठीण आहे कामगाराचे तुकडे – तुकडे केले व संपूर्णतः कामगाराच इथल्या ब्राह्मणशाही, मांडवलशाही, नोकरदार वर्गाने मातीमोल केला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या संदर्भात केलेले भाष्य .**

* दि. २९ मार्च १९२९ 'गिरण्याचे मालक व कामगार '
* दि. १६ जानेवारी १९३१ 'सार्वजनिक नोकऱ्यात एकाच जातीची मिरासदारी नको '
* दि. १५ ऑगस्ट १९३६ 'स्वातंत्र मजूर पक्षाचा जाहिरनामा '
* दि. १३ फेब्रुवारी १९३८ 'भारतीय कामगार चळवळीची दशा आणि दिशा '
* दि. १५ सप्टेंबर १९३८ 'कामगारांना संपाचा हक्क नाकारणारे ट्रेड डिस्प्युट बील हाणून पाडा '
* दि. ९ नोव्हेंबर १९४० 'कामगारशाहीचा विजय असो '
* दि. १३ नोव्हेंबर १९४३ 'कामगार युनियनला मान्यता '
* दि. ८ फेब्रुवारी १९४४ 'कोळसा खाणितील स्त्री कामगारांचा प्रश्न '
* दि. ९ नोव्हेंबर १९४४ 'कामगारांच्या पगारी, सुट्या '
* दि. १४ जानेवारी १९४६ 'मजुरांच्या हिताचे कायदे आणि प्रतिनिधीत्व '
* दि. २१ फेब्रुवारी १९४६ 'भारतातील गीरण्या – कारखाने '
* दि. ११ मार्च १९४६ 'कामगारांचे कल्याण आणि सामाजिक सुरक्षितता '

सार्वजनिक कार्याच्या प्रारंभापासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार चळवळीशी निगडीत होते त्यांचे निवासस्थान व त्यांच्या कार्याचा बालेकिल्ला दामोदर हॉल हा मुंबईच्या परळ विभागात होता. हा परळ विभाग कामगार चळवळीचे आरंभ स्थान आहे कामगारांच्या चळवळीविषयी त्यांच्या सखोल चिंतनाचा परिचय त्यांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहिरनाम्यात होतो. दि. १२–१३ फेब्रुवारी १९३८ रोजी मनमाड येथे 'अखिल जि. आय. पि. रेल्वे अस्पृश्य कामगार परिषद' आयोजित करण्यात आली होती. या परिषदमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि. १३ फेब्रुवारी १९३४ रोजी 'भारतीय कामगार चळवळीची दशा आणि दिशा' विशद केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कामगार विषयी चिंतनाचा अभ्यास केल्यावर संपूर्ण देशात 'कामगारावर प्रेम करणारा डॉ. बाबासाहेबासारखा माणूस सापडणार नाही. त्यांच्या कार्याचा दुसरा अध्याय ते भारताचे मजूर मंत्री झाल्यावर सुरु होतो. व्हाईसरॉयच्या मंत्रीमंडळात १९४२ साली मजूर मंत्री म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. कामगार कल्याण हे सरकारचे कर्तव्य ठरविले, कामगार संघटनांना मान्यता दिली. किमान वेतन, प्रसुती रजा, कामगारांचे कामाचे तास, रोजगार नियोजन केंद्र या संबंधी तरतुदी व कायदे करुन घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगाराविषयीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भ**


१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : शुद्र पूर्वी कोण होते. २) प्रदिप गायकवाड : संपादीत कामगार चळवळ
३) भालचंद्र फडके : दलित साहित्य वेदना व विद्रोह.
४) डॉ. मा. प. थोरात : डेमोफून आंबेडकरी सौंदर्यदृष्टीचे आकलन.
प्रा. केशव मेश्राम : पहिले आंबेडकरी युवा साहित्य संमेलन उद्घाटकीय भाषण

# 'डेमोफून' कवी केतन पिंपळापुरे

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
E-mail: vikrantmeshram1976@gmail.com भ्रमणध्वनी ८७८८७३१८८४/९४०३४०५४९०

## सारांश (Abstract)

नवोदोत्तर आंबेडकरी साहित्यामध्ये कवि केतन पिंपळापुरे हे एक महत्वपूर्ण नाव आहे. त्यांचे एकूण ०६ कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत. आंबेडकरी चळवळीत, आंदोलनात एक हाडामासाचा खऱ्या कार्यकर्ता म्हणून वावरत असतांना त्यांच्या कवितेचा जन्म झाला. त्यांच्या काव्यसंग्रहाचे नाव पाहिले तर कवितेच्या प्रतिमेची व तत्वज्ञानाची प्रचिती येते. विषमतावादी समाजरचना बदलून समतेवर अधिष्ठीत समाज रचना निर्माण होण्याकरीता माणसाला नैतिक अधिकार मिळाले पाहिजे. ह्या करीता ते सातत्याने आंबेडकरी चळवळीत राबले व कवितेच्या माध्यमातुन आवाज बुलंद केले. आंबेडकरी साहित्यात कवि केतन पिंपळापुरेंचा अभ्यास चिंतन केल्याशिवाय पुढे जाताच येत नाही.

## विषय विवेचन

१९६० हा दशक आंबेडकरी साहित्याचा प्रारंभ. १९६० च्या पूर्वी अस्पृश्य जातीत जन्मलेल्यांनी जे साहित्य निर्माण केले त्याला आंबेडकरी साहित्य म्हणता येईल असे तर नाही. पूर्वीपासूनचे दलित साहित्य आणि सुधारित आंबेडकरी साहित्याचे प्रेरणा, उर्जास्रोत, आदर्श हे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. दलित साहित्याची अनेक प्रतिभावंतांनी व्याख्या, संज्ञा केल्या आहेत. जो पिडीत, शोषित, उपेक्षित तो दलित असा एकंदर अर्थ त्या संज्ञातुन प्रतिपादीत होतो. मात्र जसे–जसे दलित साहित्य प्रकाशित होत गेले तेव्हा लक्षात आले की, दलित साहित्यिक स्वतःला म्हणून घ्यायचे मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराशी बेइमानी करायचे.

मित्रांनो, आंबेडकरी साहित्याची एक अट आहे ती अशी की, आंबेडकरी म्हणून घेण्यासाठी परमेश्वर आत्मा, परमात्मा, नशीब, धर्म, पुनर्जन्म, खोट्या रुढी परंपरा नाकाराव्या लागतो. जो नाकारतो तोच खऱ्या अर्थाने आंबेडकरी होतो. आंबेडकरी होणं ही समजण्यास अवघड गोष्ट आहे. म्हटलं तर ती एक जोखिम आहे. आंबेडकरवादी जो तो जातीतून सगळ्यात आधी बाहेर पडतो. आंबेडकरवादी जो तो प्रदेशातून, पंथातून, वेगवेगळ्या पंथामधून स्वतःला बाहेर काढतो, पडतो. आंबेडकरवादी तो जो नेहमी ग्लोबल भाषा बोलत राहतो आणि आपल्या दुःखाची नाळ जागतिक दुःखाशी जोडत राहतो. मी तर असं म्हणतो जो आतून आणि बाहेरुन पूर्णत्वाने आंबेडकर स्विकारतो तो खऱ्या अर्थाने आंबेडकरी, खरा आंबेडकरी तो असतो. या सगळ्या गोष्टींचा आपण विचार केला तर प्रत्येकाने स्वतःलाच प्रश्न विचारावा की, आंबेडकरवादी कोण आहेत आणि कोण नाहीत. कारण आंबेडकरवादी होण्यासाठी सुध्दा एक मोठी किंमत चुकवावी लागते. उर्जा कमवावी लागते. संघर्ष करुन पात्रताही कमवावी लागते. बहुतेक वेळेला आपण अनुवंशिकतेने आंबेडकरी होतो. किंमत न चुकवता आंबेडकरवादी होतो. त्यामुळे गफलती सुध्दा खूप होतात. असाच एक आंबेडकरवादी कवी केतन पिंपळापुरे यांच्या कवितासंग्रहाचा आपण अभ्यास केला तर लक्षात येईल.

कवी केतन पिंपळापुरे यांचे एकूण सहा कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. सूर्यकंकण, मार्शल रेस, डेमोफून, हेमलॉक, मकाबी, नोबलट्रुथ ह्या सहाही कवितासंग्रहाच्या नावावरुन एक गोष्ट अधोरेखित होते ती ही की, कालकथित, स्मृतिशेष कवी केतन यांनी आपली दुःखाची नाळ जगातील दुःखीत बांधवाशी जोडली आहे. कवी केतन खऱ्या अर्थाने आंबेडकरवादी कवी आहेत. त्यांची जडण–घडण, वैचारिक चळवळी समता सैनिक दलात राबताना घडली आहे. कवी केतनच्या 'डेमोफून' या कवितासंग्रहावर आज भाष्य करणार आहे.

'डेमोफून' ही ग्रीक पौराणिक कथा लिहणारा लेखक कथाकार महापुरुष होता. या कथेवर विविध काळात विविध भाष्य लिहिली गेली असावित. 'डेमोफून' या ग्रीक कथेवर आधारित कविता संग्रह आहे. डेमोफून महापुरुष झालाच नाही, तो सर्व सामान्य मनुष्यच राहिला. दुःख, दारिद्र्य, वेदना त्याच्या वाट्याला आले. आजच्या दुःखी



Scanned with CamScanner

मानव जनाला दुःखातुन मुक्त करणारा महापुरुष याच मातितून येईल असा विश्वास डेमोफून या राजपुत्राला वाटत असतो. म्हणून तो लहान पणापासूनच 'डेमोफून' ला वेगवेगळ्या यातनांमधून जगणे अनुभविते. दुःखातून मुक्त करण्यासाठी डेमोफूनची ती तडफड करतो.

आज आपल्या देशात अनेक समस्या आहेत. [illegible] दुःखातून मुक्त करणारा माणूस याच मातीतून जन्म घेईल असा विश्वास 'डेमोफून' हा काव्यसंग्रह वाचल्यानंतर लक्षात येतो. 'डेमोफून' ह्या काव्यसंग्रहात 'महापुरुष' आहे तो बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या

The bodhisattva is now beyond time and space. He is one with infinity, but he still retains name-rupa Out of his great compassion for all beings.

(The Buddha And His Dhamma- Page: 77)

कवी केनच्या 'डेमोफून' काव्यसंग्रहात एक श्रेष्ठ प्रकर्षाने आपल्याला ते म्हणजे [illegible]

*त्यांना प्रिय आहे देशापेक्षा मंदिर*
*आणि संविधानापेक्षा त्यांचे धर्मग्रंथ*

(वर्शिपींग कॅल्ला डेमॉक्रसी / पृ. ८३)

या काव्यओळीतून त्यांनी सनातन काळापासून या आजतागायतची वास्तवता अधोरेखित केली आहे.

सभ्यतेचे बागबगिचे तुडवीत
उधळणारा हे बेकनचा मस्तवाल घोडा
म्हणून भौतिक विकासवादाच्या पाठीवर
वैज्ञानिक जीवनवादाची खोड ठोकून
जेव्हा बलदंड मनाने नाळविली जाईल
बेकनची घोडदौड सृजनाच्या दिशेला
तेव्हाच जीवन शाश्वत सुंदर होईल आणि
शेक्सपिअरसह बेकनही बुध्दत्वाशी लीन होईल.

(बेकनचा नोंखूर उधळलेला घोडा – पृ. ७८)

ह्या काव्यपंक्तीतून कवीनं मानवाच्या उत्थानासाठी हवी असणारी नीतीमत्ता स्वच्छ व पारदर्शकपणे मांडलेले आहे.

रोजचाच दिवस आमच्या दारात काटे घेऊन उभा राहतो.
काळ असा की जगण्यासाठी घेतलेल्या.
चार श्वासांसाठी टॅक्स मागतो.
आणि लोचनांना किनारा आसवांनी झिरपलेलाच दिसतो.
सारे गावच वणव्याने पोळलेले.
आयुष्यातून उठून जाणे.
असे वास्तव रोज ब्लॅकमेल करीत असते.
सृजनाने मुक्तपणे व्हावे अभिव्यक्त असे नवे युग येणार आहे.

(असे नवे युग येणार आहे, पृ. ४)

दुःख, दैन्य, दारिद्रयातून, सुटका होईलच, विचारवंतांच्या विचाराला बंदिस्त करता येणार नाही त्यांच्या अन्याय–अत्याचारावर शोषणावर मुक्तपणे बोलता येईल असे नवे युग येणार आहे. हा आशावाद त्यांनी मांडला आहे.

बुध्दाची प्रज्ञा ही संपूर्ण विश्वातील प्रत्येक बौध्द प्रज्ञावंताची प्रज्ञा आहे. या संदर्भात

मी अडीच हजार वर्षांपूर्वीच केली आहे
त्यांच्या मेंदूची शस्त्रचिकित्सा
मी आहे प्रज्ञा... (ब्रेनगेवीन, पृ. ८)

माझ्या युगाच्या क्षितीजावरील अस्वस्थ पाखरांनो या असे जवळ या
पंखांना एकमेकांच्या जवळ, घ्या आपणच उचलू या हे अंधाराचे जाळे आणि
आपणच होऊ या मुक्तिच्या स्वप्नांचे आभाळ निळे... निळे....

(माझ्या युगाच्या क्षितिजावरी अस्वस्थ पाखरांनो, पृ. १०४)



306

मला हवे आहे माझ्या लेखणीसाठी ज्वालांचे सळसळणे,
मला हवे आहे आकाशासाठी
इच्छेने मनापासून मळलेले
मी एक देईन तेव्हा झाले पाहिजे गर
गळाळले पाहिजे मोकळ्याने पान न् पान
असे सुगंध जाले
गळ्यातून झाले पाहिजेत एका पुरुषार्थाचा हे सत्यस्वरूप
या विझलेल्या प्राणांच्या मशालीसाठी
मला हवे आहे आगची एक अभिसारिका
(माझ्या ओंजळीतील आसवांची लाख लाख फुले होतील, पृ. १९)
हृ धरतीच्या प्रारंभाला आरंभ बिंदू
दुसऱ्याशिवाय चंद्र, सूर्य तारे
ग्रह, दिशा, आरंभ, अंत,
भूत, वर्तमान, भविष्य
आणि आकाश – पाताळ शून्य.

(डेमोफून, पृ. ७१)

भूक आणि भौतिक सुखाच्याही पुढे सुरु होणाऱ्या अनाकलनीय विश्वाची...
यापूर्वी कुणीच केली नव्हती चिंता आणि सम्यक चिकित्सा
श्रमशोषणाच्या आर्थिक चिंतनविश्वातही असलेली ही तूट
त्याने सव्याज भरून काढली आणि तो झाला विश्वविजेता.

(बाबासाहेब आंबेडकरांनी, पृ. ६७)

ही वास्तवता त्यांच्या कवितेतून जाणवते. आसवांची फुले होणे म्हणजे मानवाचे दुःख नष्ट होणे होय. अन्नाची भूक शोषित वर्गाच्या पोटात व भौतिक सुखांची भूक शोषक वर्गाच्या देह–भानात असल्याने मानव दुःखात आहे. मार्क्सवादी विचारात असलेली कमतरता डॉ. बाबासाहेबांनी भरून काढली हा आशावाद कवीच्या कवितेतून व्यक्त होतांना दिसतो.

माझ्या ओंजळीतील आसवांची लाख लाख फुले होतील. (पृ. ७४)

ही वास्तवता, आशावाद त्यांनी कवितेच्या माध्यमातून अभिव्यक्त केला आहे.

## निष्कर्ष

- 'डेमोफून' ही संकल्पना ग्रीक पौराणिक कथेतून घेतली आहे.
- वास्तवतेवर आधारीत कविता आहे.
- आंबेडकरी साहित्यिक होण्यासाठी आधी देव, धर्म, आत्मा, परमात्मा नाकारावा लागतो.
- आंबेडकरी तो जो आतून आणि बाहेरून आंबेडकर स्विकारतो.
- 'डेमोफून' ह्या काव्यसंग्रहात वास्तव जिवन जाणीव आहे.
- मानवाच्या उत्थानासाठी हवी असणारी नीतीमत्ता स्वच्छ व पारदर्शकपणे मांडली आहे.

## संदर्भ

कांबळे उत्तम : आंबेडकरी साहित्य.
तोरात डॉ. म.प. डेमोफून आंबेडकरी सौंदर्यदृष्टीतून एक आकलन.
मोरे सतेश्वर : अध्यक्षीय भाषण – तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन वर्धा.
मोरे सतेश्वर : प्रस्तावना निळ्येश कविता संग्रह.

❖❖❖



Assistant Professor
Smt. Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, Pusad Dist. Yavatmal

302

Scanned with CamScanner

# ८. संत चोखामेळा व सामाजिक समता

प्रा. विक्रांत कृष्णराव [illegible]
मराठी विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ.

संत साहित्यात संत चोखाबाच्या अभंगातून सामाजिक समतेचा विचारपुढे आला आहे. त्यांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून मानवातील भेद-भाव, तिरस्कार, जातियता व वर्णव्यवस्था संपली पाहिजे. एखाद्या साहित्याचा अभ्यास संशोधन, चिकित्सा, विश्लेषण करतांना त्या त्या कालखंडाचा अभ्यास केल्याशिवाय संशोधन, चिकित्सा विश्लेषण करता येणे अशक्य आहे. मग ती कोणत्याही कालखंडातली साहित्य कलाकृती असो. कालखंडाचा विचार केल्याशिवाय पुढे जाताच येत नाही. जेव्हा आपण संत साहित्याचा अभ्यास करतो, तेव्हा एक गोष्ट लक्षात येते, ती म्हणजे महाराष्ट्रातील संत परंपरा विठ्ठल भक्तीतच विलिन झाली. त्यातच त्यांनी धन्यता मानली.

महाराष्ट्रात बाराव्या शतकाच्या प्रारंभी काळात संत, संप्रदाय, नाथ, वैष्णव, भक्ती परंपरेला सुरवात झाली. ही परंपरा द्वैत, अद्वैत तत्वज्ञानावर होती बाराव्या-तेराव्या शतकातील संत, संप्रदायाचा अभ्यास करत असतांना तत्कालिन सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक भक्ती परंपरेचा अभ्यास करावा लागतो. तत्कालिन काळाकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करून, पूर्वग्रह दुषित ठेऊन अभ्यास करणे म्हणजे एक प्रकारची साहित्यिक बेईमानी होय असे मला वाटते.

महाराष्ट्रातील संत, संप्रदाय, परंपरा बौध्द धम्म, संघापर्यंत का पोचली नाही. जेव्हा की बौध्द धम्मात माणसाला माणुसपण म्हणून सन्मानाने वागविले जात होते. सामाजिक धार्मिक, शैक्षणिक विषमता नाकारून माणसाला माणुसपण म्हणून सन्मानाने वागविले जात होते. सामाजिक धार्मिक, शैक्षणिक विषमता नाकारून समानतेवर आधारित, मानव कल्याणाच्या तत्वमानाकडे संत परंपरा जाऊ शकली नाही की, त्यांना जातिव्यवस्थेने, वर्णव्यवस्थेने अडथळा निर्माण केला होता. जर अडथळा निर्माण केला तर संत परंपरेने अडथळा उद्ध्वस्त का केला नाही असा प्रश्न संशय निर्माण होतो. वर्ण व्यवस्थेने माणसाचे माणसपण नाकारले असतांना, मानवाच्या वाट्याला वेदना, नकार, अवहेलना असतांना साहित्यातून, अभंगातून विद्रोह निर्माण केला. परंतू संघर्षात्मक आंदोलनात्मक विद्रोह पेटविण्यात व समतावादी समाज स्थापन करण्यास संत परंपरा कुचकामी ठरली. विठ्ठल भक्तीत सर्व जाती जमातीच्या लोकांनी तल्लीन व्हायचे मात्र वैयक्तिक जीवनात जाती-वर्णव्यवस्थेचा काटेकोर पालन करायचे यापलीकडे काहीच करता आले नाही.

## संत चोखामेळा

संत चोखामेळा अस्पृश्य जातीत जन्माला आलेले, संत परंपरेत महत्त्वपूर्ण अशी त्याची लौकिकता, विठ्ठल भक्तीची परंपरा चोखोबाच्या घरात त्यांच्या आजी-आजोबापासून चालत आलेली असे म्हणतात, अस्पृश्यतेचा पहिला हुंकार त्यांच्या अभंगातून व्यक्त झाला. त्यांच्या काव्यनिर्मितीची परंपरा जशी अध्यात्मिक तशी

सामाजिकही असल्याचे त्यांच्या अभंगावरून लक्षात येते. त्यांची पत्नी संत सोयराबाई परमेश्वर भक्तीत तल्लीन झालेल्या त्यांनी आपले अध्यात्मिक अनुभव अभंगाच्या आधारे अभिव्यक्त केले. अस्पृश्यतेची दाहक झळ तीलाही भोगावी लागली. चोखामेळयाच्या कुटूंबातील पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, बहिण निर्मळा व मेहूणा बंका यांनीही आपल्या अभंगाच्या माध्यमातून सामाजिक विषमते विरूध्द विद्रोह पेटविला. मानवाच्या बाहयरूपापेक्षा आंतरिक भाव पवित्र व सात्विक असतो. हे त्यांनी अभंगाच्या माध्यमातून पटवून दिले.

माणूस जन्माने किंवा जातीने श्रेष्ठ ठरत नसतो तर तो आपल्या कर्माने श्रेष्ठ ठरत असतो. सोळाव्या शतकात संत तुकारामांनी हेच सांगितले, एकोणविसाव्या शतकात महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, सोळाव्या शतकात राजे छत्रपती शिवराय, पुढे कर्मयोगी संत गाडगे बाबा, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देखिल हेच सांगितले. मनुष्य आपल्या कर्माने मोठा ठरत असतो. जो विचार, तत्वज्ञान तथागत गौतम बुध्दांनी दिला तो विचार, तत्वज्ञान चोखामेळा शब्दातून मांडतात मात्र बुध्दापर्यंत जाऊ शकत नाही, हा संशोधनाचा विषय आहे.

सांस्कृतिक परंपरा कोणतीही पाठीशी नसतांना प्रांजळ भावनेने केलेली काव्यनिर्मिती किती उत्कट असते हे त्यांच्या अभंगातून जाणवते. चोखामेळा यांच्या वाटयाला आलेली अस्पृश्यतेची दाहक चटके व त्यांच्या वाटयाला आलेले दु:ख, व्यथा, वेदना विठ्ठला पुढे मांडताता व म्हणतात मी खालच्या जातीत जन्म घेतला यात माझा काय दोष? सामाजिक विषमतेचे व वर्णव्यवस्थेच्या वेदना त्यांच्या वाटयाला आल्या होत्या.

महाराष्ट्रात बाराव्या शतकात संत, चळवळ, महानुभाव पंथ, शैव, वारकरी संप्रदाय इत्यादी द्वैत व अद्वैत तत्वज्ञानावर आधारित प्रबोधन केले. संस्कृत ही मुठभर लोकांची भाषा असल्यामुळे ती देवभाषा म्हणून त्या भाषेचा उदोउदो करण्यात आला. संस्कृत भाषा ही लोकभाषा नसल्यामुळे सर्व सामान्य नागरिक संस्कृत भाषेपासून अलिप्त होते. संत ज्ञानेश्वरांनी 'गीता' हया संस्कृत मधल्या तत्वज्ञानाच्या ग्रंथावर भाष्य केले, टिका केली. 'गीता' हा ग्रंथ लोकभाषेत आणला. महानुभाव पंथातील म्हाइंभटांनी 'लीळाचरित्र' हा ग्रंथ मराठी भाषेत आणला संत ज्ञानेश्वर व त्याच्या भावंडाना, महानुभाव पंथातील अनुयायांना याची किंमत मोजावी लागली.

संत चोखामेळा व त्याच्य परिवारातील इतर लोकांना अस्पृश्य जातीत जन्म घेतल्यामुळे त्यांचे शोषण झाले ते म्हणतात,

ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा |
काय भुललासी वरलीया रंगा ||
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा
काय भुललासी वरलीया रंगा
(संत चोखामेळा)
देहासी विटाळ म्हणती सकळ |
आत्मा तो निर्मळ शुध्दबुध्द

40

देहीचा विटाळ देहीच जन्मला ।
सोवळा तो झाला कवण धर्म

संत परंपरेत चोखामेळा यांच्या कुटुंबातील लोकांनी अभंगाच्या माध्यमातून सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मानवी कल्याणाच्या उध्दारासाठी त्यांनी विठ्ठलापुढे शरणागती पत्करली. वर्ण जाती व्यवस्थेचे दाहक अनुभव त्यांनी अभंगाच्या माध्यमातून मांडले. चोखोबा म्हणतात, मी विठ्ठलभक्त आहे. माझा भक्तीभाव स्वच्छ, पारदर्शक आहे, निर्मळ, पांजळ आहे. मात्र माझा जन्म अस्पृश्य जातीत झाल्यामुळे माझा विटाळ, तिरस्कार केला जातो. उस वाकडा-तिकडा असतो, त्या सुनिश्चित आकार नसतो, रंग नसतो. मात्र जेव्हा उसाचा आपण आस्वाद घेतो तो किती गोड, मानवी समाधान प्राप्त करुन देणारा असतो. उसाच्या रंग-रुपावरुन त्याच्या कोनीच तिरस्कार करीत नाही. मग माझाच का तिरस्कार केला जातो, असा रोखठोक प्रश्न ते विठ्ठलापुढे करतात. परमेश्वराच्या भक्तीसाठी जात-धर्म आडवा येऊ शकत नाही. हे त्यांनी आपल्या अभंगातून प्रस्तुतपणे मांडले आहे.

संत चोखाबाची पत्नी यांनीही भक्तीभावपूर्ण अभंग रचना केली. चोखोबाचा मुलगा कर्ममेळा हा सुध्दा विद्रोही संत कवी होता. त्या काळची वर्णव्यवस्थेने माणसाचे माणुसपण कसे नाकारल्या गेले हे त्यांनी अभंगाच्या माध्यमातून मांडले आहे. सोयराबाई म्हणतात, मानवी देहालाच विटाळ असतो, असे सर्वच म्हणतात, इथून तिथे सर्वांचा देह विटाळच असतो. आत्मा मात्र निर्मळ असतो. देहानेच देहाला विटाळातून जन्म दिला. देह कोणत्याही धर्माचा असो तो सोवळा नसतोच. विटाळाशिवाय जगातील उत्पत्तीच शक्य नाही. हे विश्व निर्माण करणाऱ्या पांडुरंगा मी तुझे कौतुकच करते.

संत चोखामेळयाच्या संपूर्ण कुटूंब विठ्ठल भक्तीत रममान होता. आपण अस्पृश्य जातीत जन्माला आल्यामुळे आपल्याला प्रत्यक्ष विठ्ठलाच्या चरनाला स्पर्श करता येत नाही. त्यांनी आत्मा, परमात्मा, स्विकारला. सोयराबाईनी केलेला समतेचा पुरस्कार दलित मुक्तिच्या संग्रमातील महत्त्वपूर्ण घटना होय. संताच्या साहित्यात अध्यात्मच असणे असे नाही तर मानवा उन्नत करणारे विचारही असते. संत साहित्याचा पाया नैतिक मूल्यावर आहे. मराठी कवितेचा वारसा संत साहित्याने अविरतपणे सांभाळला. नैतिक दृष्टीकोनातून संतांनी केलेले कार्य, लेखन महत्त्वपूर्ण आहे. संताच्या काव्यांनी मराठी भाषेच्या मध्यवर्ती स्थान दिले. मराठी भाषा जनभाषा, लोकभाषा त्यांच्याच मुळे झाली. मराठी संस्कृतिच्या घडणित फार मोठा वाटा संत साहित्याचा आहे.

'संतानी सांगितलेला मानवी कल्याणाचा, नैतिक मूल्याचा समाजात आपण रुजवू शकलो नाही. संताच्या साहित्यातून परस्त्री मातेप्रमाणे आहे. हा विचार संत साहित्यातून आला आहे. सामान्य स्त्री, वेश्या, देहविक्री करणाऱ्या स्त्रीया मातेप्रमाणेच आहे असे चक्रधर स्वामी म्हणतात.' (प्रा. सतिश बडवे - बिज भाषण संत साहित्य व स्वरूप)

संताच्याही पूर्वी तथागत सिध्दार्थ गौतम बुध्दांनी मानवी कल्याणाचा मा हया समस्त विश्वाला सांगितला, सामाजिक समता निर्माण केली. आत्मा, परमात्मा, पूनर्जन्म बौध्दांनी नाकारला, जन्म आणि मृत्यु हे शाश्वत सत्य आहे. हे तत्वज्ञान तथागतांनी मांडले. भाव महाराष्ट्रातील संत परंपरा जाती - वर्णव्यवस्थेत अडकून पडली.

तथागताच्या सामाजिक समतावादी, तत्वज्ञानवादी तत्वज्ञापर्यंत संतपरंपरा पोचली नाही. चोखोबाचे कुटुंब देखिल विठ्ठलापुढे नतमस्तक झाले आहे.

**निष्कर्ष**

१. संत चोखोबांनी सामाजिक समतेचा विचार अभंगातून व्यक्त केला.
२. आत्मा, परमात्म स्विकारला.
३. वर्णव्यवस्थेवर प्रहार केला.
४. मानवी कल्याणाचा मार्ग सांगितला.
५. सत परंपरा बौध्द धम्मापर्यंत पोचलीच नाही.

**संदर्भ**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - शुद्र पूर्वी कोण होते.
२. डॉ. सतिश बडवे - मुंबई विद्यापीठ उजळणी वर्गातील बिज भाषण.
३. डॉ. सतिश बडवे - संत - साहित्य - स्वरूप परिषदेतिल बीज भाषण, लातुर.
४. डॉ. सतिश बडवे - साहित्याची सामाजिकता.
५. डॉ. सतिश बडवे - संत साहित्य समीक्षेचे बीज प्रवाह. (स्वातंत्र्यपुर्व काळ)
६. डॉ. सतिश बडवे - मध्ययुगीण साहित्या विषयी.
७. संपादित पूर्णामाथ - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
८. संपादित पुस्तक – पूर्णामाय, संत गाडगेबाब अमरावती विद्यापीठ, अमरावती.
९. संपादित पुस्तक - मृदगंध, बी. ए. भाग - २. संत गाडगेबाब अमरावती विद्यापीठ, अमरावती.

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १५. जागतिकीकरणात अभिव्यक्त झालेली : आंबेडकरी कविता

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभागप्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ.

प्रस्तावना

42

१९६० च्या दशकात दलित साहित्याची स्थापना झाली / निर्मिती झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून दलित साहित्याची झाली. वेदना, विद्रोह, नकार व नीत मूल्य दलित साहित्याचे अधिष्ठान होते. दलित साहित्याची निर्मिती ही मनोरंजनासाठी किंवा कलेसाठी कला म्हणून निर्माण झाली नव्हती तर माणसाला केंद्रबिंदू मानून त्याच्या सर्वांगिन उत्थानासाठी, परिवर्तनासाठी दलित साहित्याची निर्मिती झाली. दलित साहित्याने माणूस हा केंद्रबिंदू मानुन त्याच्या अवतीभवती गढूळ परिस्थिती व्यक्त करण्यासाठी ह्या साहित्याचे मोठे योगदान आहे.

इ.स. पूर्वीपासून ह्या देशातील व्यवस्था अस्पृश्यांच्या विरोधातच राहिली आहे. ती अजूनही कोणा न कळत आहे. पुरोहितशाही प्रस्थापितांची अस्पृश्य समुहातील माणसाचे मनुष्यत्व नाकारले होते. त्यांचे मुलभूत अधिकार नाकारले होते. ह्या अभावग्रस्त समुहाने आपल्या दुःखाचे, दारिद्र्याचे, भुकेचे, उपासमारीचे, अन्याय-अत्याचाराचे वास्तव चित्रण शब्दबद्ध करून साहित्याच्या माध्यमातून मांडले. ह्या देशातील अभावग्रस्त माणसाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषितांसाठी आपल्या चळवळीच्या माध्यमातून संघर्ष केलेत.

कार्यकर्ता.. चळवळ... साहित्य अशी त्रैसूत्री दलित साहित्याची आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला तमाम अस्पृश्यांना बौद्ध धम्माची दिक्षा देऊन अस्पृश्य बांधवांना बौद्ध धम्म दिला. २२ प्रतिज्ञा दिल्यात याचे पडसाद गावागावात शहराशहरात दिसू लागले व त्याच बरोबर साहित्यात सुद्धा दिसायला लागलेत.

नव्वदच्या दशकात भांडवलशाही वर्गाने जागतिकीकरणाची प्रक्रिया दृढ केली व त्याचे वाईट परिणाम ह्या देशातील सर्व सामान्य माणूस भोगत आहेत. ह्या जागतिकीकरणाने सर्व सामान्य माणसाचे, शेतकरी, कास्तकरी, मजुर, हमाल, मिल मजुर इत्यादींचे कंबरडेच मोडून टाकलेत ह्याचे पडसाद दलित साहित्यात पडलेत.

नव्वदच्या दशकात दलित संकल्पनेऐवजी आंबेडकरी संकल्पना स्वीकारून दलित ही संकल्पना नाकारण्यात आली. दलित साहित्य असे न म्हणता आता आंबेडकरी साहित्य अशी संकल्पना आंबेडकरी साहित्यिकांनी स्विकारली आहे. आंबेडकरी तो ज्याने आंबेडकर स्विकारला, धर्म व परमेश्वर नाकारला दलित तो ज्याने आंबेडकर स्विकारला स्वतःच्या स्वार्थासाठी मात्र धर्म व परमेश्वर नाकारला नाही. मात्र आता आंबेडकरी साहित्य व साहित्यिक तोच ज्याने पूर्णत्वाने आंबेडकर स्विकारला; नव्वदच्या दशकात आंबेडकरी साहित्यातून जागतिकीकरण अभिव्यक्त होऊ लागला. अशी बौद्ध धम्मक्रांती साठच्या दशकाला प्रभावित करणारी घटना आहे. या धम्म क्रांतीने सामाजिक नव्हे तर सांस्कृतिक पातळीवर बदल घडवून आणला.



312

ज्या मराठी साहित्याला आपल्या सामाजिक [illegible] सामाजिकतेचे भान आणि विचाराचे अधिष्ठान या धम्म क्रांतीने दिले. आंबेडकरी [illegible] केली आहे आणि जागतिकीकरणाशी ती तितकाच ताकदीने उभी राहिली.

कवी प्रभू राजगडकरांनी [illegible] आदिवासी समाजाच्या वाट्याला आले दुःख मांडलेत. आंबेडकरी साहित्यिक उत्तम [illegible] आंबेडकरवादी तो जो संवेदनशील असतो. त्याला सात समुद्रापलिकडच्या सुख-दुःखाची साद [illegible] की, या पृथ्वीवर जन्माला आलेल्या प्रत्येक जीवाच्या रक्ताचा रंग लाल असतो; [illegible] याच खात्री असतो. यावर विश्वास ठेवणारा आंबेडकरवादी असतो". ह्यांनी [illegible] असते. प्रभू राजगडकरांनी निकाल, गोंगलु, महाडी अॅटीट्युड इन आदिवासी या [illegible] होणाऱ्या शोषणाचे वास्तव चित्र रेखाटले आहे. जागतिकीकरणात आदिवासी समाज [illegible] जागतिकीकरणाने जो अंधार पसरविला आहे तो आता दूर केला पाहिजे हा अर्थाने –

[illegible]
[illegible]
[illegible] दिवा
[illegible]
[illegible] विचारांचे
हे असं!
[illegible] हसली.
[illegible]
[illegible] विचारांचे
[illegible] हे असं!
[illegible] सूर्यानं हसली
[illegible]
"[illegible] अंधार दूर करूया!"

जागतिकीकरणाने पसरविलेला अंधार दूर [illegible] आदिवासी समूहाच्या वाट्याला ठळडे येणारच नाही. असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. [illegible] साहित्यिक आनंद गायकवाड आशोका व्यक्त करतांना जागतिकीकरणात अभिव्यक्त होतांना-

55

बापू,

या बंदरांचा नरेंद्र कोण?

लोकशाहीच्या छाताडावर

मस्त नाचणारी ही बंदरे कुणाची?

बापू ही बंदरे शांत होत नाहीत,

तो अंगणात अहिंसेचा धूप पेटवून

बंदरांना आता धूप चालत नाही,

त्यांच्या शेंडयांना लागली रक्ताची चटक

बापू

या बंदरांना रोखणारी

तुमच्या अहिंसावादातील एखादी तरतूद

सांगाल काय ?

किंवा या जागतिकीकरणात ज्यांच्या जवळ सत्ता आहे, पैसा आहे. ती सर्व सामान्य माणसांचे कसे शोषण करत संदर्भात आनंद गायकवाड, 'सिंह' या कवितेतून अभिव्यक्त होतांना –

सिंह जायबंदी असला की

मुसक्या मिशा कुरवाळत अन्

पायात शेपटी घालून राहणारे

गल्लीतले कुत्रे ही

मागून वार करतात.

जागतिकीकरणात भारताची वास्तव परिस्थिती रेखाटत असतांना कवी हेमंतकुमार कांबळे,

अलीकडे विज्ञान, पलीकडे अज्ञान

अशा विषमतेच्या हिंदोळ्यावर

कोंकाणतोय भारत

बसलाय श्रमिकाला मारत

अन दलालांना तारत

साहेब सावधान !

एल.पी.जी. ने दम कोंडत आहे

भारताचे सार्वभौमत्व.

जागतिकीकरणाने भारत आणि इंडिया असा फरक केला आहे. गरीब अधिक गरीब होत दारिद्र्याच्या व उपासमारीच्या खाईत जात आहे.

जागतिकीकरणात भूक आणि भाकर माणसाला कोठे हरवत चालले आहे याचे वास्तव चित्रण कवी [illegible] यांनी आपल्या "भाकरीच्या शोधात" या दीर्घ काव्यसंग्रहातून अभिव्यक्त केली आहे.

माणसांनो म्हणून मी फिरतोय
भिकाऱ्यांच्या चौकातून / शहरातून/गल्लीबोळातून
कुठलाही चौक भूकबळी म्हणून
शहीद झालेल्या माणसाच्या नावे लागला
असे कोणत्याच शहरात आढळले नाही
आणि विदेशातील भिकारी
श्रीमंत झाल्याच्या वार्ता
वर्तमानपत्रात छापून येताहेत
काय कमाल आहे-
आजकाल भिकारीही अफवेचे बळी ठरताहेत
मी पैदा झालो
अन भाकर म्हणजे काय
एकदा अर्थ
मलाही हळूहळू कळला
तेव्हापासून भाकरीच्या तुकड्यासाठी
माझाही घेराव
सुरू झाला

तर कवी प्रा. डॉ. अनिल काळबांडे जागतिकीकरणाविषयी आपला आक्रोश व्यक्त करतांना-

सेक्स, मॉल, कार्पोरेट, ई-लर्निंग, स्पर्धा
हे आता इथे जोमाने विकत आहेत
आमची गरिबी विकून / पैसा करून
कोणत्या भारत निर्माणची निर्मिती करणार आहात ?

Assistant Professor
Smt. Vatsalabai Naik Mahila
Mahavidyalaya, Pusad Dist Yavatmal

**समारोप**

जागतिकीकरणात आंबेडकरी आपल्या साहित्याच्या माध्यमातून अभिव्यक्त होताना माणसाला मागे आले पाहिजे, जागतिकीकरणात आंबेडकरी कवी माणसाच्या बाजून उभा आहे. मशिनच्या बाजूने नव्हे. ... सर्वाधिक फटका या देशातील सर्व सामान्य समूहाला बसला आहे. सर्व सामान्य माणसांचे जीवन धोक्यात ... तो सामन्याने डोळ्यात तेल टाकून जगत आहे. आणि जागतिकीकरणाच्या होणाऱ्या वाईट / किंवा उत्पन्न... परिस्थितीपासून सर्व सामान्य माणसाला सजग करतो आहे. सजगतेची भूमिका जागतिकीकरणात आंबेडकरी ... आहे.

**संदर्भ**

१. डॉ. आंबेडकर बाबासाहेब – शुद्र पूर्वी कोण ?
२. कांबळे अनिल – हुंकार-कवितासंग्रह
३. गायकवाड आनंद – आखरीचं वुक्षाच सडान चिववीन-कवितासंग्रह
४. घुमे लक्ष्मिकांत – भाकरीच्या शोधात – कविता संग्रह
५. राजगडकर प्रभू – अर्वाचीन मराठी कविता / येथून पुढे – कविता संग्रह
६. गायकवाड आनंद – इस्तो – कवितासंग्रह
७. कांबळे उत्तम – आंबेडकरी साहित्य
८. कांबळे उत्तम – जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न
९. मोरे संतेश्वर – अध्यक्षीय भाषण – तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २३. महात्मा जोतिबा फुले कृतिशील समाजचिंतक

प्रा. विक्रांत कृष्णराव गैधाम
मराठी विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई महिला महाविद्यालय, पुसद, यवतमाळ.

47

## प्रस्तावना

भारतीय संस्कृतीने विषमतावादी समाजव्यवस्थेचा, धर्मव्यवस्थेचा, जातीव्यवस्थेचा उच्चांक गाठला होता. या देशातील शूद्रातिशूद्रांचे मुलभूत अधिकार नाकारण्यात आले होते. शूद्रातिशूद्र समूहांना निच पशूसारखे जीवन जगण्यास भाग पाडले होते. अशा परिस्थितीत प्रस्थापितांना स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत निचपणाच्या पराकोटीला पोहोचला होता. स्त्री फक्त उपभोगाची वस्तू हा समज प्रस्थापितांना मिरवेधर्म मानला होता. अशा विषमतावादी समाजव्यवस्थेत परिवर्तन झाले पाहिजे. स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. शूद्रातिशूद्रांना माणूस म्हणून सन्मानाने जगता आले पाहिजे. शूद्रातिशूद्रांना शिक्षण मिळाले पाहिजे. या उदात्त हेतून महात्मा जोतिराव फुले यांनी सामाजिक क्रांतीची सुरुवात केली.

महात्मा जोतीबा फुले यांनी स्त्री आणि शूद्रातिशूद्रांचा विकास झाला पाहिजे. उन्नती झाली पाहिजे यासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले होते. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये स्त्रियांच्या उन्नतीचा दृष्टीकोन दिसून येतो.

छत्रपती शिवाजी महाराजांनी मानवतावादी दृष्टीकोनातून स्त्रियांचा सन्मान केला, स्त्रियांमध्ये जातिभेद व धर्मभेद केला नाही, महात्मा फुले यांनी स्त्रियांना सामाजिक समता, उन्नती, स्त्री शिक्षण यासाठी अनेक चळवळींच्या माध्यमातून कार्य केले.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षण सक्तीचे व आवश्यक करून, अस्पृश्यांना आरक्षण देऊन मोठी क्रांती घडवून आणली होती. त्याचे वाईट परिणाम कोल्हापूर संस्थानातील पंडितांनी भोगायला लावले होते. त्यांचे घातनांना न घाबरता शाहू महाराजांनी शिवाजी महाराज, महात्मा फुले, या महामानवांच्या पुढे जाऊन एक पाऊल स्त्रियांच्या व शूद्रातिशूद्रांच्या उन्नतीसाठी पुढे टाकले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीने सांगितल्याप्रमाणे,'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हती' स्त्रियांना स्वातंत्र्य देऊ नये, स्त्रियांच्या संदर्भात अनेक चुकीच्या रुढी, परंपरेच्या माध्यमातून त्यांच्यावर वाईट बंधने लादून गुलाम केले आणि प्रगतीच्या परिवर्तनाच्या दिशेने जाणारे हजारो स्त्रियांचे हात पुरुषांची दासी, पशू, भोगवस्तू शूद्र म्हणून धर्मग्रंथाच्या आधाराने बंदिस्त केले होते. अशा मनुस्मृती सारख्या ग्रंथाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दहन करून, पेटवून देऊन स्त्रियांना मुक्त केले. भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून, हिंदू कोड बील च्या माध्यमातून स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान अधिकाराचे धोरण घटना दत्त केले.

महात्मा जोतीबा फुले यांनी सामाजिक सुधारणा महत्वाची मानली होती. सामाजिक क्रांती शिवाय पर्याय नाही. १८४८ ते १८९४ हया कालखंडात सामाजिक आणि राजकीय प्रश्नासंबंधी तीन विचार प्रवाह महाराष्ट्रात सुरु झाले होते.



328

Scanned with CamScanner

58

लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांनी मुख्यतः ब्राह्मणांना, आपली शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक व औद्योगिक सुधारणा करून घेऊन कनिष्ठ वर्गांनी बंधुभावाने वागावे असा उपदेश केला. महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या आणि कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाची, सामाजिक समानतेच्या नि समतेच्या हक्काची व समाजक्रांतीची तुतारी फुंकली. गोपाळ गणेश आगरकर यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यवाद नि सामाजिक सुधारणावाद हया बुद्धिप्रामाण्यवादावर अधिष्ठित केला.

महात्मा फुले यांचा भर सामाजिक समता प्रस्थापित करणे, जातिभेद नष्ट करणे व कनिष्ठ वर्गाची उन्नती करणे यावर होता. फुले मतप्रणाली हा एक प्रवाह, लोकहितवादी, रानडे व आगरकर यांचा दुसरा प्रवाह, विष्णुशास्त्री चिपळूणकर प्रेरित टिळक प्रवाह हा तिसरा प्रवाह; असे तीन विचार-प्रवाह त्याकाळी महाराष्ट्रात चालू होते. हा तिसरा प्रवाह समाज सुधारणेस प्रतिकूल होता. केवळ राजकीय सुधारणेस तो अनुकूल होता. आधी सामाजिक की आधी राजकीय हया प्रश्नांचा निकाल आगरकरांच्या मृत्यूनंतर राजकीय असा झाला.

मुंबई येथील ब्राह्मणसंस्था १६ जून १८८८ रोजी स्थापन झाली. तिच्या स्थापनेची पार्श्वभूमी सांगताना गुळवणी म्हणतात की," जोतीराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाने ब्राह्मण समाजावर सडकून हल्ले सुरू केले होते. वेद, मुर्तिपूजा, चातुर्वर्ण्य, पौरोहित्य ही सर्व झुगारून दिली पाहिजेत. किंबहुना, त्यामुळेच ब्राह्मणेतर समाज अवनतावस्थेला पोहोचला अशा प्रचाराचा सत्यशोधक समाजाने धुमधडाका सुरू केला. राज्यसत्ता सर्वस्वी इंग्रजांच्या हाती असली तरी कित्येक महत्वाच्या नोकऱ्या पटकावण्यात ब्राह्मण समाजाला यश मिळाल्यामुळे ब्राह्मणेतर समाजाचा जळफळाट सुरू झाला.

महाराष्ट्रात मराठा समाज बहुसंख्य असल्यामुळे सामाजिक धार्मिक गुलामगिरी नष्ट झाल्याशिवाय त्याची उन्नती होणे शक्य नाही. अशा मताचा जोरात प्रचार चालू झाला. काही तरी करून ब्राह्मण समाजाचे नाक खाली करावयाचे असा चंग सत्यशोधक समाजाने विडाच उचलला होता. असे म्हणावयास हरकत नाही."

ब्राह्मण समाजाचा वर्चस्व असतांनासुध्दा महात्मा फुले डगमगले नाही. स्त्रियांच्या सामाजिक आणि शैक्षणिक, स्वातंत्र्यासाठी संघर्ष करीतच राहिले. कर्मकांड, व कर्मठपणावर त्यांनी सडेतोड टीका केली आणि धर्म, नीती, विद्या, व्यवसाय यासंबंधीचे सारे रूढ आचार विचार ऐहिक उपयुक्ततेच्या निकषावर घासून त्याचे यथार्थ लोकांना फुलेंनी पटवून दिले म्हणून ते भारतीय संस्कृतीचे विरोधक होते अशी त्यांच्यावर टिका सुध्दा केली जात होती.

हजारो वर्षापासून धर्माने वर्ण जाति संस्थेच्या नावाखाली शुद्रातिशुद्रांना न्याय हक्कापासून मुलभूत अधिकारापासून वंचित करून शारीरिक, मानसिक यातना देऊन हिनत्व बहाल केले होते. अशा कष्टकरी बहुजन समाजाच्या न्याय हक्कासाठी जोतीरावांनी आपल्या क्रांतीज्योतीसह शुद्रातिशुद्रांचे लढे उभारून सामाजिक-क्रांती घडवून आणली. इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ ही जोतीरावांच्या आयुष्यातील महत्वाची घटना होय असे उद्गार गं. बा. सरदार यांनी काढले आहेत.

रावसाहेब कसबे म्हणतात," फुलेंचे व्यक्तिमत्त्व हे मार्दव्य आणि तटस्थता यांचा सुरेख संगम होता. मराठी वाङ्मयात फुलेंनी एका नव्या युगाचा पाया घातला. ते युग त्यांनी स्वतःच निर्माण केले; म्हणून म. जोतीबा फुले भारतवर्षातील सामाजिक क्रांतीचे प्रणेते आहेत. तसेच ते मराठी वाङ्मयाला नव्या प्रेरणा, नव्या मार्गांना देणारे युगकर्ते होते.

## समारोप

महात्मा जोतीबा फुलेंनी सामाजिक विषमतेविरुद्ध बंड पुकारले आणि समाजाच्या प्रेमापासून अस्पृश्य-दलित वर्गातील लोकांना एकत्रित करण्याचा प्रयत्न केला. अन्याय व विषमतेविरुद्ध ते झटले. परंपरागत रुढींच्या तत्त्वांवर त्यांनी हल्ला चढविला. धार्मिक सामाजिक बौद्धिक गुलामगिरी दूर करून पहिले बंड पुकारले. धर्मसंस्थेने व पुरोहितशाहीने कष्टकरी, कामकरी, शेतकरी शुद्रातिशुद्रांचे शोषण केले हे जोतीबांनी निदर्शनास आणून दिले होते. जोतीरावांचा धर्मविचार मानवतावादाला धरून होत आहे. धर्म माणसासाठी आहे. ज्या धर्मविचारातून माणसाचे नाकारली त्या ऐवजी निर्मिक ही संकल्पना स्वीकारली.

महात्मा फुलेंनी सामाजिक चळवळीच्या माध्यमातून शोषित समूहाला न्याय दिला ते कृतिशील समाजचिंतक होते. शेतकऱ्यांच्या शोषणाचे त्यांना आकलन होते. शेतकरी वर्गाच्या दैन्य दारिद्र्यात मुख्य कारणे त्यावेळच्या विषम अर्थव्यवस्थेत कशी सामावली आहेत, याची त्यांना जाणीव होती. खऱ्या अर्थाने महात्मा जोतीबा फुले सामाजिक क्रांतीचे पुरस्कर्ते होते.

### संदर्भ ग्रंथ

१. कीर धनंजय - शाहू स्मारक व्याख्यानमाला
२. रानडे न्या. म. धार्मिक व्याख्याने
३. गुळवणे वा. रा. ब्राह्मण सभेची गेली साठ वर्षे
४. सरदार गं. बा. महात्मा जोतीबा फुले
५. आंबेडकर डॉ. बाबासाहेब - शूद्र पूर्वी कोण होते?



Assistant Professor
Vasantrao Naik Mahila

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार चळवळी विषयी मातृत्व

50

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम,

(मराठी विभाग प्रमुख)

श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय,

पुसद जि. यवतमाळ (महाराष्ट्र)

vikrantmeshram1976@gmail.com

---

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्था विषमतावादी तत्त्वावर उभी असल्यामुळे हजारोवर्षापासून या देशातल्या श्रमिकांचे शोषण होत राहिले. मग ते शोषण शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय असो की, शेतकरी कामगारांच्या संदर्भात असो. या देशातल्या अस्पृश्यांच्या वाटयाला ज्या अतोनात, अपमानीत जगणे आले त्या जगण्याचे अपमानाचे तुच्छ भावनांचे चटके लहान वयातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाटयाला आलेत. मग शाळेतील प्रवेश, पिण्याच्या पाण्याचा स्पर्श झाला म्हणून सवर्ण विद्यार्थ्यांने पाणी पिणे नाकारणे, सूचना फलकाला स्पर्श झाला म्हणून त्या फलकाच्या मागे असलेले जेवणाचे डब्बे विटाळले म्हणून जेवनाला स्पर्श न करणे, जात कळली म्हणून भर उन्हात बैलगाडीतून खाली उतरवने, हे अपमानीत जगणे अगदी लहानपनातच त्यांच्या वाटयाला आलेत. वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण घेणे, तेव्हा पासूनचा प्रवास ते भारतीय राज्यघटना, बौध्द धम्माची दीक्षापर्यंतचा प्रवास आणि याच प्रवासात त्यांनी शेतकरी, श्रमिक, कामकरी कामगारांच्या संदर्भात केलेला विचार फार महत्वपुर्ण आहे. खऱ्या अर्थाने वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण घेऊन भारतीय राज्यघटना लिहू शकतो हा विचारच डॉ. आंबेडकरांच्या संदर्भात कर्मठ धर्माभिमान्यांना, प्रस्थापितांना न पटनारा आणि आजही त्यांना न पटनाराच आहे. एका अस्पृश्याने, भारतीय संविधान निर्माण करणे, वेगवेगळया पातळीवर अस्पृश्यांच्या एकंदरीत देशातील शोषित पिडित लोकांच्या न्यायहक्कासाठी संघर्ष करणे, न्याय मिळवून देणे हे आजही या देशातल्या सवर्णांना सहनच होत नाही.



Scanned with CamScanner

जगातल्या प्रत्येक शोषित माणसाला माणूस म्हणून सन्मानपूर्वक जगता यावे. सवर्ण धर्मातील माणसांप्रमाणेच अस्पृश्यांना, उपेक्षित घटकांना न्याय, हक्क, मुलभूत हक्क मिळावेत एकंदरीत कार्यावस्था समुहाला माणूस म्हणून सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी डॉ. आंबेडकरांनी संघर्ष केला. रस्त्यावर उतरून जन आंदोलने केली ते बोलके आणि कर्ते सुधारक होते.

एक गोष्ट आपण जाणिवपूर्वक लक्षात घेणे महत्वाचे आहे. डॉ. आंबेडकरांनी जेव्हा-जेव्हा शोषित समुहासाठी क्रांती घडवून आणली तेव्हा तेव्हा त्या क्रांतीला विरोध करण्यासाठी सवर्णांनी प्रतिक्रांती उभी केली आणि आजही अविरतपणे क्रांती – प्रतिक्रांती सुरूच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाची पुनर्रचना करायची होती. या देशातल्या प्रत्येक माणसांमध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय हक्काची भावना निर्माण करायची होती आणि भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून ती या देशातल्या फाटक्या-तुटक्या माणसाला बहालही केली. इतके खरे की, सवर्णांनी ती स्विकारली नाही.

एका अस्पृश्य माणसाचे नेतृत्व स्विकारणे हे इथल्या देशातील सवर्ण माणसाला तुच्छतेचे, कमिपणाचे वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संविधान सभेचा जो प्रवास आहे तो एक स्वातंत्र अभ्यास आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातल्या दुर्लक्षित, शोषित कामगार, शेतकरी श्रमिकांच्या संदर्भात आंदोलने केलीत, सभा : संमेलनाच्या माध्यमातून कामगारांच्या न्याय.. हक्कासाठी वैचारिक संघर्ष अवितरपणे केले म्हणून त्यांनी दलित बांधवांना साहित्यिकांना सूचना वजा अधिकाराने सांगितले होते की, आपली लेखनी धार भिंतीपुरती मर्यादीत ठेऊ नका.... याचा अर्थ असा की, जेव्हा जेव्हा या देशात विपरीत घडेल तेव्हा लेखनीच्या माध्यमातून जनसंघर्ष उभा करुन न्याय देण्याचे काम करावे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांची चळवळ उभारली होती. कामगारांच्या संदर्भात त्यांनी केलेले भाष्य फार महत्वपूर्ण आहेत.

- दि. 29 मार्च 1929 "गिरण्यांचे मालक व कामगार"
- 10 जानेवारी 1938 "शेतकऱ्यांनो, तुमचे हितकर्ते कोण याचा निट विचार करा."
- 13 फेब्रुवारी 1938 "भारतातील कामगार चळवळीची दशा आणि दिशा"
- दि. 26 मार्च 1938 "स्वातंत्र मजूर पक्षाचे गोरगरिबांचे कल्याण करील"
- दि.1 जुलै 1938 "श्रमजीवी वर्गास जाहिर विनंती"
- दि. 15 सप्टेंबर 1938 "कामगारांना संपाचा हक्क नाकारणारे ट्रेड डिस्प्युट बील हाणून पाडा"
- दि. 9 नोव्हेंबर 1940 "कामगारशाहीचा विकास असो."
- दि. 9 नोव्हेंबर 1942 "द्वितिय महायुद्ध आणि भारतीय श्रमिक"

52

- दि. 17 सप्टेंबर 1943 "संसदीय लोकशाही आणि कामगार"
- दि. 13 नोव्हेंबर 1943 "कामगार युनियनला मान्यता"
- दि. 8 फेब्रुवारी 1944 "कोळसा खाणीतील स्त्री कामगारांचा प्रश्न"
- 16 मार्च 1944 "भारतातील मजुरांची परिस्थिती"
- दि. 23 सप्टेंबर 1944 "कायदेमंडळात 50 टक्के जागा मजुरांकरिता राखीव ठेवाव्या"
- 1 नोव्हेंबर 1944 "कामगारांच्या पगारी सुट्या"
- दि. 13 मार्च 1945 "भारत सरकारचे श्रमिक धोरण"
- 24 जून 1945 "गांधीवादी अर्थशास्त्र व श्रमविभाजन"
- दि. 26 नोव्हेंबर 1945 "सरकारची श्रमिकांप्रति कर्तव्ये"
- 14 जानेवारी 1946 "मजुरांचे हिताचे कायदे आणि प्रतिनिधित्व"
- दि. 21 फेब्रुवारी 1946 "भारतातील गीरण्या कारखाने"
- दि. 11 मार्च 1946 "कामगारांचे कल्याण आणि सामाजिक सुरक्षितता"

या सर्व भाषणाचा विचार केला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या हितासंदर्भात केलेले कार्य किती महत्त्वपूर्ण आहे हे लक्षात घेणे महत्वाचे आहे.

सार्वजनिक कार्याच्या आरंभापासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार चळवळीशी निगडीत होते. त्यांचे निवासस्थान व त्यांचा कार्याचा बालेकिल्ला दामोदर हॉल हा मुंबईच्या परळ विभागात होता. हा परळ विभाग कामगार चळवळीचे आरंभस्थान आहे. मजूर चळवळीविषयी त्यांच्या सखोल चिंतनाचा परिचय त्यांनी स्थापन केलेल्या स्वातंत्र मजूर पक्षाच्या कारकिर्दीत होतो. 15 ऑगस्ट 1936 रोजी या पक्षाचा जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात आला. शेतकरी, शेतमजूर, कामगार वर्ग, गरीब, बेरोजगार यांच्या हितांची काळजी वाहण्याचे कार्यच या पक्षाने अंगीकृत कार्य ठरविले होते.

दि. 12–13 फेब्रुवारी 1938 रोजी मनमाड येथे "अखिल जी. आय.पी.रेल्वे अस्पृश्य कामगार परिषद" आयोजित करण्यात आली होती. या परिषदमध्ये डॉ. आंबेडकरांनी दि. 13 फेब्रुवारी 1938 रोजी भाषनाने "भारतातील कामगार चळवळीची दशा आणि दिशा" स्पष्ट केली.

त्याच्या सर्व भाषणांचा चिंतन केले तर संपूर्ण देशात कामगारांवर प्रेम करणारा माणूस सापडणार नाही. डॉ. आंबेडकरांच्या कामगार विषयक कार्याचा, दुसरा अध्याय ते भारताचे मजूर मंत्री झाल्यावर सुरु होतो. व्हाईसरायच्या मंत्रीमंडळात 1942 साली मजूर मंत्री म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. मजूर मंत्री म्हणून कामगारांनी त्यांचे मूलभूत हक्क बहाल केले. कामगार कल्याण हे सरकाचे कर्तव्य



Scanned with CamScanner

ठरविले. कामगार संघटनांना मान्यता दिली. किमान वेतन, प्रसूती रजा, कामगारांचे राज्य, रोजगार नियोजन केंद्र या संबंधी तरतुदी व कायदे करून घेतले.

द्वितीय महायुद्धाच्या पार्श्वभूमिवर मजूरमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अखील भारतीय गर्भीवाणीच्या मुंबई केंद्रावरून कामगारांना उद्देशून भाषण केले होते. समता, स्वातंत्र्य व बंधुत्वावर आधारित नवव्यवस्थेच्या निर्मितीकरिता भारतीय श्रमिकांनी नाझीवादाविरुध्दच्या युध्दात सहभागी झाले पाहिजे असे आवाहन या भावनातून त्यांनी केले. कामगारांचे स्वातंत्र्य हा या भाषणाचा मध्यवर्ती केंद्रबिंदू होता असे ते म्हणाले होते.

आज भारत देशात कामगार, श्रमिक, शेतकरी ज्या सन्मानाने जगतात, अधिकाराने राहतात हे सर्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे. शेतकरी – शेतमजूर यांच्या विषयी महत्त्वपूर्ण भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतली होती. मात्र त्यांच्या ह्या भूमिकेत देशातील शेतकरी वर्गाने दुर्लक्ष केले म्हणून शेतकरी अडचणीत सापडला आहे. लहान–लहान शेतकऱ्यांनी एकत्रित येवून शेती केली पाहिजे. पूर्वी इर्जिक पध्दत गावात शेती. राजकीय म्हणून समुहगटाचा अविष्कार. एकत्रित येऊन अडचणित असलेल्या माणसाची मदत करणे. एकत्रित येऊन शेती करणे. मात्र आज ही पद्धत गावातून हद्दपार झाली म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहे.

कामगार एकत्रित राहणे महत्त्वाचे आहे मात्र आज कामगारांमध्ये ग–स्तर एकंदरित विस्थापीत झाले आहे. या विस्थापित कामगारांचे पुर्नस्थापना करण्याचे महत्वपूर्ण कार्य डॉ. आंबेडकरांनी केले होते. मात्र आज कामगारांच्या संघटना आहेत पण आवाज दबलेल्या आहेत. राजकीय लोक आपल्या हितासाठीच कामगारांचा वापर करतात व त्यांना इतर व्यसनात गुंतवून ठेवतात. आपले स्वार्थ साधण्यासाठीच कामगारांचा वापर केला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या मार्गावरूनच कामगार, शेतकरी, शेतमजूर, श्रमिक यांनी चालले पाहिजे. शेतकरी, कामगार जो पर्यंत संघटीत आहेत / राहणार तो पर्यंत त्यांना नमशेष करणे कठिण आहे. आपल्या न्याय हक्कासाठी कामगारांनी लढा उभारला पाहिजे. मात्र आज महाराष्ट्राती संपूर्ण गिरण्या नामशेष झाल्या आहेत. या नामशेषत स्वार्थिकामगारांनीच स्वाभिमानी कामगारांचा बळी घेतला. कामगार स्वतःच्या गरजासाठी विकला गेला. तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी कामगार संघटना आपल्या स्वार्थासाठी काही लालची कामगारांचा गाखमातून मोडित काढल्या, कामगार संघटना उदध्वस्त, शेमजूर, श्रमिकांनी फार वाईट परिस्थिती आहे. बरेच कामगार वेठबिगार झालेत, व्यसनांना त्यांनी जवळ घेतले. कुटूंब छिन्नविछिन्न झालेत. कामगारांच्या मुलांचे भवितव्य अंधारात गडप झालेत. कुटूंब सांभाळण्यासाठी अनेक कामगार स्त्रीयांना इच्छेविरुध्द काम करावे लागते. मात्र ज्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपला आदर्श स्विकारला ते आजही सन्मानाने





Scanned with CamScanner

जीवन जगत आहे. अंधारातून उजेडाकडे वाटचाल करित आहेत. आई आपल्या मुलाला जशी जपते त्याच मातृत्वाने आंबेडकरांनी कामगारांना जपले.

निष्कर्ष :

1. भारतीय समाज व्यवस्था विषमतावादी तत्वावर उभी असल्यामुळे हजारो वर्षांपासून या देशातल्या श्रमिकांचे शोषणच होत राहिले.
2. कामगार एकत्रित, संघटीत नसल्यामुळे संघटना नगण्य झाल्या आहेत.
3. कामगार शेतकरी, शेतमजुर हतबल झाला आहे.
4. स्वार्थी राजकारणी व्यक्तीने स्वार्थी कामगारांना हाताशी धरुन, लालच दाखवून, स्वाभिमानी कामगारांचा बळी घेतला.
5. डॉ. आंबेडकरांचे कामगाराविषयी वैचारिक आंदोलने महत्वाचे.
6. डॉ. आंबेडकर कामगारांवर प्रेम करणारा सच्चा समाजसुधारक, कामगार नेताच होय.
7. मजूरमंत्री म्हणून कारकिर्द महत्वपूर्ण.
8. महाराष्ट्रातील गिरण्यांचे उद्ध्वस्तीकरण, कामगार विस्थापीत, कामगारांना वेगवेगळ्या व्यसनाला जवळ केलेत, कुटुंब उद्ध्वस्त.
9. कामगार चळवळीत राहूनच कामगारांचे दुःख, दारिद्र्य जवळून पाहिले.
10. स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहिरनामा एक चिंतनाचा विषय.

संदर्भ –


- डॉ. बाबासाहेब आंबेडकर – शुद्र पूर्वी कोण होते.
- संपादक – प्रदीप गायकवाड –कामगार चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे व लेख.
- डॉ. मा. प. थोरात – केंगीफून आंबेडकरी सौंदर्यदृष्टीने एक आकलन.
- डॉ. प्रतिभा अहिरे – पाचवे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन, अकोला 20/21, 2013
- डॉ. प्रज्ञा लोखंडे – पहिले आंबेडकरी साहित्य संमेलन, बडनेरा अमरावती
- प्रा. केशव मेश्राम – पहिले आंबेडकरी साहित्य संमेलन उद्घाटनीय भाषण.
- भालचंद्र फडके – दलित साहित्य वेदना व विद्रोह
- डॉ. गेल आम्वेट – जोतीबा फुले आणि स्त्री – मुक्तिचा विचार

# आंबेडकरी चळवळीतील आंतरिक घुसमट व सवर्ण पाटलांनी केलेल्या शोषणावर भाष्य करणारी 'तणकट' कादंबरी

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख
श्रीमती वत्सलाबाई महिला महाविद्यालय, पुसद
vikrantmeshram1976@gmail.com ८९८८०११४८४ / ९४०३४०५४९०

## १) सारांश –

'तणकट' कादंबरीच्या माध्यमातून लेखक राजन गवस यांनी आंबेडकरी चळवळ व हजारो वर्षांपासून अर्थात बौध्द धम्मांतरपूर्व आणि बौध्दधम्म स्विकारल्यानंतर सवर्णांनी गावातील पाटलांनी शोषित, पिडीत अनुसूचित जातीकृअभावग्रस्त आंबेडकरी बांधवांवर केलेल्या अमानुष शोषणाचे तसेच आंबेडकरी समाजाच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिकतेवर भाष्य करणारी कादंबरी आहे.

## २) कादंबरी आवडण्यामागची भूमिका –

'तणकट' कादंबरी १९९८ साली प्रकाशित झाली. सन २००१ साली साहित्य क्षेत्रातील महत्त्वाचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळविला. महाभाग १४ ऑक्टोंबर १९५६ ला महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः बौध्द धम्माची दीक्षा घेऊन व आपल्या अनुयायांना म्हणजे या देशातील शोषित, पिडीत अभावग्रस्त बांधवांना बौध्द धम्माची दीक्षा दिली. बौध्द धम्म स्विकारल्यावर ६० वर्षे उलटल्या नंतर ही अनुसूचित जाती – अभावग्रस्त बांधवांच्या अन्याय–अत्याचार शोषणात वाढच होत आहे. म्हारोड्या, म्हारवाडा, मांगोडा–मांगवाडा या जातीवाचक नावाने संबोधले जाते. ग्रामीण व नागरी भागातील सवर्णांचे व पाटलांची बौध्द बांधवाकडे पाहण्याचा विषमतावादी संकुचित दृष्टिकोन लेखकांनी कादंबरीच्या माध्यमातून अधोरेखित केले.

## ३) कादंबरीबद्दल न आवडणारे चिंतन –

लेखक राजन गवस यांच्या 'तणकट' कादंबरीचे अनेक अभ्यासकांनी, समीक्षकांनी आपले मत व्यक्त करतांना, 'तणकट' कादंबरी कृषीजन्य संस्कृतीला व्यापणारी आहे. कादंबरी कृषीजन्य संस्कृतिवर अवलंबून आहे. अभ्यासक 'तणकट' कादंबरीला कृषीजन्य संस्कृतिशी जोडतात. हे पचण्यासारखे नसून तर अजिर्ण झाल्यासारखे मला वाटते. 'तणकट' कादंबरी ग्रामीण व शहरी माणसांच्या स्वभावाचा स्फोट घडवून आणते.

## ४) कादंबरी पुनरावलोकन –

'तणकट' कादंबरीचे शिर्षक अतिशय समर्पक आहे. अतिशय काबाड कष्ट करून रक्ताचं पाणी करून, रात्रंदिवस राबून शेतकरी शेत हिरवेगार करतात. मात्र शेतातल्या तणकटाकडे दुर्लक्ष झाले की, उभं हिरवेगार शेतच तणकट उद्ध्वस्त करतो. मग शेतकऱ्यांच्या वाट्याला नैराश्यता, वैफल्यग्रस्तता येते. माणसाचं मनुष्यत्व नाकारणारं, धर्मवाचक, जातीवाचक सामाजिक विषमतावादक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, धार्मिक चळवळीला व आंबेडकरी बांधवाच्या आतरीक द्वंद निर्माण करणारा 'तणकट' गावात... शहरात वाढू नये हा मौलीक विचार कादंबरीतून मांडला आहे.

'तणकट' कादंबरी वाचत असताना प्रारंभी ग्रामीण भागातील म्हारोडा... मांगोड्या ही जातीवाचक विशेषण दिसतात. कबीर सदाशिव कांबळे हा कादंबरीचा नायक तर बाळासाहेब शेंडगाळे व गावातील सवर्ण–पाटील खलनायकाच्या भूमिकेत दिसतात. म्हारवाड्यात एकटा शिक्षण घेणारा... कबीर... कादंबरीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व उच्चवर्णीय जातीतील दरी दिसून येते. कबीर जेव्हा शेळी चारायला जातो, तेव्हा शेळी शिंदेच्या शेतात जाते. तेव्हा शिंदेंची बायको कबीरला म्हणते, "म्हाड्या म्हार त्यो म्हार आनी बोलतोय बघ तालेवार" गावातील म्हाराच्या वाट्याला किती अपमानास्पद जगणं येत याचे वास्तव्य चित्र रेखाटले आहे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा माझा मुलगा शिकला पाहिजे असे महादेवाला वाटते. म्हणून काही झाले तरी शाळा बुडवून माझा मुलगा कोणाच्याही शेतात राबणार नाही, कामाला जाणार नाही. मुलगा कबीर महाविद्यालयाचं शिक्षण घेत असताना कशाला तुम–च्या शेतात हमाली करणार...कारण शिक्षण हे घेतल्याने माणसाची माती होते. स्वशान होते. हे शैक्षणिक सामाजिक आत्मसन्मानाचं बळ व परिवर्तन हे डॉ.बाबासाहेबांच्या चळवळीतून मिळाले व शिक्षणामुळेच माणसात... घरात... व समाजात परिवर्तन घडून येते. प्रा. अजबिन चालेराव महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्र विचारावर व्याख्यानाचे आयोजन करतात. सत्यपाल धर्मशी हे दलित महासभातील प्रमुख कार्यकर्ते 'आंबेडकरांचे धर्मांतर' या विषयावर व्याख्यान देतात. या व्याख्यानांच्या माध्यमातून आंबेडकरी विद्यार्थ्यात संघटनेविषयी समाज परिवर्तनाविषयी बळ मिळते. दलितावर अन्याय थांबवायचे असतील तर संघटीत राहणे आवश्यक आहे. तालुक्यातील बोरखटी गावात चाळीस वर्षांच्या महिलेवर सामूहिक बलात्कार होतो. त्याकरीता न्याय मागण्यासाठी एकत्र आले पाहिजे हा विचार आंबेडकरी आंदोलनातून मिळाला आहे.

'समाजावर होणा–या अन्याय अत्याचाराबद्दल सर्व कामासाठी एकत्र जमलो नाही, मतभेद कमी लागली तर तालुक्यात संपलो हे लक्षात घ्या.' या माध्यमातून डॉ.बाबासाहेबांनी समाजाला दिलेल्या शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा हा विचार दिसून येतो.

लेखकांनी केवळ सवर्ण–पाटलांचे मतभेद मांडले नाही तर आंबेडकरी चळवळीतील नेत्यांचे... कार्यकर्त्यांचे आपसी मतभेद मांडलेत. न्याय मागण्यासाठी समाज एकत्र करणे...सभा घेणे, मोर्चा काढणे, घोषणा देणे...आमच्या आया–बहिणी अजूनही सुरक्षित नाही. ''आम्ही माणसाच्या देशात राहतो की, हैवानाच्या देशात'' असा उद्रेक भाषणातून मांडतो. मोर्चा ही आमच्या आंदोलनाची सुरवात आहे. आम्हाला न्याय मिळाला नाही तर देश पेटवून टाकू. प्रा.सत्यपाल धर्मशी आपल्या भाषणातून मांडतो. इतकेच नव्हे तर आंबेडकरी नेते मॅनेज कसे होतात हे देखिल मांडले आहे.

आंबेडकरांचे नाव घेऊन चळवळी करणे... कोणाच्या नावाखाली पैसे खाणे, पोट भरणारे नेते असताना देखिल चळवळ युक्तिच्या दिशेने जात आहे. असा विचार करणारा कादंबरीतला नायक कबीर आहे.

१४ ऑक्टोबर १९५६ ला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तमाम अस्पृश्यांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. तेव्हा आता आपली सर्वांची जबाबदारी वाढली. घरातील देव्हा–यातील देव व त्यांच्या प्रतिमा जाळून टाका, फेकून टाका, मेलेल्या ढोराचे मांस खाणे टाळा, गावातील अस्वच्छ कामे करणे टाळा. त्याचा परिणाम ग्रामीण व नागरी आंबेडकरी समाजात झाला. समाजपरिवर्तन होत आहे. हाच समाजपरिवर्तन 'तणकट' कादंबरीतून लेखकांनी मांडला.

'तणकट' ही कादंबरी ग्रामीण–नागरी आंबेडकरी चळवळीवर भाष्य करणारी आहे. या कादंबरीचा परिघ कृषीजन्य संस्कृतिला व्यापणारा तर आहेच पण त्याच बरोबर खेडेगावातील जातीव्यवस्था...धर्मव्यवस्था... जातीवाचक संबोधन करणारा परिघ आहे. हाच परिघ लेखकाला मनःस्ताप देत आहे. तो त्यांनी कादंबरीच्या माध्यमातून चित्रित केला आहे. एका अर्थाने जाती... धर्मवाचक... सामाजिक विषमतावाचक सवर्ण... पाटलांकडून होणारा अन्याय–अत्याचाराचा तणकट उध्वस्त झाला पाहिजे.

बाळासाहेब शेळवाळे नावाचा खलनायक म्हादूच्या घरात विज देतो. मात्र कबीरच्या घरामध्ये विज देत नाही. म्हादूच्या नावावर स्वतः कर्ज घेतो व एक दिवस तो आपल्या ठेवलेल्या बाई सोबत खात्यातून पसे काढतो. तो कायमचाच. म्हादूला बँकेच्या नोटीस येतात. तेव्हा त्यांच्या लक्षात येते की, आपली फसवणूक झाली. महारवाड्यातील लोक कबीरकडे आशेने पाहतात व या मुसमद म्हणून कबीरच आपल्या सोडवू शकतो. कबीरच्या डोक्यात अनेक-प्रश्न निर्माण होतात ते डोक्यातले प्रश्नांचे चिर कात करत त्याच्या डोळ्यावर अंधारी येते व शेवटी तो कुडाच्या मेढीला टेकला. पुढे काय झालं त्याचं त्यालाही कळलं नाही.

## ५) कादंबरीबद्दल सूचना –

इतर भाषेत अनुवाद होणे आवश्यक आहे.

## ६) निष्कर्ष/समारोप –

ग्रामीण व नागरी भागात आंबेडकरांचे नाव घेऊन चळवळी करणारे, कोणाच्या नावाखाली स्वार्थ साधणारे समाजाला युक्तिच्या दिशेने मार्गदर्शन करणारे, आंबेडकरी कार्यकर्ते, पुढारी असताना देखिल आंबेडकरी चळवळीला

आपला जीव की प्राण समजणारा, सामाजिक चळवळीचे भान असणारा, नैतिक मूल्य जोपासणारा, आलेल्या संकटात तटस्थ भूमिका घेणारा, सवर्ण, पाटलाच्या आमिषांना बळी न पडणारा, शिक्षण प्रामाणिकपणे घेणारा कबीर हा कादंबरी मानांकनात सर्वोत्कृष्ठ ठरतो.

संदर्भ –


१) आंबेडकर डॉ. बाबासाहेब – शुद्र पूर्वी कोण होते.
२) गवस राजन – तणकट कादंबरी
३) फडके भालचंद्र – दलित साहित्य वेदना व विद्रोह
४) मोरे सतेश्वर – निळपंख कवितासंग्रह प्रस्तावना
५) मोरे सतेश्वर – सरसंधान कवितासंग्रह प्रस्तावना
६) मोरे सतेश्वर – अध्यक्षीय भाषण, तिसरे आंबेडकरी युवासाहित्य संमेलन वर्धा
७) कांबळे उत्तम – जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न


❖❖❖

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १. आंबेडकरी कवितेतील स्त्री जाणिव : यवतमाळ जिल्ह्यातील निवडक कवयित्री

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद, जि. यवतमाळ.

**प्रस्तावना / भूमिका**

स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेमध्ये आंबेडकरी कविच्या कवितांचे योगदान महत्वपूर्ण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीकारी विचारांचा प्रभाव दलित स्त्री–पुरुषांवर पडून हा समाज परंपरेकडून परिवर्तनाकडे वळला. आंबेडकरी झंझावाताने, आंदोलनाने, लढ्याने दलितांना आमुलाग्र बदलवून सोडले आणि त्याचे सादप्रतिसाद साहित्यातूनही उठले. 1956 च्या धर्मांतराच्या चळवळीनंतर निर्माण झालेले दलितांचे साहित्य हा आंबेडकरी विचारांचा परिपाक होय. परंपरागत विचारसरणीला फाटा देऊन नव्या मार्गाने, नव्या मानसिकतेने वाटचाल आरंभिली या वाटचाली मधूनच आंबेडकरी कवितेचा एक संपन्न परंपरा मराठी कवितेमध्ये पुढे आली.

महात्मा जोतीबा फुले आणि डॉ. बाबासाहेब यांनी या समाजाला दिलेला परिवर्तनाचा विचार जनसामान्यामध्ये प्रक्षेपित करून प्रामुख्याने समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय आणि वैज्ञानिकता या पंचसूत्राचा प्रचार, प्रसार आणि प्रबोधन करणे या हेतूने या कविंनी कवितांची निर्मिती केली. जाती–धर्म –वर्ण आणि समाज–शिक्षण–राजकारण, अंधश्रध्दा, विषमता, निरक्षरता, दारिद्यता, लाचारी, उपासमार अशा विविध प्रथा, परंपरेमधून होणारे शोषण आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीने मानवी मनामध्ये उभा केलेला स्वाभिमान आणि स्वसन्मान अशा वैविध्यपूर्ण विषयांचा समृध्द आशय यवतमाळ जिल्ह्यातील कविंच्या कवितांमधून प्रस्फूटीत होतांना दिसून येतो.

आंबेडकरी चळवळ–कार्यकर्ता–साहित्याच्या संदर्भात यवतमाळ जिल्ह्यातील आंबेडकरी कवितेतील स्त्री जाणीवांच्या संदर्भात काही निवडक कवयित्रीच्या कवितांमधून निर्माण झालेली स्त्री जाणिव इतर जिल्ह्याच्या संदर्भात यवतमाळ जिल्हा महत्वपूर्ण आहे. असे प्रकर्षाने जाणवते. यामध्ये वैशाली तेलंग, सुनंदा गायकवाड, वनमाला मालेराव, मनिषा कांबळे, पुष्पा ठमके, संघमित्री टेंभूर्णे, धम्ममित्रा, प्रतिभा मेडाम, सुमनताई मनवर, प्रा. अनिता कांबळे, रत्नमाला बनसोड, पौर्णिमा भगत.

आंबेडकरी महिलेची कविता ही 'स्व' कडून समाजाकडे निघालेली आहे. हे माझ्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. कारण आई म्हटल्यावर तिच्या वाट्याला येणाऱ्या यातना, हाल–अपेष्टा यामध्ये अनेक वर्ष ही कविता अडकलेली होती. ती तेथून बाहेर पडलेली आहे. ती रस्त्यावर आली आहे. चळवळीपर्यंत पोहचलेली आहे. आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे ती आंबेडकरवादी झालेली आहे. आता आंबेडकरी कवयित्री विषमतावादी समाजव्यवस्थेतील ठेकेदारांना निक्षून सांगत आहे.

युवकांनो,
सांभाळून पुढे चला



Scanned with CamScanner

उजेड फार झाला आहे
अंधाराच्या कुशी मध्ये
प्रकाश जन्माला आला आहे.

(जगणं – वैशाली तेलंग)

"तुम्ही बोलत का नाही?
ही अशी कोणी लावली
तुमच्या तोंडाला टाळे
संपत्तीचा आणि जमिनीचा शोध लावणाऱ्या तुम्ही
कोणी हिरवला तुमचा मालकी हक्क"

(वैशाली तेलंग)

म्हणजेच एकीकडे समाजातील अन्याय–अत्याचार करणाऱ्यांना 'घुबडांनो' असे संबोधून निर्वाणीचा इशारा देतांना दिसतात तर दुसरीकडे आपल्या समाजबांधवानी आता बोलले पाहिजे असा आशावाद देखिल व्यक्त करतांना दिसतात.

आंबेडकरी कविंच्या कवितांमध्ये ग्रामीण नागरी, समाजालाच नव्हे तर नागरी समाजालाही प्रभावित करण्याचे सामर्थ्य असून मानवी जगण्याला आणि जीवनाला सम्यक आकार देण्याच्या, धडपडीतून या रचना साकार झाल्या आहेत. या आंबेडकरी रचनांमधून बदलत्या समाजवास्तवाचे भान करून देणारे, त्यांचा परिणाम व प्रभावांचे संवेदन टिपणारे, त्यावर प्रतिक्रीया देणारे हे कवी खऱ्या अर्थाने जनजीवनातील लोक प्रबोधनकार आहेत असे दिसून येते. काव्यातून लोकसंवाद, लोकसंवादातून लोकप्रबोधन आणि लोकप्रबोधनातून लोकपरिवर्तन अशा तऱ्हेने समाज मनाला उद्युक्त करणाऱ्या या कवयित्रीच्या काव्यकर्तृत्व निश्चित लक्षवेधी आहे.

ज्या देशामध्ये धर्म व धर्माभिमानी पंडित स्त्रीयांचे स्त्रीत्व धर्माच्या नावाखाली नाकारतात. 21 व्या शतकात देखिल स्त्रीयांना मंदिर प्रवेश नाकारला जातो ही अत्यंत अमानविय घटना आहे. जो धर्म स्त्रीयांचे स्त्रीपण नाकारतो आता स्त्रीयांनी अशा धर्माला व धर्मग्रंथानाच नाकारले पाहिजे.

"अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी
आपणच आता आले पाहिजे पुढे
अन्याय, अत्याचाराच्या विरोधात
उभारले पाहिजे क्रांतीकारी लढे

(जगणं)

जो धर्म स्त्रीयांची अस्मिता नाकारतो आता अशा धर्मा विरूध्द, धर्ममार्तंडा विरूध्द क्रांतीकारी लढे उभारले पाहिजे असा आशावाद व्यक्त होतांना दिसतो. तर कवयित्री वनमाला भालेराव म्हणतात.

काळोखाच्या गर्भात
जे थिजलेत–झिजलेत
त्यांच्यासाठी प्रकाश पेरू

विषमतेची रात्र संपविण्या
चला क्रांतीची मशाल धरू

( निळ्या घरट्यातील पक्षी – वनमाला भालेराव)

माणसाचे माणूसपण जपणारी तर्कनिष्ठा, आणि समाजात माणसाची प्रतिष्ठा स्थापन करण्यासाठी धडपडणारी कवितेतील भावनिष्ठा यवतमाळ परिसरातल्या मानवी मनामध्ये रूजली आहे. परिवर्तनाच्या परंपरेतल्या या कवयित्रींच्या कवितेचा वारसा बाबासाहेबांच्या विचाराला प्रमाण मानून या परिसरातल्या विशेषतः यवतमाळ जिल्ह्यातील आंबेडकरी कविंनी पुढे नेला आहे.

हजारो वर्ष जी माणसं
गुलामीच्या पिंजऱ्यात सडत होती
अन्याय–अत्याचारात भाजुन
रात्र–दिवस रडत होती
त्यांच्या जीवनात आंबेडकर
नावाचा प्रज्ञावंत महासूर्याने
उजेडाची दालने उघडली
आणि ती पिंजऱ्यातील माणसं
आता त्या प्रज्ञासूर्याच्या प्रेरणेने
फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून
उड्डाण घेत आकाशाला
गवसनी घालत आहे.

(उड्डाण – मनिषा कांबळे)

पाण्यासाठी टाहो आमचा
समाज फिरती दारोदार
व्यवस्थेला सुरूंग लावून
पेटविले महाडचे तळे चवदार

(किर्तीमान – पुष्पा ठमके)

1956 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धम्म स्विकार केल्यानंतर दलित मुक्ती चळवळीला नवे सांस्कृतिक भान आले. त्याचा परिणाम साहित्य, कला, समिक्षा व तत्वज्ञान या क्षेत्रांबरोबरच अत्यंत तळातल्या जनमानसाची निर्मिती असलेल्या या कवयित्रींच्या कवितांमध्येही त्याचा परिणाम आणि प्रभाव दिसून येऊ लागला. आंबेडकरी कविंची कविता ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित मानवमुक्ती लढ्यातील आंबेडकरी विचार सामर्थ्यावर भाष्य करीत असून व त्याची समुचितता आणि काल–सापेक्षता दर्शविणारी आहे. जाती अजुन साबुत आहेत. जाती–पाती, धर्मा–धर्मा मुळे माणूस आज एकमेकांचा द्वेष करीत आहेत.

तो दादाराव पाटील, तो यशाभाई

ती गोंडीण मावशी, ती धुरपतीन धनगरीन
जाती शाबुत आहेत तोवर
गावात आडनावाची गरज नाही

(कविता –जात, प्रा. अनिता कांबळे)

तु एक जन्म घेवूनी मानवाचा उध्दार केला
रगतपिती झालेल्या समाजाचा तू मलम झाला.

(तुज नमन हे भिमराया – पोर्णिमा भगत)

आंबेडकरी कवी हे संघर्षातून जन्मतात, ते जनमानसातून सहजतेने तयार होत नाहीत. कारण त्यांना मिळालेली लेखणीची उर्जा ही केवळ निसर्गदत्त असत नाही. भीषण समाजवास्तव बदलविणारी क्रांतीकारी प्रेरणा आंबेडकरी कवी धारण करीत असतो.

समाजाच्या ठेकेदारांनो, आता तरी
दारोदारी सत्तेची भिक मागणे बंद करा

(मरण मानवतेचे – सुनंदा गायकवाड)

कुठलीही निर्मिती ही निर्हेतूक नसते. तिचे प्रयोजन निश्चित असते. नियोजित हेतू सिध्दासाठी उपलब्ध असणाऱ्या तमाम माध्यमांचा उपयोग माणूस करीत असतो. त्याला स्वतःला व्यक्त व्हावेसं वाटतं तेव्हा तो इतर माध्यमांप्रमाणे कवितेचेही माध्यम स्वीकारले परंतु माध्यमांच्या स्वीकारापुरताच हा प्रश्न नसतो, तर माध्यमाने देखिल आपल्याला स्विकारणे गरजेचे असते. असे क्वचित घडते. कवी हा केवळ नसतो. तो समाजात असतो; तेव्हा एक निखळ माणूस असतो आणि चिंतनात असतो तेव्हा तो कवी तर असतोच पण एक तत्वज्ञही असतो. सर्जकाची एक बाजू ही तत्वज्ञाचे आहे. म्हणूनच तत्वज्ञकवी अशी संज्ञा काही कवींच्या संदर्भात मराठीमध्ये वापरली जाते.

आंबेडकरी कवितामधून बुध्दकालीन सामाजिकता, आंबेडकरपूर्व दलित जीवन व बुध्द धम्म स्वीकारामागचे तत्वज्ञान आणि मानसिकता यांवर भाष्य केले ते मराठी समाजाला परिवर्तनसंमुखता व सामाजिकता प्रदान करणारे आहे. या अनुषगांने यवतमाळ जिल्हयातील आंबेडकरी कविंच्या कवितांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

आंबेडकरी कवितेचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यामुळे दलित 'माणसात' आला. त्याच्या ठिकाणी आत्मसन्मान, आत्मविश्वास, आत्मावलंबन बाबासाहेबामुळेच निर्माण झाले. मुक्तिलढयाचा आणि दलित कवितेचा अतिशय जवळचा संबंध आहे.

साहित्य आहे म्हणूनच संस्कार आहेत; आणि संस्कार आहेत म्हणूनच संस्कृती आहे. संस्कार आणि संस्कृती यांच्या संवर्धनाची जबाबदारी साहित्याला स्विकारी लागते. आंबेडकरी साहित्यानेच ही जबाबदारी पार पाडली आहे/पाडत आहे. साहित्य हे केवळ संस्कार आणि संस्कृतीचे संवर्धनच करते असे नाही, तर संस्कार आणि संस्कृतीला नवे रूप, नवी संरचना आणि नवे मन साहित्यच बहाल करते. साहित्यच माणसाला माणूसपण आणि समाजाला समाजपण देते. यातून समाजाला आणि त्या समाजाचे घटक असणाऱ्या माणसाला त्याच्या स्वत्वाची ओळख देते. साहित्य आभाळातून पडत नाही हे आपण सगळेच जाणतो. ते याच समाजाचे सृजन आहे. ज्यावेळी माणसाला

स्वतःला व्यक्त व्हावेसे वाटले, जेव्हा पासून ही लोकपरंपरा आज आधुनिकतेचे नवे रूप पुढे घेवून आली आहे. हा प्रवास निरंतर आहे समाजाच्या गतिशीलतेशी याचे नाते आहे.

**निष्कर्ष**

- स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेमध्ये आंबेडकरी कविचा कवितांचे योगदान महत्वपूर्ण आहे.
- 1956 च्या धर्मांतराच्या चळवळीनंतर निर्माण झालेले दलितांचे साहित्य हा आंबेडकरी विचाराचा परिपाक होय.
- आंबेडकरी महिलांची कविता ही 'स्व' कडून समाजाकडे निघालेली आहे.
- स्त्रीयांनी धर्म व धर्मग्रंथ नाकारले पाहिजे.
- आंबेडकरी कवी हे संघर्षातून जन्मतात.

**संदर्भ ग्रंथ**

- दलित साहित्य –वेदना व विद्रोह – भालचंद्र फडके.
- आंबेडकरी साहित्य – उत्तम कांबळे
- तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन
- अध्यक्षीय भाषण – प्रा. सतेश्वर मोरे
- नीलपंख कविता संग्रह प्रस्तावना – प्रा. सतेश्वर मोरे
- अंतः क्षोभ–कवितासंग्रह प्रस्तावना – प्रा. केशव मेश्राम
- परिवर्तन काव्यसंग्रह – नाना बनसोड
- कविता संग्रह –निळ्या घरट्यातील पक्षी – वनमाला भालेराव
- कविता संग्रह – मरण माणसातेचे – सुनंदा गायकवाड
- कविता संग्रह – सम्यक काव्ययात्रा – पुष्पा टमके
- सूर्याचा सूर्य – मनिषा कांबळे
- जगणं – वैशाली तेलंग

Scanned with CamScanner

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



# लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक

Scanned with CamScanner



# आंबेडकरी चळवळीतील वादळवारा : वामनदादा कर्डक

- प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम,
मराठी विभाग प्रमुख,
श्रीमती कमलताई महिला महाविद्यालय,
पुसद जि. यवतमाळ
vikrantmeshram1976@gmail.com
८०८८०९१३८८/९४०३४०४८९०

---

आंबेडकरी चळवळीला आपल्या गायनाच्या माध्यमातून ऊर्जा प्राप्त करून देणाऱ्यामध्ये महाकवी वामनदादा कर्डक हे अग्रस्थानी आहेत. आपल्या आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी कोणताही स्वार्थ मनात न ठेवता अविरतपणे चळवळीला गायनाच्या माध्यमातून प्रबोधन करून सर्व सामान्य माणसात परिवर्तनाचे नव चैतन्य निर्माण केले. आंबेडकरी चळवळ व वामनदादा हे सूत्र अतूट आहे.

आंबेडकरी चळवळीच्या माध्यमातून शोषित, पिडीत, अभावग्रस्त जनसमुदायात परिवर्तन घडून यावे याकरिता गायकांनी आपल्या गीतांच्या माध्यमातून व साहित्यिकांनी साहित्याच्या माध्यमातून तर कार्यकर्त्यांनी संघर्ष आंदोलनाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन झाल्याचे [illegible].

चळवळ, क्रांती ही काही अचानक होत नसते तर त्यासाठी अनेक शतके लागतात. आणि त्या-त्या शतकात माणसाला माणूस समजणाऱ्या महापुरुषाला जन्म घ्यावा लागतो. वामनदादा कर्डक यांच्या गायनाच्या व एकूणच आंबेडकरी चळवळीतील योगदानाबद्दल जेव्हा चिंतन करतो, तेव्हा आपल्याला तथागतापर्यंत जावे लागते. इतकेच नव्हे तर तथागतांच्या पूर्वीची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व धार्मिक चळवळीचा अभ्यास करणे, चिकित्सा करणे अत्यंत आवश्यक आहे. तथागतांनी विषमतावादी समाजव्यवस्थेवर केलेला वैचारिक हल्ला, नंतर सम्राट अशोक, बौद्ध धम्माला राजाश्रय प्राप्त झालेले राज्य व राजे, तिथपासून तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंतच्या कालखंडाचा अभ्यास व चिकित्सा करणे गरजेचे आहे तेव्हा आपण लोककवी वामनदादा कर्डक यांनी आंबेडकरी चळवळीला दिलेल्या योगदानाविषयी महत्त्वपूर्ण कार्याला न्याय दिल्यासारखे होईल.

सर्वत्र काळोखाचा साम्राज्य असताना, कोणत्याही परिस्थितीत काळोखाच्या साम्राज्यात उजेडाची पावले पोहचू नये. अशी व्यवस्था या देशातील [illegible] केली होती. काहीही झाले तरी काळोख कायम राहिला पाहिजे. यासाठी पाहिजे त्या पातळीवर स्वतःला समर्पित करणारी ब्राह्मणवादी व्यवस्था व त्यांच्या संस्कृतीला इतर बुजगावणे [illegible] अर्थाने हातपाय हलविणारे पण मेंदू नसणारे ओझे [illegible] जे स्वतःला [illegible] समजणारे या सर्वांनी आपापल्या पध्दतीने काळोख कायम राहिला पाहिजे. यासाठी दिवसरात्र एक केले. त्या काळोखाच्या साम्राज्यात ज्यांनी प्रथम वैचारिक उजेड पेटविला ते

तथागत.... त्यांनी माणसाला माणूस म्हणून स्विकारला पाहिजे व माणूस म्हणून त्याला सन्मानाने जीवन जगता आले पाहिजे हा विचार आपल्या कृतितून या देशाला दिला. त्यांच्या अर्थाने माणसाचा सन्मान, माणूस म्हणून अभावग्रस्त माणसाला स्विकारला पाहिजे, म्हणून माणूस हा माणूस असतो तो उपेक्षित किंवा अस्पृश्य नसतो तर या देशातील समाजव्यवस्थेत आपल्या स्वत:च्या स्वार्थासाठी ही जातीची + समाजाची उतरंड निर्माण केली. विषमतावादी समाजव्यवस्थेची उतरंड तथागतांनी नाकारली. हीच उतरंड फार कमी महापुरूषांनी नाकारली

इ.स. पूर्व पासून चालत आलेली सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक उतरंड डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हयातीत होती. त्याचे भयानक, दाहक तिव्र चटके त्यांच्याही वाट्याला आले होते. जी सामाजिक व जातीय उतरंड माणसाला माणूस समजत नाही. तेव्हा ही उतरंड या देशातून हद्दपार झाली पाहिजे. तेव्हाच या देशातील अभावग्रस्त माणसाला सन्मानाने जगता येईल. अनेक पातळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आंदोलने संघर्ष चळवळीच्या माध्यमातून उभी केली. सामाजिक परिवर्तन झाले पाहिजे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरसमवेत आंबेडकरी गायकांनी आपल्या गायनाच्या माध्यमातून समाज परिवर्तनासाठी दिवस रात्र एक केले. या मध्ये एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे लोककवी वामनदादा कर्डक हे होते. आजही खेड्यापाड्यात.... नागरी – शहरी भागात त्यांचे नाव व गीत सर्वसामान्य माणसांच्या मुखातून आजंही अत्यंत हलाकिच्या परिस्थितीत... खरं तर संपूर्ण आंबेडकरी माणूसच त्या परिस्थितीत उभा होता मात्र अशा ही परिस्थितीमध्ये वामनदादांनी कोणताही स्वार्थ डोक्यात न ठेवता फक्त समाजासाठी, सामाजिक परिवर्तनासाठी आपण संघर्ष केला पाहिजे माणूस आपल्या गायनाच्या माध्यमातून पेटला पाहिजे आणि या देशातील काळोख त्याने आपल्या ज्ञानातून व संघर्षातून पेटवला पाहिजे. माणूस समाजासाठी, देशासाठी उभा राहिला पाहिजे. हा ध्यास डोक्यात ठेवून सतत गायनाच्या माध्यमातून समाजात जागृती निर्माण करणारा, आंबेडकरी चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान [illegible] म्हणजे... वामनदादा कर्डक होय.

वामनदादांनी अनेक सन्मानाचा हल्ला पचविला मग ना आर्थिक असो की बाह्य असो "वाटचाल" आणि "मोहोळ" हे दोन कविता संग्रह केवळ माझ्या नावाने आहेत. त्यांना गीतांचा संग्रह म्हटले तरी मला आवडेल या कविता संग्रहांना अनेक पुरस्कार मिळाले असले तरी त्यातील गीत [illegible] समाजाच्या ओठावर येतात, तेव्हा मला खरा आनंद वाटतो. तोच खरा पुरस्कार! मला कोणी आंबेडकरवादी माणसं फकीर म्हणतात. मला वाटते यापेक्षा दुसरा सन्मान तो कोणता...? (अ.भा. आंबेडकरी साहित्य संमेलन, वर्धा २८ नोव्हेंबर १९९३)

'फकीर' या संदर्भात प्रख्यात उर्दू गजलकार यांची रचना मला वामनदादांच्या संदर्भात याठिकाणी आवर्जून आठवते

"वो आदमी नहीं एक मुकम्मल बयान है
माथे पे उसके चोट का गहरा निशान है
सामान फटे हाल है मगर,
झोली में उसके संविधान है"

वामनदादा पुढे म्हणतात, "माझे शब्द वाटल्यास हिरे समजा, दगड समजा, बसवता येतील तिथं बसवा, अन्यथा ही मातीची ढेकळं आहेत. उद्या मातीत मिसळतील." (माझ्या जीवनाचे गाणं, पृ. ६)

वामनदादाचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी देशवंडी (दिंडोरी) ता. सिन्नर, जिल्हा नाशिक येथे सर्वसामान्य कुटुंबात झाला. आणि दि. १५ मे २००४ रोजी नाशिक येथे वयाच्या ८२ व्या वर्षी निर्वाण झाले. जीवनाच्या अनेक प्रसंगांना पुढे जाऊन शाळा न शिकता ३ मे १९४३ सालापासून गीत रचना करून त्यांनी आंबेडकरी गीत गायनास सुरूवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार त्यांनी आपल्या गायनाच्या माध्यमातून आंबेडकरी मोहल्ल्या-मोहल्ल्यात, फाटक्या-तुटक्या अभावग्रस्त माणसांच्या घरापर्यंत पोचविले

तसे नाशिक शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या १९३० सालचा काळाराम मंदिराचा सत्याग्रह ही घटना सामाजिक क्रांतीच्या संदर्भात फार महत्त्वपूर्ण आहे मला असे वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा, संघर्षाचा, आंदोलनाचा, लढ्याचा फार मोठा प्रभाव समाज मनावर पडला व त्यातूनच वामनदादांना समाज जागृत करण्याची, परिवर्तनाची



Scanned with CamScanner

उर्जा प्राप्त झाली, व ती उर्जा आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत समाज बांधवांसाठी पुरवली असा कोणता गाव नाही ज्या गावात वामनदादा नाही. माझं गाव बडनेरा रेल्वे, पूर्विच्या झाडीफैल आणि धर्मांतरानंतर अशोक नगर येथिल सागरभाऊ वैद्य, स्मृतिशेष राजू नंदेश्वर, मदहोश अर्थात मदन नंदेश्वर यांचा मुलगा माझे मित्र प्राचार्य डॉ. संजय शेजव यांच्या गायनातून वामनदादा मला कळाले. त्यांच्या रचना माणसाला अंतर्मुख करणारे तर आहेच पण त्याच बरोबर माणसाला स्वतःचे परिक्षण करण्यास भाग पाडते. त्यांच्या काही रचनांचा आलेख "विसरणाची पचवलाशीची कणीच राहील धाणी सदा.."

"गौतमा तुझी गोष्टी तुजकडे मला ओढी.."
"उध्दरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे.."
"जीवाला जीवाचं दान माझ्या भीमानं केलं.."
"भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते.."
"दिधले भीमाने तुम्ही अमृत चाखले.."
"तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे.."
"कोण रोखील आता भीमाचा मळा.."
"मी वादळ वारा, मी वादळ वारा.."
"रक्त पिणारे सारे सारे वाडे लाळघणारा.."
मी वामनवाणी आलो, मी वामनवाणी गातो
जातो तेथे पेरीत जातो, चिल्यापिल्यांचा वारा..
मी वादळ वारा... मी वादळ वारा...
"आज कितने दिनोंसे हमको अछूत कहके पुकारा है
तू हटो ए कॉंग्रेसवालो फेडरेशन ए हमारा है..."

नायगावच्या १९५१ बाबासाहेबांच्या सभेत वामनदादांनी गीत गाईले गीत गाणारा कोण आहे? असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दादासाहेब गायकवाडांना विचारले, तेव्हा दादासाहेबानी बाबासाहेबांना सांगितले की, हा वामन कर्डक आहे. मोठा गुणी आणि इमानी आहे. त्यावेळी डॉ.बाबासाहेबांनी वामनदादाच्या पाठीवर शाबासकीची थाप देत म्हटले होते, वा दान गाईलास, असेच गात जा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ती पाठीवरची शाबासकीची एक थाप आयुष्यभर वामनदादाला उर्जा आणि प्रेरणा देत राहिली. त्यातूनच एका प्रखर आंबेडकरवादी महाकविचा जन्म झाला.

**सारांश :** २१०० पेक्षा जास्त मराठी, हिंदीत रचना वामनदादांनी लिहिल्यात. खऱ्या अर्थाने विषमतावादी समाजरचना उध्वस्त करणारा ते एक प्रकारचा वादळच होते. १९५६ च्या धम्मस्विकार क्रांतीपासून त्यांनी झोपडी ते बुध्द विहारपर्यंत आंबेडकरांचा विचार पोहचविणारे खरे बौध्द भिक्खू..! कोणताही स्वार्थ नसलेला माणुस अविरत समाज परिवर्तनासाठी झगाटून गेलेला

वामन नव्या दमाने, माझ्या भीमा प्रमाणे
उपजेल का रे कोणी, जुलमास जाळणारा

डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांना पडलेली चिंता त्यांनी व्यक्त केली. त्यांची रचना म्हणजे आंबेडकरी एकूण मराठी साहित्यातील अक्षर वाङ्मय होय.


संदर्भ

१) महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाङ्मय, खंड १ ते ४, संपादक – माधवराव गायकवाड, प्रा. डॉ. सागर जाधव आलोक – संबोधी प्रकाशन, यवतमाळ.

२) सागर वैद्य, राजु वैद्य, प्राचार्य डॉ. संजय शेजव, स्मृतिशेष राजू नंदेश्वर, यांनी गायलेले वामनदादांची गीते.


* * * * *




Scanned with CamScanner

Dr. Ambedkar Studies Center,
Sant Gadge Baba Amravati University, Amravati



# Dr. Babasaheb Ambedkar's Role in Nation Building

Editor's

**Dr. Tushar Deshmukh**
Registrar
Sant Gadge Baba
Amravati University,
Amravati

**Dr. Santosh Bansod**
Co-ordinator
Dr. Ambedkar Studies Center,
Sant Gadge Baba Amravati
University, Amravati

Scanned with CamScanner

 ISBN No. 978-81-940865-8-1

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीचे सजग भाष्यकार

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय पुसद जिल्हा यवतमाळ
महाराष्ट्र

---

**प्रस्तावना :**

भारतीय लोकशाहीत व भारतीय राज्यघटनेत भारतीय नागरिकांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका भारतीय घटनेचे शिल्पकार निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची होती.इंग्रजांनी सत्ता हस्तांतरण केल्यानंतर या देशातील उपेक्षित पीडित बांधवांचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक अधिकार मिळणार की नाही हा चिंतेचा प्रश्न त्यांना पडला होता.कोणत्याही परिस्थितीत भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर या देशातील अभावग्रस्त बांधवांना माणूस म्हणून मान्यता मिळेल की नाही हाही चिंतेचा प्रश्न त्यांना होता.

इंग्रजांनी सत्ता हस्तांतरण केल्यानंतर या देशातील उच्चभ्रू नागरिकांबरोबर उपेक्षित वर्गांना अधिकार मिळणार की, नाही. हा प्रश्न त्यांना पडला होता.या देशातील शोषित बांधवांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळवून देण्यासाठी भारतीय राज्यघटनेत तरतूद करणे आवश्यक आहे. त्यासाठी संविधान समिती मध्ये स्थान मिळवणे आवश्यक आहे.

या देशाला लोकशाही मिळाल्यानंतर व या देशाने भारतीय राज्यघटना स्वीकारल्यानंतर ही लोकशाही टिकून ठेवता आली पाहिजे. यासंदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीच्या दृष्टिकोनातून अतिशय सजग भाष्य केल्याचे दिसून येते.भारतीय संविधान, राज्यघटना हे किती चांगली आहे; त्यापेक्षा या देशातील शासनकर्ती प्रतिनिधी या देशाचे नेतृत्व करणारे लोकप्रतिनिधी किती चांगले आहेत. हे महत्त्वाचे आहे.देशाचे नेतृत्व करणारे, शासन करणारे व मुख्य प्रवाहात स्वतः असणारे प्रतिनिधी यांच्यावर व त्याचबरोबर या देशातील नागरिकांवर देखील लोकशाही टिकवण्याची जबाबदारी आहे. शासनकर्ती जमात आणि भारतीय नागरी या दोघांवर देखील लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे त्याहीपेक्षा या देशातील नागरिकांनी आपल्या न्याय हक्कासाठी, अधिकारासाठी, अभिव्यक्तीसाठी स्वातंत्र्यासाठी, व सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक अधिकाराविषयी सजग असल्याशिवाय त्यांना त्यांचे अधिकार मिळणार नाहीत. त्यासाठी त्यांनी सजग असणे आवश्यक आहे.एकोणीसशे पंचेचाळीस मध्ये द्वितीय महायुद्ध समाप्त झाले आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाला प्राधान्य प्राप्त झाले. या प्रश्नावर विचार विनिमय करण्यासाठी ब्रिटिश शासनाने एक त्री सदस्यीय शिष्टमंडळ भारतात पाठविले होते. हे शिष्टमंडळ सत्ता हस्तांतरणाच्या निर्विघ्न मार्ग, पद्धती, प्रक्रिया आणि साधन सुचविण्याचे हेतूने भारतात पाठवण्यात आले होते. या शिष्टमंडळाला "कॅबिनेट मिशन "असे संबोधण्यात आले होते. या कॅबिनेट मिशन ने 16 मार्च 1946 रोजी सत्ता हस्तांतरणाची आपली योजना घोषित केली.भारताचा भावी राज्यकारभार

 ISBN No. 978-81-940865-8-

चालविण्याच्या दृष्टीने संविधान निर्मितीसाठी एक संविधान सभा स्थापन करण्यात यावी, असे त्या शिष्टमंडळाने सुचित केले होते.

ब्रिटिश सरकारने पाठविलेल्या कॅबिनेट मिशनच्या प्रस्तावानुसार संविधान सभेच्या स्थापनेसाठी निवडणुका घेण्यात आल्या.संविधान सभेवर सदस्यांची निवड राज्यातील विधान मंडळावर निवडून आलेल्या सदस्य द्वारे करण्यात आले होते.यावेळी कॉंग्रेस ने टोकाची व विरोधाची भूमिका घेतल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संविधान समितीवर निवडून जाणे कठीण झाले होते. तत्कालीन कॉंग्रेस पक्षाने व त्यातील ज्येष्ठ राजकीय व्यक्तीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर कोणत्याही परिस्थितीत राज्यातून निवडून येऊ नये, संविधानसभेवर ते जाऊ नये. असे षड्यत्र तत्कालीन कॉंग्रेस पक्षाने घेतली होती. अशा परिस्थितीत बंगालच्या विधान मंडळातून श्री जोगेंद्र नाथ मंडल आणि इतर अनुसूचित जातीच्या सदस्यांच्या पाठिंब्यावर संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर निवडून आले. कालांतराने भारत देशाची फाळणी झाली आणि बंगाल हे भारतातून वेगळे झाले. अशातच डॉ. आंबेडकरांचे संविधान समिती वरचे सदस्यत्व रद्द झाले.या भारत देशाचा भारतीय संविधान लिहायचा असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर या व्यक्तीशिवाय कोणताही उपाय नाही, पर्याय नाही, तेव्हा आता काहीही झाले तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना निवडून आणणे गरजेचे आहे.त्यावेळेस मुंबई प्रांतातून कॉंग्रेस पक्षाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना निवडून संविधान समितीमध्ये पाठविले.

शेवटी अथक परिश्रमातून दोन वर्ष अकरा महिने व 18 दिवसामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान लिहून पूर्ण केले. भारतीय राज्य घटनेच्या माध्यमातून या देशातील संपूर्ण नागरिकांना घटनादत्त अधिकार बहाल केले. आणि ही भारतीय लोकशाही टिकणार की नाही याविषयी त्याने चिंता देखील व्यक्त केली होती. त्यांनी व्यक्त केलेली चिंता प्रबुद्ध भारत मासिकातून अभिव्यक्त केली, प्रकाशित केली.लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी कोण कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे.याचे समर्पक सजग भाष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून व्यक्त केली होती.

भारतात बुद्ध पूर्व काळात लोकशाही अस्तित्वात असावी. बुद्ध काळात बुद्ध भिक्षु संघात तिचे नियम पाळले जात असावेत. कालांतराने भारतावर परकीय आक्रमण झाले आणि या आक्रमणात त्यांनी भारतावर राज्य प्रस्थापित केले. छोट्या राज्यांची निर्मिती झाली. आणि अशा परिस्थितीत भारतातील असलेली लोकशाही संपुष्टात आली. नष्ट झाली.

१९४७ नंतर लोकशाही प्रणित राज्यव्यवस्था प्रस्थापित करणारे राज्यघटना आपण स्वीकारली. परंतु खरी लोकशाही घटनेतील कायद्यावर नव्हे. तर लोकांच्या चांगल्या प्रवृत्तीवर अवलंबून असते. यासंबंधी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर भारतीय नागरिकांनी काय करणे आवश्यक आहे. याविषयी महत्त्वपूर्ण भाष्य केले आहे.समता, स्वातंत्र्य, बंधुत्व या तिन्ही तत्त्वांची एकत्र जोपासना लोकशाही करिता आवश्यक आहे. व या देशातील नागरिकांनी स्वीकारले पाहिजे त्याचे पालन केले पाहिजे. आपल्या

ISBN No: 978-81-940865-8-1

रोजच्या दैनंदिन व्यवहारात या तत्त्वाचा त्यांनी पालन करणे बंधनकारक आहे. त्याचबरोबर राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर सामाजिक लोकशाही आवश्यक आहे आणि सामाजिक लोकशाही निर्माण करायची असेल तर या देशातील नागरिकांनी एकमेकांप्रती बंधुत्वाचे नाते प्रस्थापित केले पाहिजे. जातीजातीमध्ये धर्मा धर्मा मध्ये विखुरलेल्या बांधवांनी एकत्र येऊन समता निर्माण केली पाहिजे. ममता निर्माण झाली तरच बंधुत्वाची आपुलकी भावना निर्माण होईल.आणि त्यामुळे राजकीय लोकशाही टिकवण्यासाठी सामाजिक लोकशाहीची नितांत आवश्यकता आहे. या देशातील जाती देश विघातक तर आहेच पण त्याचबरोबर बंधुत्वाला मारक आहेत या देशातील बहुजन समाजात जी स्वयसिद्धी ची ज्योत पेटलेली आहे त्यातून वर्गकलह वर्ग युद्ध उद्भवू नये.भारतीय लोकशाही टिकवण्याची संपूर्ण जबाबदारी भारतीय नागरिकांची आहे. त्यांनी आपल्या अधिकारासाठी व न्याय हक्कासाठी सजग असणे आवश्यक आहे. व होणाऱ्या अन्याय-अत्याचार साठी त्यांनी एकत्रित राहणे गरजेचे आहे. देशातील प्रत्येक नागरिकांना या देशावर प्रेम असणे गरजेचे आहे हा देश माझा आहे ही भावना ज्या दिवशी या देशातील नागरिकामध्ये निर्माण होईल खऱ्या अर्थाने तेव्हा लोकशाही टिकेल असे महत्त्वपूर्ण विवेचन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना लोकशाही स्वीकारण्यापूर्वी मांडली होती.

**निष्कर्ष :**

1) अथक परिश्रमातून भारतीय राज्यघटना निर्माण झाली.
2) संविधान सभेवर बंगालमधून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर निवडून आले.
४) देशाची फाळणी झाल्यानंतर बंगाल प्रांत वेगळा झाला.
3) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे सदस्यत्व रद्द झाले.
4) मुंबई प्रांतातून पुन्हा निवडून आले.
5) भारतीय राज्यघटना हा या देशाचा प्राण आहे. तो प्राण टिकवून ठेवण्याची जबाबदारी या देशातील संपूर्ण नागरिकांची आहे.
6) या देशातील नागरिकांनी त्यांचा असलेला या देशातील अभावग्रस्त बांधवान विषयी पूर्वग्रहदूषित ठेवू नये.

**संदर्भ ग्रंथ:**

1) संविधान सभेतील भाषणे आणि चर्चा-- डॉ.बाबासाहेब आंबेडकर
2) पूर्णा माय भाग 1 -संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती

Scanned with CamScanner

ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 3.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## SPECIAL ISSUE MARCH 2023

## कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर, गढी

राष्ट्रीय चर्चासत्र

## समकालीन मराठी साहित्यातील जाणिवा

दि.१६ मार्च २०२३

भाग दोन




ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Chief Editor
Principal Prof.Dr.Sadashiv H. Sarkate
Editor
Prof.Ramesh B. Ringne

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ३६. | मराठवाड्यातील समकालीन आत्मकथनात्मक साहित्य आणि आंबेडकरी जाणिवा | शीलवंत भिवा वाढवे | १४८ |
| ३७. | हॉटेल विश्वाचं वास्तव मांडणारी कादंबरी : टिश्यू पेपर | डॉ. प्रेमला मुखेडकर | १५३ |
| ३८. | समकालीन मराठी साहित्य दलित साहित्यातील जाणिवा | डॉ. मनोज रामजी मुनेश्वर | १५७ |
| ३९. | समकालीन मराठी साहित्य आणि पर्यावरणीय जाणीवा | डॉ. अनिल बळीराम बांगर | १६० |
| ४०. | समकालीन फुले आंबेडकरी कथात्म साहित्यातून व्यक्त होणारे अस्तित्वविषयक भान (२००० नंतरच्या निवडक साहित्यकृतींच्या संदर्भात ) | डॉ. अश्विनी आत्माराम तोरणे | १६५ |
| ४१. | महानुभाव संप्रदायाच्या प्रभावित साहित्यातील तात्त्विक जाणीवा | श्री अधिकराव महारु पाटील | १७१ |
| ४२. | समकालीन स्त्रीवादी साहित्याचे स्वरुप | डॉ.खाडप संजय बाबुराव | १७४ |
| ४३. | 'धूळपावलं' या कादंबरीतील राजकीय सत्ता संघर्ष | डॉ. अविनाश श. धोबे | १७९ |
| ४४. | समकालीन जाणिवांची अभिव्यक्ती करणारा अशोक कोळी यांचा 'आसूड'(कथासंग्रह ( | प्रा.डॉ.कार्तिकी विजयकुमार नागरे | १८३ |
| ४५. | राजेंद्र गहाळ यांच्या कथेतील सामाजिक जाणिवा | प्रा. डॉ. दिलीप भिसे हनुमंत महादेव काळगुंडे | १८७ |
| ४६. | "समकालीन मराठी साहित्य आणि स्त्री वादी साहित्यातील जीवन जाणिवा " | प्रा. डॉ. सुषमा शंकरराव प्रधान | १९० |
| ४७. | नाळ - सामाजिक आणि भावनिक बांधिलकी जपणारा कथासंग्रह | प्रा.सुखदा सदाशिव -हाटवळ | १९३ |
| ४८. | समकालीन मराठी कादंबरी | डॉ. स्वाती मधुकर वाकोडे | १९८ |
| ४९. | वसंत आबाजी डहाके यांची 'चित्रलिपी'तील जाणिवा | डॉ. एम. डी. इंगळे | २०१ |
| ५०. | दंभ आणि भ्रामकतेपासून कवितेला दूर ठेवणारा कवी रोहन नामदिवे | प्रा. विक्रांत कृष्णाराव मेश्राम | २०६ |
| ५१. | समकालीन स्त्रियांच्या कादंबऱ्या | प्रा.डॉ.विजय गणपतराव बारकड | २१० |
| ५२. | 'समकालीन स्त्रीलिखित कथेतील विवाहबाह्य संबंधाचे | डॉ.धोंडीराम जगन्नाथ दमामे | २१३ |




Scanned with CamScanner

# दंभ आणि भ्रामकतेपासून कवितेला दूर ठेवणारा कवी रोहन नागदिवे

प्रा. विक्रांत कृष्णाराव मेश्राम,
मराठी विभाग प्रमुख,
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद.

महामानव साहित्यिक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या मानव मुक्तीच्या आंदोलनातून उपेक्षित, पीडित, अभावग्रस्त मानव समूहाला जीवन जगण्याविषयीची जाणीव प्रथमतः झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या चळवळीतून उच्चभ्रू समाजाने नाकारलेल्या शोषित मानव समूहांना आपण माणसं आहोत ही मानव असण्याची जाणीव प्रथमतः डॉ.बाबासाहेबांनी उभारलेल्या आंदोलनातून झाली. त्यांनी उभारलेल्या आंदोलनाचे अनेक दलित (मुद्दाम दलित लिहीत आहे) पूर्वाश्रमीच्या दलित लेखकांनी साहित्याच्या माध्यमातून माणूस असण्याची जाणीव रेखाटली आहे.त्याचबरोबर होणारे शोषण आणि शोषणाविरुद्ध संघर्ष करण्याची जाणीव निर्माण झाली आणि आंदोलनातून, संघर्षातून पूर्वाश्रमीच्या दलित कवितेचा जन्म झाला 1990 च्या दशकापासून दलित साहित्य या संज्ञे ऐवजी आंबेडकरी संज्ञा स्विकारण्यात आली.

आंबेडकरी आंदोलनातून कवी रोहन नागदिवे यांचा "स्थितीचा ओला कोलाज "या कविता संग्रहातील कवितेचा जन्म झाला. ३१ मार्च २००७ला यथार्थ प्रकाशन बडनेरा यांनी या कविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा केला. कवितासंग्रहात ६२ कवितेचा समावेश आहे. या कवितासंग्रहाच्या माध्यमातून कवी रोहन नागदिवे यांनी आपली आंबेडकरी असण्याची निष्ठा, जाणीव मनोगतातून व्यक्त केली. धर्मांतरपूर्व दलित जाणीव आणि धर्मांतर आंबेडकरी जाणीव रेखाटलेली आहे. स्वतः रोहन नागदिवे म्हणतात," भारतीय समाज जीवनात प्रामुख्याने दोन मूल्य व्यवस्था आहेत. समतावादी मूल्य व्यवस्था व नीसमतावादी मूल्य व्यवस्था त्या दोन्ही व्यवस्थांमध्ये सतत संघर्ष सुरू आहे. जिथे दोन व्यवस्था असतात तेथे आपल्याला एकीची निवड करावीच लागते .मला तर समतावादाचे बाळकडू मिळाले आहे." या समतावादी कवीच्या कवितेची जीवन जगण्याची चळवळीत राबण्याची धडपड मी स्वतः अनुभवली आहे. व्यसनेच्या आहारी गेलेल्या रोहनच्या कवितेचा कवितासंग्रहात रूपांतर झाले पाहिजे. यासाठी जिवापाड श्रम घेणारे कालकथीत आंबेडकरी तत्त्ववेत्ते डॉ. सतेश्वर मोरे आणि रोहने व्यसनविरहित जीवन जगावे, यासाठी जीवाच्या आकांताने धडपडणारे त्यांचे काका बाजीराव नागदिवे बडनेरा. .अमरावती शहरात' स्थितीचा ओला कोलाज 'प्रकाशन समारंभाचे बॅनर चौका चौकात लावण्यापासून तर कार्यक्रम पूर्व घडामोडींचा व कार्यक्रमाच्या संपन्नतेपर्यंतचा मी साक्षीदार .रोहनचा कवितासंग्रह प्रकाशित व्हावे व प्रकरणाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारणारे त्यांचे काका बाजीराव नागदिवे व आंबेडकरी निष्ठेला जपणारे डॉ. सतेश्वर मोरे व मी तत्कालीन बेरोजगार वाङ्मय पारंगत व घड्याळी तासिकेप्रमाणे काम करणारा ...

दिवसेंदिवस समाजात नानारी वाढत चालली आहे. खोटेपणा, दांभिकपणा, ढोंगीपणा लोकांच्या नसानसात मुरत असताना भ्रमकतेपासून , खोट्या जगापासून आरी आंबेडकरी माणसाने दंभ आणि भ्रामकतेपासून स्वतःला अलिप्त ठेवले पाहिजे. ही भूमिका आपल्याला कवितेत मांडणारा. दंभ आणि भ्रामकतेत बुडालेला मानव हा समाजासाठी व राष्ट्राचे निर्मितीसाठी घातकदायक ठरतोय. दंभआणि भ्रामकतेपासून आंबेडकरी माणसाने ,समूहाने अलिप्त राहण्याची ही जाणीव गावागावात शहरा शहरातील, खेड्यापाड्यातील उभे राहिलेले डॉ.आंबेडकरांचे पुतळे जाणीव करून देतात .पुतळा माणसाला माणूसपणाची जाणीव करून तर देतोच ,पण त्याचबरोबर सजगतेची भूमिका देखील स्वीकारतो .एक नवी ऊर्जा ,नवचैतन्य तर प्रदान करतोच पण आपल्या चुकीच्या वागणुकीवर देखील तटस्थ नजर ठेवतो. आणि आपण चुकीचे वागू नये अशी जाणीव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पुतळे गावागावात, शहरा शहरात, झोपडपट्टीत, नगरा नगरात खेड्यापाड्यातून करून देतात. अन्यायाविरुद्ध आपण संघर्ष केला पाहिजे. सामाजिक व्यवस्था गढूळ होणार नाही. कोणावरही अन्याय होणार नाही. आणि शासनाच तर संवैधानिक मार्गाने न्याय मागण्याची जाणीव पुतळा करून देतो. हा पुतळा या कवितेतून रोहन नागदिवे यांनी ही जाणीव अभिव्यक्त केली आहे.

पुतळा उभा ठाकला तेव्हापासून
गावकुसातील मायबाप करतात विस्मय आपल्या . . . मुलाबाळांचा
कारण-
मुले वेचीत नाहीत
मुडद्यावरून फेकलेले पैसे -लाह्या बत्तासे
उकरीत नाहीत उकिरडे तीन- टपरांसाठी
गल्लीत भरवीत नाही जुव्वा
गाढवाच्या गुदेत ठोकत नाही कमची पिटकरीने
मुले धरित नाहीत फुलपाखरू
कोकिळेवर गुल्लरीने नेम
मारीत नाहीत दगड उंबरांच्या झाडावर
हिंडत नाहीत रानावनात गुराढोरांसारखे
मुले शाळेत जातात नित्य नेमाने
वाचतात पुस्तके करतात चर्चा

शोषित ,पीडित ,वंचित ,उपेक्षित समाजामध्ये डॉ. बाबासाहेबांनी नवे प्राण फुंकले ,गुलामीच्या खिगाऱ्याखाली व शोषणाच्या वणव्यात पेटणाऱ्या मानवाला गुलामीतून आणि शोषणातून मुक्त केले. एक नवा चेहरा दिला. तेव्हापासूनच हा समाज जागा झाला .लिहू लागला, वाचू लागला व नित्यनियमाने शाळेत जाऊ लागला, कारण शाळाच माणसाच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या विकासाची दारे उघडतो. माणसाला माणूसपणात आणतो. चांगल्या वाईट गोष्टीची जाणीव करून देतो .शोषणाविरुद्ध व



Scanned with CamScanner

दिवसेंदिवस समाजात नानारी वाढत चालली आहे. खोटेपणा, दांभिकपणा, ढोंगीपणा लोकांच्या नसानसात मुरत असताना धमकतेपासून , खोट्या जगापासून आणि आंबेडकरी माणसाने दंभ आणि धामकतेपासून स्वतःला अलिप्त ठेवले पाहिजे. ही भूमिका आपल्याला कविता मांडणारा. दंभ आणि धामकतेत बुडालेला मानव हा समाजासाठी व राष्ट्राचे निर्मितीसाठी धोकादायक ठरतोय. दंभ आणि धामकतेपासून आंबेडकरी माणसाने ,समूहाने अलिप्त राहण्याची ही जाणीव गावातील शहरा शहरातील, खेड्यापाड्यातील उभे राहिलेले डॉ.आंबेडकरांचे पुतळे जाणीव करून देतात ,पुतळा माणसाला माणूसपणाची जाणीव करून तर देतोच ,पण त्याचबरोबर सजगतेची भूमिका देखील स्वीकारतो .एक नवी ऊर्जा ,नवचैतन्य तर प्रदान करतोच पण आपल्या चुकीच्या वागणुकीवर देखील तटस्थ नजर ठेवतो. आणि आपण चुकीचे वागू नये अशी जाणीव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पुतळे गावागावात, शहरा शहरात, झोपडपट्टीत, नगरा, नगरात खेड्यापाड्यातून करून देतात. अन्यायाविरुद्ध आपण संघर्ष केला पाहिजे. सामाजिक व्यवस्था गढूळ होणार नाही. कोणावरही अन्याय होणार नाही. आणि झालाच तर संवैधानिक मार्गाने न्याय मागण्याची जाणीव पुतळा करून देतो. हा पुतळा या कवितेतून रोहन नागदिवे यांनी ही जाणीव अभिव्यक्त केली आहे.

पुतळा उभा ठाकला तेव्हापासून<br>
गावकुसातील मायबाप करतात विस्मय आपल्या मुलाबाळांचा<br>
कारण-<br>
मुले वेचीत नाहीत<br>
मुडद्यावरून फेकलेले पैसे -लाह्या बत्तासे<br>
उकरीत नाहीत उकिरडे टीन- टपरांसाठी<br>
गल्लीत भरवीत नाही जुव्वा<br>
गाड्यांच्या पुढेत ठोकत नाही कमची बिटकरीने<br>
मुले धरित नाहीत फुलपाखरू<br>
कोकिळेवर गुल्लरीने नेम<br>
मारीत नाहीत दगड उंबरांच्या झाडावर<br>
हिंडत नाहीत रानावनात गुराढोरांसारखे<br>
मुले शाळेत जातात नित्य नेमाने<br>
वाचतात पुस्तके करतात चर्चा

शोषित ,पीडित ,वंचित ,उपेक्षित समाजामध्ये डॉ. बाबासाहेबांनी नवे प्राण फुंकले ,गुलामीच्या दिगारुखाखाली व शोषणाच्या वणव्यात पेटणाऱ्या मानवाला गुलामीतून आणि शोषणातून मुक्त केले. एक नवा चेहरा दिला. तेव्हापासूनच हा समाज जागा झाला .लिहू लागला, वाचू लागला व नित्यनियमाने शाळेत जाऊ लागला, कारण शाळाच माणसाच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या विकासाची दारे उघडतो. माणसाला माणूसपणात आणतो. चांगल्या वाईट गोष्टींची जाणीव करून देतो .शोषणाविरुद्ध व



Scanned with CamScanner

अन्यायाविरुद्ध न्याय मागण्याची ताकद ही शाळाच माणसाला प्रदान करते. शोषण विरहित, गुलामगिरिविरहित समाजाची निर्मिती करतो. परिवर्तन घडवून आणतो.

पुतळा उभा ठाकल्यापासून मुलांना लागली भारी शिस्त
काही हात मुलांची ही शिस्त मोडू पाहतात
मुलांचे जीवनच विटू पाहतात
शिस्त मोडली की मुले पडतात, धगधगत आग रस्त्यावर
फाडतात छातीतल्या कर्पुतल्या रायफलीपुढेच
हा पुतळा मावत नाही तर माझ्या नजरेत
पापण्यांना आभाळाएवढे फाडूनही
हा पुतळा
(हा पुतळा कविता)

शोषित माणसाला माणूसपणाची जाणीव चवदार तळ्याच्या संघर्षापासून झाली .डॉ. बाबासाहेब नावाच्या महापुरुषाने हे ओळखले होते की ,अभावग्रस्त शोषित अन्यायग्रस्त माणूस आपली ओळख विसरला आहे. आपण माणसं आहोत, ही या विषमतावादी व्यवस्थेच्या होणाऱ्या शोषणात विस्मय झाला होता. या अशा माणसाला चवदार तळ्याच्या पाण्यात त्याचा चेहरा दाखवला व तेव्हापासून आपण ही माणसं आहोत आपल्यालाही माणसाप्रमाणे सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार आहे .ही जाणीव चवदार तळ्याच्या संघर्षातून डा.आंबेडकर नावाच्या जादूगराणे दाखवून दिले.

एकदा काय झाले
एका जादूगाराने चवदार तळ्याचे पाणी पेटविले
तेव्हा पिसाळलेला काळ
निसमपत होऊन भंते अंगुलीमाल झाला
त्याचे घोषवाक्य होते
'बहुजन हिताय बहुजन सुखाय'
मग तळ्याचे झिडले पाणी
बुद्ध बाळाच्या गेले कानी
चवदारचे पाणी चाखलेले
क्षण हात एकत्रात येतील
आणि गळ्यावर रोखतील बंदूक म्हणतील .....
अगर किसीने हीलने की कोशिश की तो भूनके रख दूंगा
घरतील मुक्त अंगुलीमाल या वधस्तंभावरून
(अंत सुचक ना कविता)

तर आर्य या कवितेतून जाणीव व्यक्त करताना कवी रोहन नागदिवे जाणीऊ अभिव्यक्त करताना,

आर्य तुम्ही आमच्या गावात गुराखी म्हणून आले
आणि गावचे न्यायाधीश झाले
तेव्हापासून सगळे निवाडे आमचे विरुद्ध गेले
तुम्ही गुरे घेऊन आलात

वैरणासाठी आगाऱ्या गेटूत केली अफूची शेती
मग आमचे जीवन झाले कुरण

परकीय आर्य भारतात आले आणि संपूर्ण सत्ता काबीज केली. तेव्हापासूनच अभावग्रस्तांचे माणूस म्हणून जगणे नाकारले गेले. या विषमतावादी आर्यांनी आमचे मेंदूत अफूची शेती केली .जो मनुष्य व्यसनाधीन असतो.' तो कधीही समाज परिवर्तन घडवून आणू शकत नाही. अशा व्यसनाधीन समूहाला बाबासाहेब नावाच्या डॉक्टरांनी असा औषधोपचार केला की,या व्यसनाधीन माणसाला अन्याय अत्याचार शोषण कळायला लागले व या शोषणातून मुक्त होण्यासाठी संघर्ष अटळ आहे .ही जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या अभावग्रस्त समूहाला करून दिली.

खरंतर कवी रोहन नागदिवे यांचा' स्थितीचा ओला कोलाज' हा संशोधनाचा विषय होऊ शकतो. इतका आशय व अभिव्यक्तीने परिपूर्ण कवितासंग्रह आहे. ते स्वतः 'अनावश्यक तरीही' या आपल्या मनोगतातून अभिव्यक्त होतात की,' मानव मुक्तीच्या आंदोलनाचा मी जन्मजात आजीवन सदस्य आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या या आंदोलनात मला माझी सदस्यता निष्ठेने व जबाबदारीने पार पाडायची आहे. कवितेमुळे मी या आंदोलनात सक्रिय आहे . ही जाणीव अभावग्रस्त समूहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या ज्ञानाच्या थांग सागराने निर्माण केली.आज जे काही परिवर्तन घडून आले ते या महान माणसामुळेच डॉ बाबासाहेब आंबेडकर....



Scanned with CamScanner

# तिफण

वर्ष : १४ वे । अंक ४ था
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च - २०२३
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



## यशवंतराव चव्हाण
## विशेषांक

Scanned with CamScanner

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १४ वे, अंक - ४ था
जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३
भाग - ३

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

◆ संपादक ◆
डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३१४०३, मो. ९९०४००३९९८

Scanned with CamScanner

# भाग - ३ अनुक्रमणिका


| अनु क्र. | लेख व लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २५ | मराठी पत्रात्मक वाङ्मय आणि विदेश - दर्शन<br>प्रा. डॉ. दिनेश पांडुरंग वापुबरे | १३०-१४३ |
| २६ | यशवंतराव चव्हाण यांचे अर्थविषयक विचारांचे विश्लेषणात्मक अध्ययन<br>डॉ. सुनील बाळू पुगे | १४४-१४८ |
| २७ | यशवंतराव चव्हाण यांचे सांस्कृतिक योगदान<br>प्रा. सुनील लक्ष्मण परदेशी | १४९-१५१ |
| २८ | यशवंतराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल<br>प्रा. सुशील ज्ञानेश्वर पवार<br>डॉ. मारुती अर्जुन केकाणे | १५२-१५५ |
| २९ | यशवंतराव चव्हाण यांचे कृषिविषयक विचार आणि कार्य<br>प्रा. तानाजी हनुमंत जाधव | १५६-१६१ |
| ३० | यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय क्षेत्रातील योगदान<br>डॉ. वैशाली शेषराव पेरके | १६२-१६५ |
| ३१ | आधुनिक महाराष्ट्राची मुहूर्तमेढरोवणारे : मा. यशवंतराव चव्हाण<br>प्रा. विद्या बिल्लाप्पा पाटील | १६६-१६८ |
| ३२ | यशवंतराव चव्हाण यांचा राजकीय प्रवास<br>प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम | १६९-१७१ |


Scanned with CamScanner

# ३२. यशवंतराव चव्हाण यांचा राजकीय प्रवास

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद, जि.- यवतमाळ

भारत देश इंग्रजांच्या राजवटीत असताना, भारतातील ध्येयवादी क्रांतिकारी यांची भूमिका स्वातंत्र्याच्या संदर्भात स्पष्ट होती. अशा सर्व जाणकार तज्ञ महापुरुषांना इंग्रजांच्या राजवटीतून भारत देश मुक्त व्हावा, स्वातंत्र्य व्हावा, त्यासाठी भारतभर विविध पातळीवर क्रांती, आंदोलने सुरू होते. त्यामध्ये राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, संघ, उत्सव, वृत्तपत्र अशा विविध घटनांच्या माध्यमातून समाजात जागृती निर्माण करण्याचे काम मोठ्या उत्साहाने सुरू होते.

भारत देश स्वातंत्र्य झाल्यानंतर या देशातल्या तळागाळातल्या माणसाला आपण स्वातंत्र्य होऊ, आपल्याला मुक्त श्वास घेता येईल, आपण कोणाचीही गुलाम नसणार, आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य लाभणार. आपला गुलामीचा चेहरा गळून पडणार आणि एक नवा स्वतंत्र भारताचा नागरिक म्हणून आपण चेहरा परिधान करून; अशा नव्या उमेदीने सर्वत्र स्तरावर नागरिकांना वाटत होते.

याच दरम्यान भारतीय घटनेचे शिल्पकार, आधुनिक भारताचे निर्माते, युग प्रवर्तक महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताच्या राजकारणात त्यांच्या नेतृत्वाने उभी राहिली होती. त्यांनी सर्वसामान्य माणसांच्या काळजावर आपला प्रभाव सोडला होता, असे महात्मा गांधी, वृत्तपत्राच्या माध्यमातून भारताच्या स्वातंत्र्यासाठी धडपड करणारे लोकमान्य टिळक इत्यादी महापुरुषांची आपापल्या पद्धतीने संघर्षात्मक लढाई सुरु होती. या दरम्यान यशवंतराव चव्हाण यांच्यावर सर्वात जास्त जो प्रभाव पडला होता, तो म्हणजे महात्मा गांधीजींच्या चळवळीचा, त्यांच्या आंदोलनाचा आणि त्यांना मिळालेल्या लोकप्रियतेचा, महात्मा गांधीजींच्या नेतृत्वामुळे यशवंतराव आतून बाहेरून भारावून गेले होते. जादी वयाच्या सोळाव्या वर्षी यशवंतरावांनी माध्यमिक विद्यालयाच्या शालांत परीक्षेचा अभ्यास करत असताना, नेमक त्याच वेळी महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतात इंग्रजांच्या विरोधात तीन मोठी देशव्यापी आंदोलने दहा-बारा वर्षांच्या फरकाने झाली होती, यामध्ये पहिले आंदोलन असहकारितेचे, ते १९२०साली सुरू झाले होते, १९३० साली सविनय कायदेभंगाचे आंदोलनाला सुरुवात झाली होती. ऐन तारुण्यात यशवंतराव या आंदोलनात सहभागी झाले होते विद्यालयीन शिक्षण सुरू असतानाच सभोवतालचे राष्ट्रीय जीवन आणि जागतिक उलाढालीचे पडसाद त्यांच्यावर पडू लागलेत, त्याच वेळेस सभोवतालचे वैचारिक आंदोलनामुळे त्यांची वैचारिक बैठक अधिक परिपक्व होत होती. १९३० ते १९४५ या कालखंडात त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. स्वातंत्र्याच्या आंदोलनात वारंवार कारावासाच्या शिक्षा भोगून ,राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक पकड त्यांची भक्कम झाली होती. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, एस. एम. रॉय इत्यादींचे अनुकरण त्यांनी केले

भारत देशात १९२० च्या दशकात महात्मा

गांधींनी भारताला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे ,परक्यांच्या गुलामगिरीतून भारत मुक्त झाला पाहिजे ,यासाठी विविध पातळीवर आंदोलन करत होते. सर्वसामान्य माणूस स्वातंत्र्याविषयी अनेक स्वप्न उराशी घेऊन जीवन जगत होता,भारत स्वातंत्र्य झाला पाहिजे

म्हणजे आपण देखील स्वातंत्र्य होवू, सर्वसामान्यांचे स्वप्न पाहणे त्यावेळी स्वाभाविकच होते. कारण, ते देखील भारताचे नागरिक होते. याच १९२० च्या दशकात भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक, सांस्कृतिक राजकीय आंदोलनाला सुरुवात केली होती. या देशातल्या अस्पृश्य बांधवांना माणूस म्हणून सन्मानाने जीवन जगता यावे, त्यांच्या गुलामीच्या बेड्या तुटल्या पाहिजे. कारण, या देशातला अस्पृश्य समूह दोन पद्धतीने गुलाम होता. एक परकीय इंग्रजांच्या आणि दुसरे म्हणजे स्वकीयांच्या गुलामगिरीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना एक चिंता नेहमी असायची की, भारत देश पारतंत्र्यातून मुक्त झाल्यानंतर, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशातील अस्पृश्यांना स्वकीयांकडून स्वातंत्र्य मिळेल का? की! त्यांच्या वाट्याला गुलामगिरीच येईल!

यशवंतराव चव्हाण यांनी गांधीजींच्या तत्वज्ञानाला, चळवळीला जवळ केले. त्यांच्यावर गांधीजींच्या आंदोलनाचा फार मोठा प्रभाव होता. ते भारावून गेले होते. आणि म्हणूनच ते राजकीय क्षेत्रात उत्तुंग गाठू शकले; जर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाला चळवळीला जवळ केले असते तर? असा प्रश्न निर्माण होतो. प्रश्न निर्माण होणेही स्वाभाविक आहे. प्रश्न निर्माण झाले पाहिजे. असे म्हणण्याला काही हरकत नाही. मनुष्य म्हटला की त्याला प्रश्न पडलीच पाहिजे त्याने प्रश्न निर्माण केलेच पाहिजे.

१९४२ साली महात्मा गांधींनी पुकारलेल्या भारत छोडो आंदोलनात यशवंतरावांनी मोठ्या सातारा जिल्ह्याचे नेतृत्व केले होते. १९४५साली स्वातंत्र्य आंदोलनात महाराष्ट्रात जे काही नेते होऊन गेले, त्यांच्यातील सर्वात तरुण यशवंतराव चव्हाण होते. १९४६ साली ते विधान भवनावर निवडून आले. तत्कालिक मुंबईराज्याच्या राजधानीत यशवंतराव एक पार्लमेंटरी सचिव म्हणून बारताबास गेले.

महाराष्ट्रात १९४९ साली कॉंग्रेस पक्षात वादविवाद, मतमतांतरे, मतभेद सुरु झालेत. कॉंग्रेसमधून बाहेरपडलेल्या नेत्यांनी १९४९ साली डाव्या गटाचा शेतकरी कामकरी पक्ष स्थापन केला. शंकरराव मोरे, केशवराव जेधे, दत्ता देशमुख, तुळशीराम जाधव, यशवंत मोहिते, र. के. खाडीलकर यांनी नव्या पक्षाचे नेतृत्व केले. या पक्षाच्या स्थापनेच्या वेळी जी काही षड्यंत्र रचण्यात आली होती त्या षड्यंत्रात, बैठकीत यशवंतराव स्वतः उपस्थित रहायचे. शेवटी डाव्या गटाच्या कामकरी शेतकरी पक्षाच्या स्थापनेच्या वेळी यशवंत राव बाजूला झालेत व कॉंग्रेस पक्षाशी प्रामाणिक राहिलेत.

१९५२ सालची भारताच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत शेतकरी कामकरी पक्षाला पाहिजे तेवढे यश न मिळाल्यामुळे शेतकरी काम करी पक्ष कॉंग्रेसमध्ये विलीन झाले.

महाराष्ट्राच्या राजकारणात भाषिक राज्य मागणीची आंदोलन, १९४६ सालापासून संयुक्त महाराष्ट्र मागणीचे आंदोलन, भारत सरकारने भाषावार प्रांत रचने करिता फाजल अली आयोग निर्माण केला. महाराष्ट्राच्या कॉंग्रेस समितीने संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा ठराव एकमताने संमत केला. फाजल अली आयोगामुळे महाराष्ट्राच्या कॉंग्रेसमध्ये नेमस्त गट व जहाल गट असे दोन गट पडले. भाऊसाहेब हिरे यांना जहाल गटाचे नेतृत्व स्वीकारले. १९५६च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर कॉंग्रेस पक्षात पुन्हा फूट पडली.

त्यावेळी मोरारजी देसाई यांनी पक्षनेता म्हणून उभे न राहता यशवंतराव चव्हाण यांनाच पक्षाचे नेतृत्व म्हणून उभे केले. यशवंतराव चव्हाण पक्षनेते म्हणून बहुमताने निवडून आले.

१ नोव्हेंबर १९५६ ला द्विभाषिक मुंबई राज्य निर्माण झाले. त्यावेळी मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी सत्ता हाती घेतली होती. १ मे१९६० रोजी महाराष्ट्र राज्याची यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली स्थापना झाली. १९४६ ते १९६० दरम्यानच्या कालखंडात यशवंतराव चव्हाण यांनी राजकीय क्षेत्रात स्वतःचा प्रभाव निर्माण केला होता. त्यांनी महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला होता. गरीब, शेतकरी माणसाला शिक्षणात मदत केली होती. ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था समर्थ करण्यासाठी त्यांनी नवा कायदा पारित केला होता. सहकारी संस्थांचा विस्तार, महाराष्ट्राच्या कृषी औद्योगिक अर्थव्यवस्थेचा त्यांनी पाया घातला. त्यामुळे महाराष्ट्राच्या नवोदित देशाच्या राजकारणातसुद्धा स्वतःचे औत्सुक्य निर्माण केली होती. स. सामान्य शेतकरी, कामकरी, कामगार लोकांना यशवंतराव विषयी आपुलकी, जिव्हाळा अधिक होता. ते सर्व सामान्यांशी आपुलकीने बोलत होते. त्यामुळे सर्व सामान्य माणसाला ते आपले वाटत होते. यशवंतरावांना आपल्या वक्तृत्व शैलीने सर्व सामान्य माणसाच्या काळजावर नाव कोरण्यात यशस्वी झाले होते.

संदर्भ ग्रंथ


- डॉ. भास्कर सरोजनी - मी पाहिलेले यशवंतराव तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.
- शुद्ध चारित्र्याचा प्रशंवत राजकारणी संपादित ग्रंथ - मी पाहिलेले यशवंतराव.

National Multidisciplinary Conference on Emerging Trends, Opportunities and Challenges in Higher Education
International Journal of Scientific Research in Science and Technology
Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# वर्तमान स्थितीत आंबेडकरी चळवळीवर सजग व सापेक्षी भूमिका घेणारा कवितासंग्रह: ''अजुनही वेळ गेली नाही'' कवयित्री पुष्पा प्रकाश बोरकर

प्रा विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद, जिल्हा यवतमाळ ४४५२०४

**प्रस्तावना —**

१९६० दशकात दलित साहित्याची निर्मिती झाली/प्रारंभ झाला. बाराव्या शतकात आधी संत चोखामेळा, कर्ममेळा, संत सोयराबाई यांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून दलित जाणिवेचा पहिला आवाज समाज व्यवस्थेविरुद्ध विद्रोही भूमिकेतून अभिव्यक्त केल्याचे इतर्गांनी जाणवते. चोखामेळ्याच्या काव्यनिर्मितीची प्रेरणा जशी अध्यात्मिक तशी सामाजिकही असल्याचे त्यांच्या अभंगांवरून लक्षात येते. हा चिंतनाचा विषय आहे. इ. स. बाराव्या–तेराव्या शतकात संत, महंत, पंथ, संप्रदाय जे काही या मातीत उदयास आलेत. व त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याचा प्रभाव जो काही भारतीय जनसामान्यांवर पडला. ते देखील महत्वाचे आहे. संत तुकारामांच्या कालखंडापर्यंत. संत परंपरेचा इतिहास लक्षात घेतला तर असे दिसून येते की, संत परंपरा विठ्ठल भक्तीच्या पुढे जाऊ शकली नाही ती परंपरा त्यातच लिन झाली. संत परंपरेने समाज व्यवस्थेविरुद्ध आंदोलन, मोर्चे, संघर्ष उभारले नाहीत. ते विठ्ठलभक्तीच्या पुढे जाऊ शकले नाहीत. त्यांना तत्वज्ञानाच्या मर्यादेपर्यंत जाता आले नाही. मानवमुक्तीच्या लढ्यापर्यंत जाता आले नाही.उतरता आले नाही. मनुष्याला मनुष्यत्व प्राप्त करून देण्यापर्यंत त्यांना जाता आले नाही.

इसवी सन पूर्व ते इसवी सन नंतर या देशाची जी सामाजिक अवस्था होती. ती चातुर्वर्ण्यावर आधारित होती. संस्कृत ही देव भाषा समजली जात होती. सामाजिक विषमतेने आपले पाय ह्या मातीत अगदी खोलपर्यंत गाडून ठेवले होते. अशा परिस्थितीत सर्वसामान्यांना मोकळा श्वास घेता येत नव्हते. माणसाचं मनुष्यत्व या कालखंडात विषमतावादी समाजव्यवस्थेतील धर्ममार्तंडांनी नाकारले होते. गौतम बुद्धाच्या कालखंडात मानवमुक्ती समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय अधिकारास समूहाला मिळावे यासाठी त्यांनी आपल्या तत्वज्ञानाच्या माध्यमातून संघर्ष केला. ह्या सर्व पार्श्वभूमीवर १९६० दशकात दलित साहित्याने पारंपरिक साहित्याला, विचारांना व त्याच्या ढोंगीपणाला मुळासकट उपटून पाडलेत.दलितांच्या वाट्याला आलेले अमानवीय जगणे इतर साहित्यातून उजागर झाले नाही किंबहुना आम्ही जे जीवन जगलो, भोगलो, आमच्यावर लादलेली अमानवीय विषमता हे साहित्यिकांनी दलित साहित्याच्या माध्यमातून मांडून मराठी भाषेला अधिक समृद्ध केले. तिला भारताच्या सीमेच्या बाहेर घेऊन गेलेत. मराठी भाषेला भाषापण प्राप्त करून देण्यात दलित साहित्यिकांचा व दलित साहित्य फार मोठा वाटा आहे.

१९६० च्या दशकात दलित साहित्याच्या ऐवजी आंबेडकरी साहित्य ही संज्ञा अनेक आंबेडकरी विचारवंतांकडून अभ्यासकांकडून व समीक्षकांकडून मान्य करण्यात आली. जो आतून आणि बाहेरून सारखा आहे, तोच आंबेडकरी, ज्याच्या साहित्याची प्रेरणा आंबेडकरी आहे, तोच आंबेडकरी, जो परमेश्वर, आत्मा, परमात्मा नाकारतो व विज्ञानवादी दृष्टिकोन अंगिकारतो. तो आंबेडकरी, सर्वसमावेशक पाहून [illegible] बाळगणारा पाहिजे. व सजग भूमिका स्विकारली पाहिजे.ही जाणीव १९६० या दशकात सर्व पातळीवर स्वीकारण्यात आली आणि आज ''आंबेडकरी संज्ञा'', ''आंबेडकरी साहित्य'' हे साहित्य क्षेत्रात स्विकारण्यात आलेत. आंबेडकरी साहित्यिक, कार्यकर्ता आभाळातून जन्म घेत नाही. तर तो आंदोलनातून. संघर्षातून. मोर्चातून जन्म घेतो. न्याय हक्कासाठी पेटून उठतो. आंबेडकरी कार्यकर्ता.. आंदोलन.. मोर्चे.. संघर्ष ही आंबेडकरी साहित्याची निर्मितीसूत्र आणि मूल्यात्मकतागर्भ आंबेडकरी साहित्याची आहेत. वेदना, विद्रोह, नकार द्वारा आंबेडकरी साहित्य निर्माण झालेत.

आंबेडकरी साहित्यात विविध कलाकृतींच्या माध्यमातून नव्या जाणिवा मांडल्या आहेत. शोषित, पीडित, उपेक्षित, अभावग्रस्ताच्या वाट्याला आलेले जगणे अथवा ह्या विषमतावादी व्यवस्थेने त्यांच्यावर लादलेले अमानवी जीवन हे तिरस्करणीय होते. व हे अमानवीय जगणे विरुद्ध

Copyright: © the author(s), publisher and licensee Technoscience Academy. This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution Non-Commercial License, which permits unrestricted non-commercial use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited



Scanned with CamScanner

आंबेडकरी माणूस आतून बाहेरून पेटून उठला. न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरला, आंदोलनात उतरला, मोर्चात उतरला त्यामुळे [illegible] आहे. संघर्ष केल्याशिवाय आपल्याला काहीच मिळू शकत नाही. आजही परिस्थिती कायम आहे. [illegible] तसा हा आंबेडकरी माणूस इथल्या विषमतावादी व्यवस्थेवर आपल्या न्याय हक्कासाठी पेटून उठतोय. म्हणून त्याचा काल आज तिरस्कार केला जातो. राजकीय अस्पृश्यता आजही कायम आहे. ह्याचा विचार होणे देखील गरजेचे आहे. पाणी संघर्ष, काळाराम मंदिर संघर्ष, तेव्हापासून तर आजही संघर्ष कायमच आहेत. अशा परिस्थितीत आंबेडकरी समाज विखुरले की काय? त्यांची मानसिक अवस्था ढासळते की काय? आंबेडकरी कार्यकर्ते संघर्षापासून वेगळा होऊ शकतो की काय? अशा अवस्थेत अजूनही वेळ गेलेली नाही हे सांगून आणि [illegible] आंबेडकरी कवयित्री आपल्या ''अजूनही वेळ गेलेली नाही'' या काव्य संग्रहातून अभिव्यक्तीचे [illegible] प्रयत्न करताना दिसते.

अन्याय अत्याचाराचे संदर्भ बदलले मात्र अन्याय कायमच आहे. माणसाला [illegible] संदर्भ बदलले आहेत. अशा परिस्थितीत आपण एकजीव, संघटित राहिले पाहिजे. हे मुख्य भूमिका ही कवयित्री घेताना दिसते. महाराष्ट्राच्या विदर्भात अमरावती जिल्ह्यातील बडनेरा रेल्वे या गावाला आंबेडकरी चळवळीची प्रचंड अशी परंपरा आहे. आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळापासून तर सध्याच्या पुष्पाताई बोरकर पर्यंत आंबेडकरी कार्यकर्त्या प्रामुख्याने आंबेडकरी [illegible] चळवळीत अग्रेसर पुढे होत्या. मोर्चे, आंदोलनात सक्रिय सहभाग त्यांचा होता. त्यामध्ये बडनेरा शहरातील [illegible] घटे, पार्वताबाई मेश्राम, (अशोक नगर, इंदिरानगर) पार्वतीबाई डोंगरे (हरिदास पेठ) पंचशील नगर मधील अंजनाबाई चव्हाण, अनुसयाबाई मेश्राम आंबेडकरी चळवळीतील नेतृत्व करणाऱ्या आंबेडकरी महिला होत्या. यापैकी आज कोणीच हयात नाहीत. मात्र ते आजही आपल्या कार्याने जिवंत आहेत. त्यानंतर आंबेडकरी चळवळीतील तिसऱ्या पिढीतील आंबेडकरी लेखिका कवयित्री मायाताई वासनिक, संघमित्राताई मेश्राम, सुजाताई वानखडे, पुष्पा बोरकर यांनी आंबेडकरी चळवळीचे नेतृत्व स्वीकारून अन्याय अत्याचाराविरुद्ध लढा उभारला, संस्कार शिबिर उभारले. त्यांनी अनेक पातळीवर संघर्ष केला. आंदोलन केले हा इतिहास आहे. आंबेडकरी चळवळीतील महिलांचा नेतृत्व आज वाढिले त्या प्रमाणात दिसत नसल्याची खंत कवयित्री पुष्पा बोरकर यांनी आपल्या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून मोठ्या प्रकर्षाने अभिव्यक्त केली आहे. आणि ते [illegible] वेळ नाही. म्हणून त्यांच्या कवितासंग्रहाचे शीर्षक आंबेडकरी चळवळीसाठी समर्पक आहे. आंबेडकरी कार्यकर्त्यांत ताकद, ऊर्जा, नवी प्रतिभा, भूमिका देण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

कवयित्री पुष्पा बोरकर ह्या सामान्य कुटुंबात जन्माला आलेल्या. बाप अडाणी असला तरी पुरोगामी विचाराचे होते. [illegible] विचाराच्या संस्कारांचा पगडा त्यांच्या वर होता/आहे. त्यांचे आई-वडील पोट भरण्यासाठी रहाटगाव तालुका नांदगाव पेठ, अमरावती येथून बडनेरा आलेत व स्थायिक झालेत. ह्याच दरम्यान डॉ. बाबासाहेबांची चळवळ परमोच्च शिखरावर पोहोचत होती. त्यामुळे प्रत्येक जण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी भारावून गेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्मात येण्याची आज्ञा केली, तेव्हा बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन आपल्या गावात परत आलेल्या अनुयायांनी आपल्या घरातील, देव्हाऱ्यातील देव-देवतांचे फोटो मूर्ती फेकून दिल्यात. माणूस म्हणून सन्मानाने जगू लागलेत. हे परिवर्तन पाहून गावातील, शहरातील धर्मांधांनी, धर्माभिमान्यांनी दलितांवर व उपेक्षित समूहावर अनन्वित असे अन्याय अत्याचार केलेत. महिलांची सरेआम अब्रू लुटली, नग्न धिंड काढली, माणसाला जिवंत जाळून पेटविले, पंचशील ध्वज उभारला म्हणून गाव, वस्त्या पेटविण्यात आल्या. गावातून बहिष्कृत केलेत, काळाराम मंदिर, चवदार तळ्याचा संघर्ष, नामांतराचा संघर्ष, या सर्व आंदोलनातून, संघर्षातून अन्याय-अत्याचार विरुद्ध बंड करून पुष्पा बोरकर यांची कविता आकार घेऊ लागली. व आज ती आपल्या समाजाला दिशा देऊ लागली. त्यांची कविता आंबेडकरी चळवळीतून, आंदोलनातून निर्माण झाली व वर्तमान स्थितीत आंबेडकरी चळवळीवर सजग व साक्षी संस्कार करण्यासाठी, येणाऱ्या पिढीवर अधिक मूल्य पूर्व-संस्कार घडविण्यासाठी व चळवळीला अधिक बळ प्राप्त करून देण्यासाठी, ऊर्जा प्रदान करताना दिसते. कवयित्री [illegible] विजया देशमुख, शारदा निरगुडे, पद्मा देशभ्रतार, नंदा कांबळे, सुधा सोमकुवर, मीरा टेंभुर्णे यांच्यासोबत नामांतर आंदोलनाची धुरा आपल्या खांद्यावर सांभाळत दिवसा कॉलेज व रात्री खेडोपाडी भेटी. नामांतराच्या आंदोलनाविषयी भूमिका मांडल्यात. अशातच त्यांच्या नेतृत्वात नामांतर वादी कृती समितीने महिला मोर्चा बडनेरा रेल्वे ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढला. अशाच आंदोलनातून त्यांच्यावर संस्कार झालेत. त्यांना मूल्यात्मकता प्राप्त झाली. वैचारिक अधिष्ठान, संस्कार व मूल्यात्मकता यामुळे त्यांची कविता अधिकाधिक सक्षम झाली. डॉ. बाबासाहेब यांचे थोर [illegible] परिवर्तन घडू लागले. ताकदीने निर्भिडपणे उभी राहिली. आंबेडकरी प्रेरणा, विचार व तत्वज्ञान यातून त्यांची कविता अधिक सजग होऊ लागली. काळाच्या पुढे चालू लागली. येणाऱ्या धोक्याविषयी भूमिका घेऊ लागली.



Scanned with CamScanner

समाजाच्या परिस्थितीला आव्हान देत असताना सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धर्मचिकित्सक होणारे बदल न स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी आंबेडकरी महिलांचे तीव्र [illegible] अशा [illegible] विरुद्ध बंडाची भाषा करतात

"वेळ अजूनही गेलेली नाही
देहाच्या काही मजा, प्रज्वलित करा
तरारी उजळेल भीषण युद्धाची
इतिहासाचे संदर्भ बदलून टाकण्यासाठी
माझ्या पुत्राचा.. रक्त द्यायला नायक होऊन"

**बाबा –**

"सदरा गाठीच्या खिशातील मळकटला
जपणारी काळजीनं
अन् भांडीदार जीवन भागत आयुष्य"
"तू खूप शोषल्या मातला तरीही
थोडला नाही तुझा कधारी बाणा
भाग लक्ष्मणावर पेटून लढलास
शेवटच्या श्वासापर्यंत
आणि झालास समाजाचा शिल्पकार"

कविता पाहिल्या की असे लक्षात येते आंबेडकरी तत्त्व शिक्षा व आंबेडकरवादी मूल्य, जीवन मूल्य, जीवननिष्ठा तत्त्विकदृष्टया कवितेच्या माध्यमातून त्यांनी मांडली आहेत. आंबेडकरवादी कार्यकर्ते आंदोलन व साहित्य असा हा आंबेडकरी शक्तीच्या प्रवास रचना आहे. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक उलथापालथ करणारी प्रचंड क्षमता व परिवर्तन घडवून आणणारा दुर्दम्य आशावाद कवयित्री पुष्पा बोरकर कवितेच्या माध्यमातून अधोरेखित करताना दिसतात.

हिंदू तथा वैदिक, सनातनी धर्ममार्तंडांनी हजारो वर्षांपासून अस्पृश्य, शोषित, उपेक्षित मानवाचे मनुष्यत्व नाकारले होते. अशावेळी स्त्रीला मंदिर प्रवेश नाकारल्या जात असेल तर भारतातील तमाम महिलांनी जो धर्म स्त्रियांना असमानता, मूल्यात्मकता नाकारतो. तेव्हा या देशातील महिलांनी देखील आपल्या जीवनाने धर्माला लाथ मारली पाहिजे. कारण पुनर्रुपांतरित न होण्याकरिता या मानसिक अवस्थेतून भारतीय महिला आज बाहेर पडणे अत्यंत गरजेचे आहे

"दामिनी" या कवितेतून आंबेडकरी महिलांमध्ये स्त्रियांच्या संघर्षाची भूमिका त्यांनी घेतली आहे. उच्चभ्रू मानसिकता आंबेडकरी महिलांच्या संदर्भात कोणत्या पातळीवर पाहते पक्षे तर पसरत आहे. विलक्षण ताकदीने आंबेडकरी महिला दुर्दम्य आशावाद डोळ्यात साठवून त्यांची कविता संघर्षाची भाषा तर करतेच पण त्याच वेळेस तिला बाबासाहेबांचे चारित्र्य, शील, प्रज्ञा आपण सांभाळली पाहिजे हे मूल्यात्मक तत्वज्ञान स्वीकारते.

तरीही
जीन मुठीत घेऊन कण्हारली
दामिनी सारखी
तुझी श्रीमंती ऐश्वर्य माल मुळीच
माझ्या कष्टाची भाकर
इज्जतीने जगते
कोणत्या मापाने तोलतोस..?
एवढे मात्र सांग–
आता घेणार मुक्त श्वास

बंडाचे बिगुल फुंकत

माणूस म्हणून जगण्यासाठी–

**आरोप**

उद्रेकाच्या ज्वालातून

बाहेर पडलोत आता

क्रांती सूर्याच्या तेजात न्हाली आकाश

इमान खाणाऱ्या अंदाज चुकेल एकदाचा

पण साहेब–

मेंदूचा अंदाज घेतलाय कधीचाच

भीती कसलीच वाटत नाही

आता फक्त अंधाराला चिरत जायचे आहे

नवा आशावाद कवितेतून मांडला आहे एकंदरीत त्यांनी आपल्या कविता संग्रहातून वर्तमान स्थितीत आंबेडकरी चळवळीवर साक्षेपी भूमिका स्वीकारत येणाऱ्या काळाचा वेध घेत असताना येणाऱ्या पिढीसाठी सृजनात्मक विचार कवितेच्या माध्यमातून दिला आहे. बाबासाहेबांनी निर्माण केलेली अस्मिते पुढे या देशातील अभावग्रस्त समूहाच्या जीवनात जे अमूलाग्र परिवर्तन झाला. हे केवळ बाबासाहेबांमुळेच काल जे आम्हा विटाळ समजायचे, अस्पृश्य म्हणून बहिष्कृत करायचे, तेच आता आरक्षणाची भाषा करताना दिसतात आरक्षणासाठी पिक्चर सारखे मोर्चे काढणारे समूह, आता आपलेच लोक त्यांची भूमिका स्वीकारताना, लढताना दिसतात. हे जरी वरवर चांगले वाटत असले तरी येणाऱ्या काळात आपलेच आरक्षण धोक्यात येते की, काय यासाठी आंबेडकरी कार्यकर्त्यांनी सजग राहून वर्तमान स्थितीत भविष्यात येणाऱ्या वादळ मागे प्रतिघात करण्यासाठी साक्षेपी भूमिका स्वीकारण्याची वेळ आली आहे. अजूनही वेळ गेलेली नाही, आपण संघटित राहून येणाऱ्या काळातील अन्याय अत्याचार विरुद्ध लढण्याची भाषा त्यांची कविता करताना दिसते, संघटित राहण्यासाठी आपले राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, भान आहे. हे जर आपण विसरून गेलो तर येणारी पिढी आपल्याला कधीही माफ करणार नाही. येणाऱ्या पिढीच्या उत्थानासाठी, त्यांच्यावर संस्कार करण्यासाठी आपण दिशादर्शक ठरली पाहिजे हा आशावाद त्यांच्या कवितेतून दिसतो आहे अजूनही वेळ गेली नाही. या कवितासंग्रहात एकूण ५८ कविता असून चळवळीत आंबेडकरी अभ्यासक इ.मो. नारनवरे यांची प्रस्तावना आहे. दिगंबर झाडे यांचे मुखपृष्ठ व रेखाटने आहेत. विलास थोरात, प्रभा प्रकाशन अमरावती, यांनी १४ जानेवारी २०२१ नामांतर वर्धापन दिन पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कवितासंग्रह येणाऱ्या पिढीसाठी व वर्तमान स्थितीत पिढीसाठी फार महत्त्वपूर्ण आहे. आंबेडकरी चळवळीचा दस्तऐवज आहे. आपली आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी फार महत्त्वपूर्ण विचार कवितेच्या माध्यमातून कवयित्री पुष्पा बोरकर यांनी घेतली आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१. डॉ.आंबेडकर बाबासाहेब : शूद्र पूर्वी कोण होते

२. डॉ. आंबेडकर बाबासाहेब: अस्पृश्य मूळचे कोण

३. डॉ. आंबेडकर बाबासाहेब: जाती निर्मूलन

४. फडके भालचंद्र: दलित साहित्य वेदना व विद्रोह

५. डॉ. सबनीस श्रीपाल : आंबेडकरवादी कवितेचा नवागम

६. डॉ. खोब्रागडे सुरेश : आंबेडकरी कविता आस्वाद आणि मीमांसा

७. ढोले सतीश : आंबेडकरवादी कविता आकलन व अर्थमीमांसा

८. डॉ. कांबळे ऋषिकेश दलित कविता आणि अमेरिकन ब्लॅक पोएट्री

९. डॉ. मोरे सतीशचंद्र प्रस्तावना निळपंख कविता संग्रह

१०. डॉ. मोरे सतीशचंद्र प्रस्तावना समसंधान कवितासंग्रह




Scanned with CamScanner

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

FEBRUARY 2023

(CCCLXXXVIII ) 390

## New Directions in Humanities




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr. Pradnya S. Yenkar
Principal,
Vidya Bharati Mahavidyalaya,
Camp, Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 21 | A study of Coping Strategies of Frontline and Non-Frontline workers<br>**Dr. S.D. Wakode ,Vanita Sachin Raut** | 76 |
| 22 | Impact of Residence and Gender on Cognitive Emotion Regulation Strategies<br>**PravinkumarA.Mohod , Dr.ShafiqYusufkhan Pathan** | 80 |
| 23 | मध्ययुगीन मराठी गद्य साहित्यातील संवाद शैलीचे स्वरूप डॉ. अण्णा वैद्य | 87 |
| 24 | जनसाहित्य संशोधन पद्धती डॉ. दिनेश की. राऊत | 91 |
| 25 | मराठी समकालिन साहित्य विचारातील नवे प्रवाह<br>प्रा विक्रांत कृष्णराव मेश्राम | 94 |
| 26 | कोरोनोत्तर शैक्षणिक स्थिती प्रा.डॉ.गजानन रामचंद्र लोहवे | 98 |
| 27 | पारधी समाजाची संस्कृती आणि पारधी स्त्रियांची स्थितिगती<br>कु.सारिका विष्णुपंत वनवे | 101 |
| 28 | भारतीय संविधानातील कलम 21 अंतर्गत आरोग्याचा अधिकार : एक विश्लेषण<br>डॉ. विजय रा. डेंगळे | 105 |
| 29 | 'भारतीय स्त्रीयांचे दृष्टीने मानवतावादी स्थान एक अभ्यास'<br>प्रा. डॉ. टि. डी. राजगुरे | 112 |
| 30 | मानव्य विज्ञानातील नवी दिशा संदीप महादेवराव हाडोळे | 115 |
| 31 | आंबेडकरी गेय कवितेतील मूल्यदर्शन प्रा.डॉ. संजय शेजव | 118 |
| 32 | दलित आत्मकथनातील स्त्री-पुरुष संबंध **डॉ. गजानन बनसोड** | 128 |
| 33 | समकालीन लेखिकेच्या कादंबरीतील स्त्री नायिका आणि जीवनचित्रण (मेघना पेठे, कविता महाजन,अरुणा सबाने)<br>तोषणा बी.बोंदाडे (मोकडे) , प्रा.डॉ. गजानन बनसोड | 131 |
| 34 | संसर्गजन्य रोगामुळे मानसिकतेवर परिणाम होऊन जीवनशैली विस्कळीत – एक विश्लेषण<br>प्रा. ए. एम. वानखडे | 134 |
| 35 | राष्ट्रसंतांनी मांडलेला मानवतावादी विचार एक चिकित्सक अभ्यास<br>प्रा. अनुप अरुण नांदगावकर | 136 |




Scanned with CamScanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO-390-A
2278-9308
February, 2023

# मराठी समकालिन साहित्य विचारातील नवे प्रवाह

प्रा विक्रांत कृष्णराव मेश्राम
(मराठी विभाग प्रमुख) श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद, जिल्हा यवतमाळ ४४५२०४ (म.रा.), ईमेल – vikrantmeshram1976@gmail.com, मो. – 9403405490

आंबेडकरी कविता पार्श्वभूमी

स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेमध्ये आंबेडकरी कविंच्या कवितांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीकारी विचाराचा प्रभाव दलित स्त्री–पुरुषांवर पडून हा समाज परंपरेकडून परिवर्तनाकडे वळला. आंबेडकरी झंझावाताने दलितांना आमुलाग्र बदलवून सोडले आणि त्याचे साद–प्रतिसाद साहित्यातूनह उठले. 1956 च्या धर्मांतरच्या चवळवळीनंतर निर्माण झालेले दलितांचे साहित्य हा आंबेडकरी विचारा परिपाक होय. परंपरागत विचारसरणीला फाटा देऊन नव्या मार्गाने, नव्या मानसिकतेने वाटचाल आरंभीली ही या वाटचालीमधनूच आंबेडकरी कवितेची एक संपन्न परपरा, मराठी कवितेमध्ये पुढे आली. नामदेव ढसळ, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, गंगाधर पाणतावने दया पवार, हिरा बनसोडे, अर्जुन डांगळे, वामन निंबाळकर या नंतरच्या पिढीनंतर शिवा इंगाले, बी. रंगराव, आत्माराम कनिराम राठोड, धर्मराज निमसरकर, दामोदर मोरे, लोकनाथ यशवंत व अलिकडे प्रज्ञा पवार, अरुण काळे, मयाताई वासनिक, रोहन नागदिवे, प्रभाकर गभिर, नंदा तायवाडे, सतेश्वर मोरे, अशोक पळवेकर, सुदाम सोनुले, अजय खडसे, संजय घरडे, गजानन बनसोड, भूषण रामटेके, भाष्कर पाटील, अशोक इंगळे, सुनिल अभिमान अवचार यांच्या सोबत यवतमाळ परिसरातील शशी मुनेश्वर, महेंद्र भवरे, मंगेश बनसोड, आनंद गायकवाड, सागर जाधव, लक्ष्मीकांत घुमे, बळी खैरे, हेमंत कुमार कांबळे, किरण मडावी, रमेश बुरबुरे, विनोद बुरबुरे, विलास भवरे, महेश हंबर्डे, रवि चापके, पी. डी. आत्राम, सुनिल कांबळे, महादेव कांबळे, शांतरक्षित गावंडे, मनिषा कांबळे, अनिल काळबांडे, प्रकाश खरतडे, सुनंदा गायकवाड गीत घोष, प्रभू राजगडकर, मारोतराव जाधव, योगानंद टेंभर्णे, पुष्पा मस्के, केतन निकणापुरे, मिलिंद तामगाडगे, वैशाली तेलंग, प्रशिक पाझारे, नाना बनसोड, गोविंद बनसोड, ह. सु. भगत, सिद्धार्थ भगत, वनमाला भालेराव, अशोक राऊत, सुरेश धनवे, वाल्मिक शेडमाके, माधव सरकुंडे, अनिता कांबळे, अनिल कासे, विकास कांबळे, प्रा. अशोक कांबळे, अविनाश खरतडे, सागर गावंडे, प्रतिभा गेडाम, चंद्रबोधी पायवाटे, भास्कर चव्हाण, नितीन जरंडे, रमेश मेश्राम, सुमेध भगत, प्रदिप भगत, देविदास भगत, किरण मडावी, तुकाराम संजय मुन, जनार्दन मोहिते, भारत लढे, गजानन लोहवे, सुनिल वासनिक, अविनाश शेंडे, श्रावन सोनोने, संभाजी हेमके, केतन पिंपळापूरे.

निर्मिती मागची कारणे

क्रांतिबा आणि बाबासाहेब यांनी या समाजाला दिलेला परिवर्तनाचा विचार जनसामान्यांमध्ये प्रक्षेपित करुन प्रामुख्याने समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय आणि वैज्ञानिकता या पंचसुत्राचा प्रचार–प्रसार आणि प्रबोधन करणे या हेतूने या कविनी कवितेची निर्मिती केली. जाती–धर्म–वर्ण आणि समाज शिक्षण राजकारण, अधश्रद्धा, विषमता, निरक्षरता आणि दारिद्रयता–लाचारी–उपासमारी अशा विविध प्रथा परंपरामधून होणारे शोषण आणि सामाजिक चळवळीच्या परिवर्तनाने मानवी मनामध्ये उभा केलेला स्वाभिमान आणि आत्मसम्मान अशा विविध विषयाचा समृद्ध आशय या कविंचय कवितांमधून प्रस्फुटीत होतांना दिसते.

आंबेडकरी प्रेरणा

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मराठी साहित्यात प्रामुख्याने दर्शन घडते ते नव्या संवेदनशिलतेचे प्रत्येक कालखंडाची एक विशिष्ट संवेदनशिलता असते. त्या त्या कालखंडाच्या संवेदनाला त्या कालखंडातील साहित्य अधोरेखित करीत असते. आंबेडकरी साहित्यातुन व्यक्त होणारा अनुभव हा मुल्यवान अनुभव आहे. त्या अनुभवाची आदी प्रेरणा आहे. आजच्या पारंपारिक मराठी सारस्वत साहित्यामध्ये आंबेडकरी साहित्याला विशेष महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. आंबेडकरी साहित्याचीप प्रेरणा मानवमुक्तीचे उदगाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. आंबेडकरी साहित्य व साहित्यिक हे आंदोलनातून उदयास आले आहेत. आंबेडकरी आंदोलनातून निर्माण झाले आहेत.



Scanned with CamScanner

1960 च्या दशकात निर्मिती

खऱ्या अर्थाने 1960 च्या दशकात आंबेडकरी साहित्य निर्माण झाले. साहित्यातील एक नवे प्रवाह असा प्रवाह ज्या प्रवाहात हजारो वर्षापासून जुनाट कुजलेली रुढी परंपरा देव, धर्म, आत्म..परमात्मा आंबेडकरी साहित्याने नाकारले ज्यांनी आंबेडकर आतून-बाहेरुन स्विकारले ते आंबेडकरी व त्यांनी निर्माण केलेले साहित्य हे आंबेडकरी साहित्य.

1960 च्या दशकात अनेक साहित्य प्रवाह निर्माण झालेत. आंबेडकरी साहित्य, मुस्लीम, आदिवासी, स्त्रीवादी, मराठा, मराठी, बंजारा, माळी असे अनेक साहित्य प्रवाहचा दृष्टीकोनातून महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यातील आंबेडकरी कविच्या कवितांचा आशय अभिव्यक्तीच्या पातळीवर चिंतन करणे मला महत्वाचे वाटते.

साहित्यिकांना उद्देशुन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचे आहे की, उदात्त जीवन मुल्ये व सांस्कृतिक मूल्य या आपल्या साहित्य प्रकारातून अविष्कार करा. आपले लक्ष आकुंचित मर्यादित ठेवू नका ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरतीच बंदिस्त नका तिचे तेज खेड्यापाड्यातील अंधार दूर होईल असे प्रवर्तित करा. आपल्या देशात उपेक्षितांचे, दलितांचे फार मोठे जग आहे. हे विसरु नका. त्यांचे दुःख, त्यांची व्यथा नीट समजून घ्या आणि आपल्या साहित्याव्दारे त्यांचे जीवन उन्नत करण्यात झटा त्यातच खरी मानवता आहे."

आशय आणि अभिव्यक्ती

आंबेडकरी साहित्यामध्ये सर्वात महत्वाचा प्रकार या अनुषंगाने आंबेडकरी कवितेकडे पाहिले जाते. 1960 नंतर ही कविता खऱ्या अर्थाने पुढे आली. आज आंबेडकरी कविता एका वेगळ्या वळणावर येऊन पोहोचली आहे. आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीकोनातून देखिल महत्वपूर्ण आहे.

संकल्पना

आंबेडकरी कार्यकर्ता.. आंदोलन.. साहित्य या दृष्टीने या साहित्याकडे मी पाहतो. ह्या कवितेला आधुनिक आशयाचे विविध पदर लगडलेले आहेत. ह्या कवितेने ज्याप्रकारे आधुनिक आशयाची आणि अभिव्यक्तीची मांडणी केली आहे त्याप्रकारे इतर कोणत्याही साहित्य प्रकाराने अथवा साहित्य प्रवाहाने आशय व अभिव्यक्तीची उदात्त मांडणी केलेली दिसुन येत नाही. आजची आंबेडकरी जाणीवेची कविता आशय संपन्न स्वरुपाची आहे. आशयासोबतच अभिव्यक्तीतील देखील ही कविता तोलून धरण्याचा प्रयत्न करते. या संदर्भात काही कविता सादर करतो.

21 व्या शतकाच्या उंबरठ्यावर
आकोळलेला कातरवेळी
माणसांची बंदिस्त पोकळी उकरतो आहे
एकविसावे शतकच माणसाला पोखरते आहे
माणसांची वाचा बसेल प्रेतं बोलू लागतील
इमानदार कुत्रे माणसं होतील
माणसं भुंकू लागतील
माणुसकीची झर आता आटू लागले आहे
चिरंतन यातनांच्या थिरकत्या डहाळीवर
गलबलून पडलाय पाखरांचा श्वास
(महिंद्र भवरे)

व्यवस्था परिवर्तनाच्या कार्यासाठी
एकत्र आलेले कार्यकर्ते
नेतृत्वाच्या मुद्यावर हमरीतुमरीवर आले
लाथा बुक्यावर आले
अन सवळीचा मिठू पडला
(प्रशांत बंजारी – सरसंधान)

दगडात ताकद कितीरे दगडापुढे माणसंही झुकतात
मी दगड उचलला
आणि अख्खे शहर चिडिचूप बंद झाले



Scanned with CamScanner

(आनंद गायकवाड: आखरीच तुव्हच सडान चिबवीन)
बारुद पेरली अन बत्ती धरुन हाती
मी वाट पाहतो की होतो कधी इशारा
(सिद्धार्थ भगत – आणि पुन्हा एकदा युध्द हसावा म्हणुन)
कावरा बावरा होऊन
मोर्चावरुन परत यायचो घरी
घामेजलेला चेहरा, विस्कटलेले केस
धापणारी छाती, लालबुंद डोळे
मायला विचारायचो मी कसा दिसतो
माय म्हणायची चुलितला इसो
(आनंद गायकवाड – इसो)
तमाम मानवतावादी माणसातल्या माणसांनो
माझी आई सांगत होती
मी तिच्या पोटात होतो
तेव्हापासून माझ्या घरी भाकरीसाठी तमाशे होत होते
आणि घरातले सारेच जण

भाकरीचे तुकडे मागुन खात होते
एकदिवस मी
एका पोस्टरजवळ उभा होतो
पोस्टर मधला पोरगा भाकरीला
पोटाशी धरुन उभा होता
आणि त्याच पोस्टरवरचा दुसरा इसम
त्याच्याकडे पिस्तुल रोखुन उभा होता
(लक्ष्मीकांत धुमे – भूक आणि भाकर)
कुत्री लाचार बनून विकताहेत
आपले इमान...
उभारताहेत स्वागत दारांवर
आपली गोंडस कमान
माणसे फसतात
आपली आपणच आपसुक
शेपटी नसल्यामुळे
ज्यांनी इमान जागुन
लेणी रक्तरंजीत
उभारलीत
त्याना इथे छिन्नी हातोडा विकुन
आपले ठसे शोधावे लागतात
वणवण...
होत नाही त्यांच्या फिंगर प्रिंटचे ॲनालॅसिस !
(शशी मुनेश्वर – फिंगरप्रिंट्स)

यवतमाळ जिल्ह्यातील आंबेडकरी कविता

महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याच्या तुलनेत यवतमाळ जिल्ह्यात आंबेडकरी प्रकाशित कविता संग्रह अधिक आहे. आत्तापर्यंत 65 कवितासंग्रह प्रकाशित झाले आहे. आणि अप्रकाशीत त्याही पेक्षा अधिक प्रमाणात आहेत.

आंबेडकरी साहित्यतिक उत्तम कांबळे, "आंबेडकरी विचार असा आहे की, तो बंदिस्त करता येत नाही. तो खळखळून वाहत असतो. आंबेडकरवादात पोथिनिष्ठेला महत्व नाही. तुमचं जे काही क्रांतिकारी तत्वज्ञान आहे. ते संपविण्याचा प्रयत्न इथली व्यवस्था करीत आहे; कारण तिला माहित आहे की

तत्वज्ञानानं समाज बदलतं, तत्वज्ञानाने नवा माणुस, नवा समाज घडविते जुनी व्यवस्था बदलून टाकते. मग ही संपविण्याचा प्रयत्न शोषक व्यवस्था करत असते. तत्वज्ञानाच्या जागी वस्तूची प्रतिष्ठापना करते. आता वस्तूचं जग झालेलं आहे. माणसाच्या जीवनामुळे वस्तूला जेवढी किंमत आलेली आहे. जेवढी प्रतिष्ठा आहे तेवढी या पूर्वीच्या काळामध्ये कधीही नव्हती. मित्रांनो! आता वस्तू मोठी मोठी व्हायला लागली. आणि माणुस छोटा–छोटा व्हायला लागला आहे. एक दिवस वस्तूची सावली इतकी वाढेल, इतकी वाढेल की, माणसालाच स्वतःची सावली गमवावी लागेल. असे होता कामा नये अशा वेळी आंबेडकरी विचारवंत, कवी, लेखक वस्तूपासून माणसाला दूर करत असतो. माणूस माणसाच्या ठिकाणी व वस्तू वस्तूच्या ठिकाणी ठेवत असतो.

आनंद गायकवाड' आंबेडकरी साहित्याने प्रस्थापित मराठी साहित्याला नकार देऊन स्वतःचे साहित्य विश्व निर्माण करुन हाच मुख्य प्रवाह अशा विश्वास निर्माण केला.

"प्रा. सतेश्वर मोरे" आंबेडकरी साहित्याला भाषेच्या, प्रातांच्या आणि देशसीमांच्या मर्यादा नाहीत. किंबहूना यादेशातल्याच नव्हे तर जगतल्या कोणत्याही देशात आंबेडकरी प्रेरणेने लिहणारा लेखक हा आमचा नातवाईक आहे. असेच आम्ही मानतो आणि त्यांचेशी आमचे वाङ्‌मयीन बंधुतेचे नाते सांगतो. शोषणाचा ६ गुलामीचा संदर्भ ज्या साहित्याला असेल आणि त्यातून मुक्तिची जाणीव आंबेडकरी प्रेरणेने त्याला झाली असेल, असे जगातले कोणतेही साहित्य हे "आंबेडकरी साहित्य आहे. यावर आमचा विश्वास आहे."

याच अनुषंगाने आंबेडकरी साहित्य नव्वदचच्या दशकात मान्य करण्यात आली. आता आंबेडकरी साहित्य बाबुराव बागुलांनी ज्याला आंबेडकराईट लिटरेचर म्हटले त्याचे हे मराठी रुप आहे. डॉ. प्रतिमा अहिरे – अध्यक्षीय भाषण पाचवे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन अकोला "विज्ञानवाद, बुध्दीवाद, निरिश्वरवाद, शोषीतांच्या दास्यमुक्तिचे हत्यार म्हणजे आंबेडकरवाद."

संदर्भ ग्रंथ

1. डॉ.आंबेडकर बाबासाहेब :शूद्र पूर्वी कोण होते
2. डॉ. आंबेडकर बाबासाहेबः अस्पृश्य मूळचे कोण
3. डॉ. आंबेडकर बाबासाहेबः जाती निर्मूलन
4. फडके भालचंद्रः दलित साहित्य वेदना व विद्रोह
5. डॉ. सबनीस श्रीपाल : आंबेडकरवादी कवितेचा नवागंध
6. डॉ. खोब्रागडे सुरेश : आंबेडकरी कविता आस्वाद आणि मीमांसा
7. ढोले संदेश : आंबेडकरवादी कविता आकलन व अर्थमीमांसा
8. डॉ. कांबळे ऋषिकेश :दलित कविता आणि अमेरिकन ब्लॅक पोएट्री
9. डॉ. मोरे सतेश्वरय प्रस्तावना निलपंख कविता संग्रह
10. डॉ. मोरे सतेश्वर प्रस्तावना सरसंधान कवितासंग्रह
11. कांबळे उत्तमः आंबेडकरी साहित्य डॉ.ऑम्व्हेट गेलः जोतिबा फुले आणि स्त्री मुक्ती विचार



Scanned with CamScanner

MAH/NAN/10936/2015
ISSN :2454-7905
SJF 2023 Impact Factor : 8.024

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal




(A Peer Reviewed) Vol. 2- ISSUE- LXXVI, 11 Feb 2023

## साहित्य समीक्षा व मराठी साहित्य

संपादक - प्रा. डॉ. प्रशांत भंडे

Scanned with CamScanner

ISSN 2454 – 7905 SJIF Impact Factor 2023 : 8.024
Worldwide International Inter Disciplinary Research Journal
A Peer Reviewed Referred Journal (Quarterly Research Journal)
Vol. II - ISSUE – LXXVI, Feb. 2023

जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान, भोपणी द्वारा संचलित
कै. रसिका महाविद्यालय, देवणी जि. लातूर
व
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

एकदिवसीय राष्ट्रीय परिषद ( दि. ११-०२-२०२३, बार : शनिवार )



# साहित्य समीक्षा व मराठी साहित्य

संपादक
प्रा. डॉ. प्रशांत भंडे;
(मराठी विभागप्रमुख)

**Research Journal Chief :** Mrs. Pallavi Laxman Shete
Principal, Sanskrti Public School, Nanded.(MH. India)Email:Shrishprakashan2009@gmil.com
**Director :** Mr. Tejas Rampurkar
(For International contact only +91-8857894082)
Address for Correspondence :House No.624 - Belanagar, Near Maruti Temple,Taroda (KH), Nanded – 431605(India –M.S.)
**Email:**Shrishprakashan2009@gmil.com Website: www.wiidrj.com

Scanned with CamScanner

२९. निबद्धक बाल कवितेची समीक्षा - प्रा.सदाशिव गंगाधर थुकेवाड १२२

३०. अंधश्रध्दा निर्मूलनार्थ संताचे कार्य - डॉ. शिवाजी परळे १२७

३१. 'जी.ए. कथा वाङ्मयीन दृष्टीक्षेप' : आकलन आणि विश्लेषण
- सौ. सागर गोविंदराव पांचाळ १३०

३२. कथा वाङमय प्रकार : अण्णाभाऊंच्या कथा - दगडूबा कोंडिबा मायाडे १३२

३३. एका पराभूत नायकाची कहाणी - 'कोसला' - प्रा. वंदना शामराव खोराटे १३६

३४. धर्मराज माहूलकर यांची बालकादंबरी : एक अभ्यास - डॉ. विनोद सिनकर, सहशिक्षक १४१

३५. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणारी कादंबरी : फेसाटी - प्रा. रश्मी दहापुते १४५

३६. अनुवादित कादंबरी 'साक्षीदार' : एक समाजशास्त्रीय समीक्षा विचार
- किशोर बाबुराव भगत १४८

३७. आशा बगे यांच्या कादंबऱ्यांमधून आलेले स्त्रीचे एकाकीपण
- प्रा. डॉ. ज्ञानेश्वर जि. भाऊ सोनवणे १५२

३८. 'गणगोत' कादंबरी एक दृष्टिक्षेप - प्रा. डॉ. अनिता काशीनाथ सोनवणे १५६

३९. 'चरित्र' या वाङ्मय प्रकारातील कलाकृतीची समीक्षा - प्रा. इंद्रायणी ज्ञानेश्वर सैंदाणे १५९

४०. वि. द. घाटे यांच्या आत्मचरित्राचे आशयनिष्ठ विवेचन - डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे १६३

४१. पत्रकार दत्ता सराफ यांच्या 'ऐवज' आत्मचरित्राचे आकलन
- श्री. निलेश भाऊसाहेब वाकचौरे १६६

४२. 'पार्वती एक मातृत्वधर्म' एक प्रेरणादायी आत्मकथन... - प्रा. डॉ. संदीप वाकडे १७०

४३. कलावंताचे स्वातंत्र्य : विशेष संदर्भ 'फ्रॅक्चर्ड फ्रीडम' - डॉ. काळे वी. एम. १७३

४४. सत्यशोधकीय नाटके आणि स्त्रीसमस्यांचे चित्रण - श्रीमती दैवशाला रावसाहेब हाक्के १७६

४५. आजच्या तरुणाईच्या नात्यातील गुंता : 'सिगारेट्स'च्या अनुषंगाने
- विजया नारायण ठाकूर १८०

४६. मराठी नाटकाची स्थिती गती : एक अभ्यास - प्रा. कांबळे डी. आर १८३

४७. मराठी नाटकातील जयंत पवार यांचे स्थान - डॉ. पांडुरंग गावडे १८६

४८. नटसम्राट : एक शोकांतिका - प्रा. प्रमोद दत्तात्रय शेटे १८९

४९. सत्यशोधक व्यंकटराव गोडे यांचे साप्ता. 'ब्राम्हणेतर' मधील अग्रलेख :
संपादित ग्रंथाची समीक्षा - प्रा. प्रीतम वसंतराव गावंडे १९२

५०. 'प्रश्नांची मातृभाषा' : मानवाच्या जीवनसंघर्षाचा सजग होकायंत्रच
- प्रा. विक्रांत कृष्णाराव मेश्राम १९६




Scanned with CamScanner

# ७०. 'प्रश्नांची मातृभाषा' : मानवाच्या जीवनसंघर्षाचा सजग होकायंत्र.

प्रा. विक्रांत कृष्णाराव मेश्राम,
मराठी विभाग प्रमुख,
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद, जि. यवतमाळ.

युवराज सोनटक्के लिखित 'प्रश्नांची मातृभाषा' या कवितासंग्रहावर विविध अभ्यासकांनी तत्त्वचिंतकांनी समीक्षात्मक, विश्लेषणात्मक भाष्य केलेत. त्यामध्ये महत्त्वाचे आंबेडकरी अभ्यासक तत्त्वचिंतक ज्यांच्या मायेच्या सावलीत अनेक लहान लहान अंकुरांनी विशाल वृक्षाचे रूप धारण केलेत. अनेक वेलींना आपल्या अंग खांद्यावर खेळवलं... गोंजारलं.. मायेच्या प्रेमाने संवर्धन केले.

इसवी सन १९६० च्या दशकात दलित साहित्याचा प्रारंभ झाला. आपल्या जीवनसृष्टीचे रचनाकार महामानव मानव मुक्तीचे उद्‌गाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्याची प्रेरणा व आदर्श दलित साहित्यातून अस्पृश्य बांधवांनी हजारो वर्षांपासून होणाऱ्या अन्याय.. अत्याचार.. शोषणावर बंड पुकारले, संघर्ष केलेत/आजही; दलित साहित्याने मराठी साहित्याला नवा चेहरा बहाल केला. साता समुद्रा पलीकडे घेऊन गेला. दलित साहित्याने मराठी साहित्यातला जीवन जगण्याची नवी उमेद दिली.

आंबेडकरी साहित्यामुळे मराठी साहित्याला महत्त्व प्राप्त झाले, हे नाकारता येत नाही. दलित कार्यकर्ता.. दलित चळवळ.. दलित साहित्य ..नकार वेदना.. विद्रोह हे आंदोलनाचे ..संघर्षाचे चळवळीचे सूत्र स्वीकारून शोषणाविरुद्ध दलित कार्यकर्ता साहित्याच्या माध्यमातून व प्रत्यक्षात देखील रस्त्यावर आंदोलनात तटस्थपणे होता. दलित साहित्याने ज्या अस्पृश्य शोषित. पीडित साहित्यिकांना चेहरा दिला. पुढे त्याच साहित्यकांनी आपल्या स्वाभिमानासाठी जाती, धर्मांच्या नावाखाली वेगवेगळी संमेलने, विचारमंच तयार केलेत. स्वतःला मिरवलेत. 'जो आंबेडकर स्वीकारतो आणि आंबेडकर आपल्या विचारातून प्रस्फुटीत करतो तो आंबेडकरी' मात्र जो आंबेडकराबरोबर इतरांना स्वीकारतो व जाती धर्मांच्या नावाखाली जीवन राहण्यासाठी सातत्याने धडपडतो. अशा ढोंगी बुजगावण्यांपासून आंबेडकरी पिढीने सजग राहिले पाहिजे. ती सजगता टेवता आली पाहिजे, हे खऱ्या अर्थाने आंबेडकरी साहित्याचे, भाष्य करायचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. 'जे बापाला बाप म्हणून स्वीकारतो व तीच भूमिका घेऊन जगतो तो खरा आंबेडकरवादी' मात्र जे स्वतःच्या स्वार्थासाठी बाप बदलविण्याची लवचिकतावादी भूमिका स्वीकारतात अशा लवचिकतावादी लोकांपासून येणाऱ्या पिढीला सावध व सजग राहता आले पाहिजे या भूमिकेतून

प्रा. केशव मेश्राम, डॉ. यशवंत मनोहर, उत्तम कांबळे, बाबुराव बागुल, सजेराव मोरे इत्यादींनी दलित साहित्याच्या ऐवजी आपण आंबेडकरी संज्ञा स्वीकारली पाहिजे. ही महत्त्वपूर्ण भूमिका स्वीकारून त्या भूमिकेशी एकनिष्ठ राहून साहित्य संमेलनाच्या माध्यमातून चळवळ उभी केली. आपल्या सर्वांचा बाप एक आहे; तो आपण आतून आणि बाहेरून स्वीकारला पाहिजे. जो आंबेडकर आतून आणि बाहेरून स्वीकारतो तो आंबेडकरवादी याच भूमिकेतून आंबेडकरी साहित्य संज्ञा १९६० च्या दशकापासून प्रचलित आली आणि या जाणिवेतून, भूमिकेतून निर्माण झालेले साहित्य आंबेडकर साहित्य होय .

'जो परमेश्वर नाकारतो, धर्म नाकारतो व मानवाला केंद्रबिंदू ठेवतो तो खरा आंबेडकरवादी' जो धर्म स्वीकारतो, परमेश्वर स्वीकारतो, जुन्या रुढी परंपरेला शरण जातो अशा दलितांपासून आंबेडकरी साहित्याने आंबेडकरी भूमिका स्वीकारणाऱ्याने सजग राहिले पाहिजे.

कवी युवराज सोनटक्के यांच्या 'प्रश्नांची मातृभाषा' या आशयनिष्ठ कवितासंग्रह एक जानेवारी दोनहजार बावीस ला प्रकाशित झाले. याचा अर्थ या कविता संग्रहातील कविता दोन-तीन दशकाच्या अगोदरचे आहेत. खऱ्या अर्थाने मार्च २०२० पासून कोरोना महामारीचा प्रादुर्भाव तीव्र गतीने जाणवायला लागला. गाव.. शहरे.. वस्त्या.. झोपडपट्ट्या.. नगरे ..चौक.. फुटपाथ.. घरे-दारे एका भयाच स्थिती श्वास घेत होता. प्रत्येक मानव मृत्यूच्या उंबरठ्यावर उभा होता. जीवन राहण्याची इच्छाशक्ती हरून बसला होता. नको तितक्या भीती मध्ये जगत असताना इंटरनेट क्षेत्रातील कोणतेही माध्यम उघडले की, आपल्या जवळच्या जिवाभावाच्या माणसाची दु:खद वार्ता कळायची. अशा परिस्थितीत व्हाट्सअप, फेसबुक इतर माध्यमे देखील उघडायला घाबरायचे. हे एक परिस्थिती जगातल्या सर्व माणसांनी अनुभवले व दुसरी परिस्थिती लोकशाहीत हुकूमशाही किती प्रभावित होत आहे. हे देखील परिस्थिती प्रत्यक्ष आपण अनुभवत आहोत.

या संपूर्ण विश्वात जे काही घडते त्यामागे काही ना काही कारण असते विनाकारणाशिवाय या जगात काहीच घडत नाही प्रतीत्यसमुत्पाद हा सिद्धांत ज्यांनी मांडला ते गौतम बुद्ध ,त्यांना तत्कालीन परिस्थितीत जे प्रश्न पडले होते त्या प्रश्नांच्या शोधात व निर्माण झालेल्या प्रश्नावर



Scanned with CamScanner

उत्तर शोधण्यासाठी समाजाला, मानव जातीला दुःखातून मुक्त करण्यासाठी त्यावेळी त्यांची एक प्रश्नांची मातृभाषा होती. विचारांची मातृभाषा होती. संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाची भाषा होती. ते आपल्या मातृभाषेतूनच समस्यांचे निराकरण करायचे. समताधिष्ठित, समाजधिष्ठित मूल्यसंवर्धित करताना माणसाची स्वतंत्र अशी एक प्रश्नांची मातृभाषा असायला हवी. निर्माण झालेल्या प्रश्नातून समाज परिवर्तन झाले पाहिजे. मानवाला निकोप निरामय जीवन जगता आले पाहिजे. त्याला सुरक्षितता असली पाहिजे. पाहिलेले स्वप्न साकार करण्याची ताकद त्याच्यात निर्माण झाली पाहिजे. शोषणाविरुद्ध पेटून उठता आले पाहिजे. मी प्रथम भारतीय व अंततः भारतीय ही जाणीव ही प्रगल्भता त्या माणसात निर्माण झाली पाहिजे आणि ती केव्हा निर्माण होईल जोपर्यंत आपण या व्यवस्थेला प्रश्न विचारणार नाही; तोपर्यंत, म्हणून अत्यंत तत्त्ववादी मार्मिक तत्त्वज्ञान युक्त प्रश्न कवी युवराज सोनटक्के यांनी निर्माण केले आहेत.

लोक भाषेतूनच लोक चळवळ, लोक चळवळीतूनच लोक परिवर्तन, आणि लोक परिवर्तनातून समताधिष्ठित समाज निर्माण होऊ शकतो. हा विचार त्यांनी कवितेतून अभिव्यक्त केला आहे आंबेडकर चळवळ सशक्त करायची असेल तर, मोठ्या प्रमाणात आंबेडकरी लोक चळवळ उभी राहिली पाहिजे हा विचार देखील त्यांनी 'प्रश्नांची मातृभाषा' तून निर्माण केला आहे.

सध्या साहित्याच्या क्षेत्रात आणि त्यातल्यात्यात आंबेडकरी साहित्याच्या संदर्भात विशेषतः कवितेच्या क्षेत्रात एक नवा ट्रेंड, प्रक्रिया सुरू झाल्याचे लक्षात येत आहे. कवितेत इंग्रजी शब्द हिंदी आणि उर्दू शब्द वापरण्याचा नवा आयाम सुरू झाला आहे. इंग्रजी, हिंदी, आणि उर्दू शब्दांच्या माध्यमातून कविता सशक्त होऊ शकते असे बहुतेकांना वाटत आहे आणि आपली कविता जागतिकीकरणाच्या पूर जवळ नेण्याचे नवीन भान निर्माण होत आहे. कवितेच्या प्रांतात नवो नवे खेळ सुरू झाले आहेत. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. याचीही जाणीव आपल्याला असली पाहिजे आणि अशी परिस्थिती निर्माण होणे म्हणजे आपण आपल्या मूळ प्रश्नापासून, समस्येपासून भटलो की, काय असे, आता वाटायला लागले. धोकादायक आहे.

१९९०???? च्या दशकात जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. लोक तंत्रज्ञानाशी जोडले गेलेत. त्यातल्या त्यात शिक्षित समूह मोठ्या प्रमाणात, त्याचा परिणाम कवितेत दिसत आहे. अशा पद्धतीचा प्रयोग करण्यासारखाच आहे हे देखील आपण समजून घेतल्या पाहिजे. १९६०च्या दशकात दलित साहित्य.. दलित चळवळी मोठ्या प्रमाणात बळकट झाल्या..

१९६०च्या दशकातील दलित कविता ही मातृभाषेतूनच निर्माण झाली. त्यामुळे ती सकळ लोकांच्या काळजाला भिडली, रस्त्यावर, आंदोलनात सहभागी झाली. दलित जन आंदोलन निर्माण करण्यासाठी १९९० च्या दशकात दलित साहित्य या संज्ञा ऐवजी आंबेडकर संज्ञा आपण स्वीकारली आणि ती योग्यही आहे. जो बापाला बाप म्हणतो..स्वीकारतो तो आंबेडकरी आणि त्यांनी निर्माण केलेली साहित्य म्हणजे आंबेडकरी साहित्य, जो आतून वाहेम्न स्वीकारला तयार नाही, तो आजही आपली जात, धर्म गोंजारतो आणि सवडीनुसार आंबेडकर स्वीकारतो. अशापासूनच सजग राहण्याची वेळ आली आहे. हा देखील इशारा युवराज सोनटक्के यांनी दिला आहे. काळ कठीण आहे आणि अशा कठीण काळात आपण सजग राहिलो पाहिजे ही भूमिका त्यांनी स्वीकारली आणि, त्याच भूमिकेतून त्यांनी 'प्रश्नांची मातृभाषा' साकारले आहे

१९९० च्या दशकापासून सर्व सामान्यांच्या समाजापासून आंबेडकरी कविता अलिप्त होत चालली आहे. तो स्वतःलाच इतरांपेक्षा मोठा समजायला लागला आहे. अहंकार व अभिमान वाढत चालला आहे. काही अपवाद वगळले तर तो लोकांच्या अधिकारासाठी हक्कासाठी रस्त्यावर नाही. आंदोलनात नाही. समाजात देखील फारसा दिसत नाही. तो लोकांच्या वेदनेत नाही. दुःखात नाही. अशी परिस्थिती आंबेडकरी समाजात निर्माण होणे धोकादायक आहे आणि अशी माणसे समाज, चळवळ, आंदोलन, परिवर्तनासाठी धोकादायक आहे अशा खोटा चेहरा परिधान करणाऱ्या माणसापासून सावध राहण्याची वेळ आली आहे ही भूमिका कवीने स्वीकारलेली आहे

आंबेडकरी साहित्यिक, कवी हा आभाळातून पडत नाही, जन्म घेत नाही, तर तो चळवळीतून आंदोलनातून संघर्षातून मोर्चातून जन्म घेतो. २००५ ला बडनेरा शहरात संपन्न झालेल्या आंबेडकरी युवा साहित्य संमेलनाचे उद्घाटक प्रा. केशव मेश्राम यांनी असे भाकीत केले होते की, आंबेडकरी चळवळ सर्वसामान्य, झोपडपट्टीत जगणाऱ्या माणसांच्या खांद्यावर जीवंत आहे. अमरावती शहरातील प्राध्यापक सतेवर मोरे सारखे काही अपवादात्मक असू शकतात जे दिवस-रात्र आंबेडकरी चळवळीसाठी, साहित्यासाठी जगत असतात. खैरलांजी निषेध मोर्चा प्रा. सतेराव मोरे यांचे नेतृत्वात निघाला होता. संपूर्ण प्रशासन, सरकार हादरून गेला होता. त्यांच्या समवेत इतरांना जेरबंद करण्यात आले होते. हा इतिहास आहे. हा केवळ अमरावतीचा इतिहास नाही तर प्रत्येक गावाचा त्या त्या वेळेस चा इतिहास आहे आणि हा इतिहास येणाऱ्या पिढीसाठी त्यांची वैचारिकता अधिक प्रबल्य करण्यासाठी चळवळीसाठी दिशादर्शकच आहे.

प्रा. मोरे कवितेच्या संदर्भात आणि तेही आंबेडकरी कवितेच्या संदर्भात जी काळजी सरांनी अभिव्यक्त केली, ती गांभीर्याने घेण्याची गरज



Scanned with CamScanner

भासत आहे. कवितेच्या संदर्भात प्रा मोरे म्हणतात कवी म्हणून मिळालेल्या सामाजिक सन्मानापेक्षा सृजनाचे सात्विक समाधान अधिक महत्वाचे असते. कवी म्हणून लाभलेली प्रतिष्ठा टेकावी यासाठी कविता करणं वेगळं आणि अनुभूतीशी प्रामाणिक राहून कविता करणे जे कविता जगतात त्यांच्या कवितेला मरण नसते जे केवळ कविता करतात त्यांची कविता केव्हा मरते हे देखील त्यांना कळत नसते. कवितेच्या जगण्यातून नव्या विश्वाचे सौंदर्य साकारते, जे मानवी जगण्याला नवीन आयाम देते. कवितेचे जगणे हे कवी पुरते समर्पित नसते तर संबंध सृष्टीच्या सौंदर्याला आणि विचाराच्या चैतन्याला ती व्यापून उरते. या कवितेच्या सामर्थ्याचे भान जोपर्यंत असत नाही तोपर्यंत त्यांची कविता फुलत नाही. त्याला कविता जगता देखील येत नाही. कविता आहे म्हणूनच या विराट विश्वाचे अनेक नामकरण करता येणे शक्य आहे. कविता जे देते ते घेता आली पाहिजे आणि कवितेचे मागते ते देता आले पाहिजे. कविता काळवेळी पल्याड असणाऱ्या लौकिकतेचे रुप न्हाहाळण्याची संवेदना देते. त्याशिवाय काळ आणि आपण यात अडसर असणारी वेदना कविता आपल्याकडून मागून घेते कवी कवितेला ही वेदना देते याच वेदनेतून कविता आकारते ती जेव्हा अस्सल तेव्हाच कविताही अस्सल ठरते.

आंबेडकरी मराठी कवितेचे संदर्भात त्यांचे अवलोकन समीक्षण आणि सजगता फार महत्वाची आहे म्हणून अशावेळी कवी युवराज सोनटक्के यांची प्रश्नांची मातृभाषा हा कवितासंग्रह कवितेचे क्षेत्रात महत्वपूर्ण आहे. आंबेडकरी कवितेची मांडणी तत्वज्ञान प्रयोगशीलता समाजाकडे पाहण्याचा व जगण्याचा दृष्टिकोन या संदर्भात कवी युवराज सोनटक्के यांनी केलेली आहे.

युवराज सोनटक्के यांचा 'अग्निशाख' कवितासंग्रह दोन हजार एकमध्ये प्रकाशित होतो आणि एकवीस वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर 'प्रश्नांची मातृभाषा' कविता संग्रह प्रकाशित होतो. याचा अर्थ एक परिपक्वता सामाजिक, सांस्कृतिक मूल्यात्मकता घेऊन कविता प्रकट झाली आहे. कवितेशी असलेले त्यांचे रक्त संबंध हे विशेषत्वाने जाणवते. कवितेचे क्षेत्रात इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतर कविता संग्रह प्रकाशित करणे याचा अर्थ आपण जिवंत असल्याचे ते लक्षण आहे. संकेत आहे. त्यांनी दाखवून दिले आहे

महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, बंधुत्व न्याय, सामाजिक न्याय हे मूल्य या देशाला दिले आहे. समताधिष्ठित समाज निर्माण झाला पाहिजे. माणसा माणसातले द्वेष उध्वस्त झाले पाहिजे. माणसा माणसात प्रेम सौहार्द निर्माण झाले पाहिजे. याच मूल्यातून युवराज सोनटक्के यांची कविता साकारली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान आणि बुद्ध त्याचा धम्म या ग्रंथाच्या माध्यमातून जी मूल्यात्मकता दिलेली आहे. तीच मूल्यात्मकता युवराज सोनटक्के यांच्या कवितेतून दिसून येते. त्यांच्या बऱ्याच कवितांनी ती मूल्यात्मकता स्वीकारलेली आहे. त्यांची कविता सामाजिक, सांस्कृतिक दृष्ट्या मूल्य संवर्धन तर करतेच, सोबतच मानवी समूहावर संस्कार देखील त्यांची कविता करताना दिसते. आपल्याला आपला भूतकाळातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक संघर्ष विषयी, आंदोलनाविषयी, चळवळीविषयी संपूर्णता ऐतिहासिक घटना माहीत असल्याच पाहिजे व त्या पुढच्या पिढीपर्यंत पोचल्या पाहिजे. याचे सशक्त माध्यम म्हणून आंबेडकरी कविता स्वीकारताना दिसते. नव्हे तर मोठ्या प्रमाणात आंबेडकरी कवितेतून ते उजागर होताना दिसते. गतकाळातील इतिहासावरच भविष्य वर्तमान अवलंबून असते हे प्रामुख्याने कवी युवराज सोनटक्के यांची कविता सांगताना दिसते. त्यांना पडलेले प्रश्न हे केवळ त्यांचे प्रश्न नसून तर या देशातील शोषित पीडित अभावग्रस्त समूहाचे आहेत. त्या समूहाचे व्यथा.. वेदना त्यांनी मांडले आहेत. माणसाला निकोप.. निरामय जीवन जगता आले पाहिजे या भूमिकेतून त्यांची कविता उभी आहे.

प्रश्नांची मातृभाषा या कवितेच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण काव्यसंग्रहाची भूमिका विशद केली आहे.

> "माझी कविता मानवतेचे अंगार गीत गाते
> समता मूलक समाजाचे स्वप्न पाहते
> सत्याच्या आतील सत्य धरण्यास सरसावते
> माझ्या कवितेच्या वैचारिक संघर्षाची ओली आग
> दुर्बलांच्या विवशतेचे मार्मिक दंश विझवते
> ती समुद्र प्राशन करण्याचे कौशल्य जोपासते"

सध्या ज्या पद्धतीने लोकशाहीच्या आड हुकूमशाही सर्रासपणे सुरु आहे. सर्वसामान्य माणसांचे शोषण अविरतपणे सुरुच आहे. अशा शोषित समूहाचे व्यथा, वेदना, अन्याय, अत्याचाराविषयी विद्रोहाची भूमिका कवीने स्वीकारली आहे .

विद्रोह हा आंबेडकरी साहित्याचा स्थायीभावच आहे. इतकेच नव्हे तर तथागता पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने समता.. स्वातंत्र्य.. बंधुता.. न्याय .. सामाजिक न्याय निर्माण करण्यासाठी संघर्ष केला. विषमतावादी समाजव्यवस्था उध्वस्त झाली पाहिजे व नवीन समता



Scanned with CamScanner

मुलक समाज निर्माण झाला पाहिजे. असा समाज ज्यामध्ये मानवा मानवा मधील जातिभेद, धर्मभेद नष्ट झाले पाहिजे .मानवामानवा मधील जातिभेद धर्मभेद नष्ट तर झालेच पाहिजे. तो अधिकाधिक जिवंत राहिला पाहिजे यासाठी हे विषमतावादी व्यवस्था कार्यरत आहे है कवीच्या लक्षात आली आणि म्हणून ही व्यवस्थाच उध्वस्त झाल्या पाहिजे ही भूमिका त्यांची कविता स्वीकारताना दिसते

शोषक शोषितांच्या क्रौर्य धैर्याचे मानवी करण प्रखर प्रश्नांच्या मातृभाषेत मांडता येतील काय? प्रश्नांची मातृभाषा कवितेमध्ये हा जो प्रश्न कवीला पडला. मुळात असे प्रश्न पडणेच व्यर्थ आहे. प्रखर प्रश्नांच्या मातृभाषेत नेमका याचा अर्थ चळवळ संघर्ष आंदोलन विद्रोह या माध्यमातूनच या व्यवस्थेला प्रश्न विचारण्याची एक मोठी परंपरा आहे. ती नाकारता येऊ शकत नाही आणि ती परंपरा आंबेडकरी साहित्याने आज तागायत सांभाळली आहे प्रखर याचा अर्थ विद्रोह; वेदना, नकारात्मक जेव्हा टोकाला पोहोचतात तेव्हा विद्रोह हा अटळ असतो. ही जाणीव कवी युवराज सोनटक्के करून देतात.

'माय' या दीर्घ कवितेतून त्यांनी आई विषयी असलेला भावनात्मक जाणीव अभिव्यक्त केली आहे. त्यांची म्हणजे सर्व आंबेडकरी समाजाची माय..

माय!
'तुझ्या चेहऱ्याच्या आरशात
सजवित राहिलो मी अस्तित्व आपले
अन त्या सुशील चेहऱ्याला समजू शकलो नाही
उन्हात होत्या सतामात
विचारांच्या सुरकुत्या आणि अगणीत जखमा
त्या जखमात विराजमान एक मौन
जे माझ्या हृदयाला करते स्पंदित
तू एक अद्भुत माता माझ्या सक्षम स्मृतीत
मी अनुभवतो -
माझे शब्द तुला स्पर्शू शकत नाहीत
भटकू शकत नाहीत तुझ्याजवळ'.

खरंच माय स्वत:साठी कधी जगलीच नाही म्हणूनच तर आपल्या आयुष्याची सोने झाले. आपलं अस्तित्व, अस्मिता, स्वत्व, स्वप्न, माय मुळेच, मायने प्रखर वेदनेवर, दु:खावर, भूक मारीवर विजय मिळवून सर्वत्र उजेड पसरविले. या उजेडाचे आपण वारसदार आहोत. सावित्री ज्योतिराव फुले. रमाई. स्त्री या दीर्घ कवितेच्या माध्यमातून जीवन संघर्ष अटळ आहे हे येणाऱ्या पिढीसाठी अधोरेखित केले आहे. आपण आपले आदर्श त्यांचे संघर्ष आणि तत्त्वज्ञानाचे संवर्धन केले पाहिजे व पुढच्या पिढीपर्यंत ते नेता आले पाहिजे.

माणसाचे उध्वस्तीकरण होऊ नये. त्याला चांगले जीवन जगता आले पाहिजे. याची जाणीव कविता झाली. म्हणून सर्वसामान्य माणूस भरडल्या जाऊ नये. प्रयोग शाळेत त्याच्यावर चुकीचे प्रयोग होऊ नगेत. याची चिंता कवीला आहे हे वास्तव चित्र त्यांनी 'वैश्विक समाज' या कवितेतून अधोरेखित केले आहे. जोपर्यंत या देशातल्या सर्वात शेवटच्या माणसाचा विकास होत नाही; तोपर्यंत या देशाचा विकास होणार नाही. या देशात माणसापेक्षा शहराचा विकास जलद गतीने होत आहे. कामगारांच्या टोळ्याच्या टोळ्या आजही एका आशेने चौकात उभे आहेत. तो अनेक स्वप्न मेंदूत घेऊन जगतो आहे. त्याला रात्रीची काळजी पडली आहे. जीवन जगण्यासाठी नको तेथे काम करणारे लोक रस्त्या रस्त्यावर दिसत आहेत हे विदारक व वास्तव चित्र त्यांनी रेखाटले आहे.

'बाजार वाद' या कवितेतून जो विचार मांडला तो सध्याच्या परिस्थितीवर, बाजारवाद, जागतिकीकरण या देशातील शेतकरी कामगारांना उध्वस्त करण्याच्या मार्गावर आहे आणि हळूहळू तो संपत आहे. बाजारात स्त्रीचं शोषण कोणत्या पद्धतीने होत आहे हे सांगण्याचे धाडस त्यांची कविता स्वीकारते आहे. नामांतर, दीक्षाभूमी, सेमिनार, प्रतिष्ठान, शिखर पुरुष एक दोन, तथागत बुद्ध, विज्ञानमातृक बुद्ध, बुद्धिबळ, शक्यता आता या संपूर्ण कवितेच्या माध्यमातून वैश्विक समाजाच्या निर्मितीसाठी ते प्रश्नांच्या खोल गर्तेत गेल्याचे जाणवते. आता या गर्तेतून आंबेडकरी तत्वज्ञानच बाहेर काढू शकतो हा आशावाद त्यांनी मांडला आहे.

भौतिक वादात चंगळवादात जागतिकीकरणाच्या भंपक जगात मानव अस्तित्व स्वकेंद्रीय होत आहे. माय स्वत: अंधारात आयुष्य काढते.

येणाऱ्या पिढीला उजेड देण्यासाठी. खऱ्या अर्थाने अंधारात राहून उजेड ऊर्जा निर्माण करणारी माय होती. आज माय कुठे आहे याचाही शोध घेतला पाहिजे. शहरा शहरात, गावागावात, माणुसकीच्या भिंती उभ्या होत आहेत. दिवसेंदिवस तिची संख्या वाढत चालली आहे. वृद्धाश्रमाच्या संकेत भर पडत आहे. याचे नेमके कारण शोधता आले पाहिजे. माझा पोरगं बाबासाहेबांनी शिकला पाहिजे मोठा झाला पाहिजे ही जाणीव सतत मेंदूत घेऊन माय जगत होती. आता मुलगा मोठा झाला. माय लहान झाल्याचे चित्र समाजात दिसत आहे. हे वैश्विक सत्य 'माय' कवितेतून जाणवताना दिसते

'यथार्थ मूल्य' या कवितेतून

"क्रांतिकारी फक्त गर्जना शासनाच्या रिक्त गुहेत
वंचित केले मानवतेला नाही प्रश्नोत्तर संसदेत"

सामान्य माणसांचे शोषितांचे वंचितांचे प्रश्न संसदेत नाही

युवराज सोनटक्केच्या मेंदू अनेक सम्यक प्रश्न, पण तितकेच विद्रोहात्मक प्रश्न निर्माण होतात. मुळात प्रश्न सम्यक असो की विद्रोहात्मक असे प्रश्न निर्माण होणे माणसाच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. निर्माण झालेल्या प्रश्नांच्या मुळांना स्वतःची मातृभाषा ज्याला आपण इंग्रजीमध्ये आयडेंटी, ओळख, चेहरा म्हणतो ती असणे गरजेचे आहे आणि हा चेहरा आपल्याला आपल्या जीवनसृष्टीचे रचनाकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मूल्यांतरपूर्व व मूल्यानंतरोत्तर दिला आहे. चौदा ऑक्टोबर एकोणीसशे छप्पन्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील समस्त शोषितांना अस्पृश्यांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. त्यामुळे सामान्य माणसाने धर्म त्यागून धम्म स्वीकारला, परमेश्वराला नाकारून माणसाला स्वीकारले, आणि माणसाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी बुद्ध धम्माची दीक्षा दिली. मूल्यांतरानंतर आपण आता पूर्वाश्रमीचे अस्पृश्य शोषित न राहता आपल्याला नवीन चेहरा बहाल झाला आहे. स्वतःची ओळख निर्माण झाली आणि ही ओळख कायम टिकावी यासाठी कवितेच्या माध्यमातून युवराज सोनटक्केंची वैचारिक धडपड प्रखरतेने जाणवते.

प्रश्नांची मातृभाषा या काव्यसंग्रह युवराज सोनटक्के यांनी अनेक दीर्घ कविता सोबतच कवितेचे इतर प्रयोग देखील हाताळलेले दिसते. विज्ञानाच्या माणसाला मूल्य दृष्टीत समताधिष्ठित समाजहितैष्ठित समाज निर्माण करण्यासाठी पडलेले प्रश्न येणाऱ्या आंबेडकरी पिढीला दिशादर्शक ठरणार आहे. पहिल्या पिढीच्या खांद्यावर दुसरी पिढी उभी होती आणि दुसऱ्यापिढीच्या खांद्यावर तिसरी पिढी तिसऱ्या पिढीच्या खांद्यावर चौथी पिढी म्हणून पहिल्याला जे दिसले त्यापेक्षा दुसऱ्या पिढीला त्यापेक्षा अधिक दिसले. त्यामुळे त्याच्यापुढे अनेक प्रश्न होते व तिसऱ्या पिढी पुढे असलेले प्रश्न आणि आपल्यापुढे असलेले प्रश्न हे मानून उध्वस्त करण्याचे आहे. पहिल्या पिढीच्या संघर्षावर दुसरी तिसरी चौथी आणि आताची पिढी उभी आहे ते विसरता येत नाही आणि या पिढी पुढे जो आदर्श तत्त्वज्ञान होता तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या तत्त्ववादी बापाचे. असे अनेक प्रश्न कविता पडले आहेत. या प्रश्नांच्या उत्तरासाठी मानव जीवन संघर्ष निर्माण करण्यासाठी त्यांची आंतरिक धडपड आहे 'प्रश्नांची मातृभाषा' म्हणजे मानवाच्या जीवन संघर्षाचा सजग हुंकारच...


संदर्भ ग्रंथ :

१. डॉ. आंबेडकर बाबासाहेब : शूद्र पूर्वी कोण होते.
२. डॉ. आंबेडकर बाबासाहेब : अस्पृश्य मूळचे कोण
३. डॉ. आंबेडकर बाबासाहेब : जाती निर्मूलन
४. फडके भालचंद्र : दलित साहित्य वेदना व विद्रोह
५. डॉ. सबनीस श्रीपाल : आंबेडकरवादी कवितेचा नवागंध
६. डॉ. खोब्रागडे सुरेश : आंबेडकरी कविता आस्वाद आणि मीमांसा
७. ढोले संदेश : आंबेडकरवादी कविता आकलन व अर्थमीमांसा
८. डॉ. कांबळे ऋषिकेश : दलित कविता आणि अमेरिकन ब्लॅक पोएट्री
९. डॉ. मोरे सतेश्वर प्रस्तावना निळामय कविता संग्रह
१०. डॉ. मोरे सतेश्वर प्रस्तावना सरसंधान कवितासंग्रह?





Scanned with CamScanner

International Multidisciplinary Conference on

# Environment: Issues, Challenges, Impact and Steps Towards Sustainable Development

## 24 September 2022



*Organized by*

**Yavatmal Zilha Akhil Kunbi Samaj's**

## Gopikabai Sitaram Gawande Mahavidyalaya

Umarkhed, Dist. Yavatmal (MS)

Reaccredited with B⁺⁺ by NAAC (CGPA 2.79)

***in collaboration with***

## IQAC

## Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Email: icesd2022@gsgcollege.edu.in Website: www.gsgcollege.edu.in

Scanned with CamScanner

ISSN 2319-4979

# VIDYABHARATI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL



*In order to cater the research aptitude, VIIRJ researcher and Editorial team decided to publish online* ***Vidyabharati International Interdisciplinary Research Journal.*** *The journal is Open Access, Peer Reviewed and Refreed journal publishing original research papers, short communications, reviews in Science, Arts and Commerce.*

EDITORIAL BOARD

**Editor in Chief**
**Dr. D.R. Halwe**

**Executive Editor**
**Dr. P.R. Rajput**

**Managing Editor**
**Dr. N.D. Jambhekar**

**Treasurer**
**Mrs. M.N. Jambhekar**

Dr. Chandana Unnithan, *Associate Lecturer, Faculty of Business & Law, School of Information and Business Analytics, Deakin University, Australia.*

drs. Tillo Detige, *Faculty of Arts and Philosophy, Universiteit Gent, Belgium.*

**The Journal does not subscribe to the views expressed by the authors in the* ***Research Papers.***



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 51 | शुभम आव्हाण आणि संदिप जाधव | ई –कचरा–यामुळे पर्यावरणावर होणारा परिणाम<br>शुभम आव्हाण आणि संदिप जाधव | 208 |
| 52 | अनिता बेगाजी वानखेडे | आर्थिक कृषी मध्ये कृषीची भूमिका | 212 |
| 53 | डॉ.एन.एस.मेश्राम | पर्यावरणाला वाचवा – पृथ्वीही वाचेल ! | 217 |
| 54 | डॉ. अंजली दत्तात्रय टापरे | पर्यावरण संरक्षण संकल्पना: एक दृष्टीक्षेप | 221 |
| 55 | डॉ. ए. डी. जाधव | पर्यावरण आणि जागतिक राजकारण | 224 |
| 56 | प्रा.प्रताप पुंडलिकराव शिंदे | श्री संत ज्ञानेश्वरांचे पर्यावरण विषयक विचार | 231 |
| 57 | प्रा. ए. व्ही. मोरे आणि डॉ. गणेश पुंडलिकराव कदम | पर्यावरण शिक्षण आणि रक्षण काळाची गरज | 235 |
| 58 | प्रा.डॉ.बालाजी मलाळकर | पर्यावरणीय समस्या | 239 |
| 59 | डॉ.ममता जानराव इंगोले . | पर्यावरण रक्षणात स्त्रियांची भूमिका | 241 |
| 60 | डॉ.गणेश पुंडलीकराव कदम आणि प्रा. डॉ. वैजयंता नागोराव पाटील | पर्यावरण शिक्षणात विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका | 249 |
| 61 | डॉ. रमेश जी.सुरळकर | पर्यावरण प्रदुषण, कारणे परिणाम व उपाय | 252 |
| 62 | प्रा.डॉ.राजेश कवरे | निसर्गनिष्ठ ज्योतीराव | 255 |
| 63 | प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम, | छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरण विषयक सजगदृष्टी | 257 |
| 64 | प्रा.डॉ.सुनील एन. ढेरे | घनकचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण परिणाम | 260 |
| 65 | डॉ. विष्णू नामदेव साठे | आज्ञापत्रातील छत्रपती शिवाजी महाराजांचा पर्यावरणविषयक दृष्टिकोण | 263 |
| 66 | ओंकार नवीनत वैसे | हवामान बदल, पर्यावरण आणि मानवी विकासाचे चिकित्सक अध्ययन | 267 |
| 67 | पाटील मनिषा सुभाष. | ई कच-याचा मानवी आरोग्य आणि | 271 |




Scanned with CamScanner

# छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरण विषयक सजगदृष्टी

**प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम,**
मराठी विभाग प्रमुख,
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय पुसद,
जिल्हा यवतमाळ महाराष्ट्र

**प्रस्तावना:**

पुरातन काळापासून पर्यावरणाला विशेष महत्व होते /आहे .पर्यावरणातील विविध वृक्षांची औषधी म्हणून वापर केला जात होता/ आहे. विविध ऋषीमुनी पर्यावरणपूरक वातावरणातच शैक्षणिक उपक्रम राबवायचे व स्वत: देखील पर्यावरण विषयक वातावरणातच सराव करायचे . तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धांनी पिंपळाच्या वृक्षाच्या सानिध्यातच बोधी प्राप्त केली . त्यामुळे पर्यावरणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे . शासन दरबारी फतवा काढून लाखो वृक्षारोपण केले जाते . मात्र वृक्ष संवर्धनाकडे दुर्लक्ष केले जाते . अनेक सत्ताधारी वृक्षारोपणाच्या अविर्भावातच आजन्म राहतात. वृक्षारोपण केल्यानंतर आपण लावलेल्या वृक्षांचे , रोपांचे पुढे काय झाले ! याकडे कमालीचे दुर्लक्ष केले जात आहे .काही अपवाद वगळले तर , पूर्वीच्या काळात हकीम ,वैद्य झाडांच्या रोपांचा उपयोग औषधांसाठी करायचे. मात्र, आजची परिस्थिती विपरीत स्वरूपाची आहे. आज अधिक तर लोकांचा विश्वास या गोष्टीवर नाही. वृक्ष संवर्धनाकडे दुर्लक्ष होत आहे. झाडांना संपूर्णत: उध्वस्त करण्याच्या मागे लागलेले आहेत. झाडांना जमीन दोस्त विकासाच्या नावावर केले जात आहे. विकास तर झालाच पाहिजे. विकासाला कोणाचा विरोध असू शकत नाही आणि असला तरी तो तात्पुरता असला पाहिजे.या मताचा मी आहे. त्यातला राजकारण वगळला तर, पर्यावरणाचे समतोलही कायम ठेवता आले पाहिजे. पर्यावरणाच्या समतोलतेमुळे मानव व प्राण्यांना विविध समस्यांना पुढे जावे लागत आहे. ते ताणतणावात येत आहेत. आजची परिस्थिती अत्यंत समस्या प्रधान अशी परिस्थिती आहे .अनेक मानव ताणतणावात असल्यामुळे अनेक रोगांना बळी पडत आहेत. अशुद्ध हवा, अशुद्ध वातावरण या सर्व गोष्टी दिवसेंदिवस वाढत आहेत . पर्यावरणाचे समतोल राखले ,तर या सर्व गोष्टीवर आपल्याला आळा घालता येईल . मनुष्य बोलतो म्हणून तो त्याच्या समस्या , दुःख, वेदना बोलण्यातून व्यक्त करू शकतो . मात्र, ज्यांना बोलतात येत नाही . त्यांचे प्रश्न आजही शिल्लक आहेत. पुढे तर ते प्रश्न अधिक गंभीर होणार आहेत. पर्यावरणाचे संवर्धन, समतोल राखताना त्याची जीवापेक्षा अधिक काळजी करणारा सोळाव्या शतकातला पर्यावरण विषयक दृष्टी असणारा पर्यावरण पूरक व्यक्ती म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय .आज समाजामध्ये विसर पडत चालला आहे.

सोळाव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी विविध पातळ्यांवर कार्य केले. त्यांचे कार्य आजही दिशादर्शकच आहे. रयतेची, स्वराज्याची, पर्यावरणाची नितांत काळजी बाळगणारा व्यक्ती म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज.



Scanned with CamScanner

कोल्हापूरचे दुसरे संभाजी महाराज यांचे आज्ञेवरून ग्रंथकार रामचंद्रपंत अमात्य यांनी "आज्ञापत्र "नावाचा विशेष ग्रंथ लिहिला. आणि त्या सदर ग्रंथाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरण विषयक दूरदृष्टी अधोरेखित केली आहे. जी आजच्या काळातही दिशादर्शकच आहे.

सोळाव्या शतकात पर्यावरणासंदर्भात सजग असणे ही अत्यंत ऐतिहासिक घटना आहे .वृक्षांचे संवर्धन तर झालेच पाहिजे. मात्र ,त्याविषयी त्यांच्या काळजात आस्था देखील असली पाहिजे. वृक्ष संवर्धनाविषयी महाराजांची दृष्टी व त्याविषयीचे धोरण फार महत्वपूर्ण होते. आणि त्या मागचे कारणे कोणते असावेत हे देखील त्यांचे स्पष्ट होते.

असंख्य हाल ,अपेष्टा, अवहेलना, असाह्य वेदना, दुःख ,मानसिक ताणतणाव, स्वराज्याची काळजी, राज्याभिषेकाचा विचार, राज्याभिषेकाला होणारा विरोध ,गागाभट्ट सारख्या पंडितांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा डाव्या पायाच्या अंगठ्याने केलेल्या राज्याभिषेक, क्षत्रिय आहात याचा पुरावा मागणारे भट ब्राह्मण ,परक्याची आक्रमणे, लढाया, जनतेचे संरक्षण, स्वराज्याचे स्वप्न, व ते स्वप्न वास्तवात आणण्यासाठी चाललेली मोर्चे बांधणी इत्यादी बाबींचा सामना करत असताना पर्यावरण देखील तितकेच महत्त्वाचे आहे. अशी सजगदृष्टी असणारा छत्रपती म्हणजे शिवाजी महाराज.

शिवाजी महाराजांनी राज्यातील वेगवेगळ्या पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना व लोकांना वेळोवेळी आदेश व सूचना दिल्या. त्यामध्ये त्यांनी गडावरील जे झाडे आहेत. त्याचे संवर्धन करता आले पाहिजे ,त्यांची काळजी घ्यावी त्यांनी झाडांचे वर्गीकरण केले .आंबे, फणस, चींचा ,वड, पिंपळ इत्यादी जे जुने झाडे, निंबे ,नारिंगे, इत्यादी लहान झाडे, तसेच पुष्पवृक्ष, वल्ली या झाडांची विभागणी करून जी झाडे बहुउपयोगी आहेत ते गडावर लावून त्यांची संवर्धन करावे. म्हणजे ज्यावेळी लाकडांची आवश्यकता पडेल त्यावेळी ती झाडे उपयोगात पडली पाहिजे.

राज्याच्या रक्षणासाठी आरमाराची नितांत आवश्यकता असते .तेव्हा सागरी मार्ग सुरक्षित ठेवायचा असेल तर आरमार बलाढ्य सुसज्ज आणि मजबूत असले पाहिजे. आरमारास तख्ते, सोट, डोलांच्या काठ्या, नौका ,लहान-मोठी नौका याकरिता उंच व चांगल्या दर्जाच्या झाडांची लाकडे पाहिजे .तेव्हा राज्याच्या जंगलातील सागवान आणि इतर अशा जातीचे झाडे उपयोगी पडतील. तेव्हा आदेशाप्रमाणे परवानगी घेऊनच झाडे तोडावीत. याचा देखील विचार त्या काळामध्ये महाराजांनी केला होता. आदेशाची परवानगी न काढता झाडे तोडू नयेत. जर आरमारास लाकडांची कमतरता भासत असेल तर लाकडांची परराज्यातून खरेदी करून आणावे .हा विचार देखील महाराजांचा अत्यंत महत्वपूर्ण आहे.

स्वराज्यातील आंबे, फणस आधी करूनही ही लाकडे आरमारासाठी गरजेचे असते. तेव्हा या झाडांना कोणालाही हात लावू देऊ नये. स्वराज्यातील नागरिकांनी अशा प्रकारची झाडे लावून त्या झाडांचे पालन पोषण आपल्या मुलांप्रमाणे केले पाहिजे. अनेक वर्षे त्यांचे संवर्धन करून जर झाडांना तोडले तर जनता दुःखी होईल. ती झाडे तोडल्यावर त्यांच्या दुःखात दुसरे काही साधन आहे काय? तसेच एखादे कार्य एखाद्याला आपण दुःख देऊन केले तर ते कार्य करणाऱ्या सहित अल्पकाळात नष्ट होते.

राज्यात झाडांची संख्या कमी असेल तर निसर्गाचा समतोल बिघडतो. अनेक संकटे निर्माण होतात. तेव्हा असे कोणते प्रकार होऊ द्यायचे नसतील तर आपण वृक्षांची काळजी



Scanned with CamScanner

घेतली पाहिजे. एखाद्यावेळी एखादी कमकुवत झाड असेल, तर ते जीर्ण झाले असेल, तर आणि ते झाड उपयोगाच्या कामात पडत नसेल तर अशावेळी त्या झाडाच्या मालकास त्याची माहिती द्यावी व योग्य ते द्रव्य देऊन ते झाड तोडावे. परंतू प्रजेवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ देऊ नये. त्याचे शोषण होऊ देऊ नये. याची देखील काळजी शत्रपती शिवाजी महाराजांनी सोळाव्या शतकात घेतली होती.

सोळाव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी पर्यावरण संदर्भात काळजी घेतली होती.

शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीच्या अगदी सुरुवातीलाच म्हणजे 28 जानेवारी 1646 रोजी च्या पत्राद्वारे त्यांनी त्यांच्या स्त्री विषयक धोरणाची दिशा स्पष्ट केली आहे एखाद्या स्त्रीवर जर पुरुषाने बलात्कार केला असेल, तर त्याला देह दंडासारखी जबर शिक्षा ,३)आणि त्या स्त्रीला शुद्ध करून घेण्याचे आदेश देऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी उच्च नैतिकता व समतवादी दृष्टिकोन दाखविल्याचेही अनेक उदाहरणे समकालीन कागदपत्र मध्ये आढळून येतात शिवाजी महाराजांच्या स्त्रीविषयक न्यायपूर्ण धोरणाचा उज्वल वारसा संभाजी व राजाराम यांनी समर्थपणे चालवण्याची साक्ष इतिहास देतो .शिवरायांच्या प्रजाहित दक्ष राज्यकारभारामुळेच ते आपल्या प्रजेत व सैन्यात अत्यंत लोकप्रिय होते. त्यांच्या याच धोरणामुळे सामान्य माणसेही ध्येय प्राप्तीसाठी असामान्य कामगिरी गाजवून इतिहास प्रसिद्ध झाली .प्रत्येकांच्या मनात हे राज्य आपलेच आहे अशी भावना निर्माण करण्यात छत्रपती शिवाजी महाराज यशस्वी झाले होते. जे आज भल्या भल्या राजकीय लोकांनाही जमत नाही. अनेक ऐतिहासिक घटनांचा जेव्हा आपण विचार करतो त्यावेळी पर्यावरणपूरक संदर्भात छत्रपती शिवाजी महाराजांनी सजग दूरदृष्टी होती ती आजही किती उपयुक्त आहे हे लक्षात येते.

## निष्कर्ष :

छत्रपती शिवाजी महाराज पर्यावरण पूरक होते. पर्यावरण एक विषय त्यांची दृष्टी सजग होती. त्यांनी विविध पातळ्यांवर लढत असताना पर्यावरणावर देखील लक्ष केंद्रित केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा पर्यावरण विषयक दूरदृष्टी व दिशादर्शक कार्यक्रम राबवण्याची नितांत आवश्यकता आहे.

## संदर्भ:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर: शूद्र पूर्वी कोण होते

डॉ. बाबासाहेब आंबेडकर :जात निर्मूलन रामचंद्रपंत अमात्य: आज्ञापत्र

चंद्रशेखर शिखरे :श्री शुद्रांचा राजा छत्रपती शिवराय या लेखातून

**मृदगंध भाग एक :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती.



Scanned with CamScanner